# अनुक्रमणिका


**4**
प्रारंभिक
समाधानाचा प्रकाश
– जयंत पाटील

**5**
प्रबंध संपादकीय
दिवाळी संवादाची!
– दिलीप वळसे पाटील

**6**
संपादकीय
दडपण धर्म बेडीचे!
– डॉ. सुधीर भोंगळे

**10**
एकनाथ खडसे राष्ट्रवादी पक्षप्रवेश समारंभ
१) नाथाभाऊंमुळे खानदेशात पक्षवाढीला गती मिळेल– १२
– शरद पवार
२) पिक्चर अभी बाकी है ।– १८
– जयंत पाटील
३) निष्ठेने राष्ट्रवादी पक्षाचे काम करून पक्ष वाढवीन– २४
– एकनाथ खडसे

**30**
भारतीय परराष्ट्र नीती किती काळ प्रभावमुक्त राहणार?
– गहिनीनाथ

**42**
सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ‘कोविड’ ने शिकविलेला धडा
– डॉ. नीळकंठ रथ

**56**
आधुनिक भारताचे शिल्पकार– महात्मा फुले
– प्रा. डॉ. गणेश राऊत

**62**
मुंबईचे शिल्पकार
मेहता फिरोजशहा मेरवंजी
– प्रा. डॉ. गणेश राऊत

**68**
केंद्र सरकारची वाढती दडपशाही
– आकाश, (दिल्ली वार्तापत्र)

**80**
कानोकानी (राजकीय विनोदी हलके–फुलके किस्से)
– घंटाकर्ण

**88**
बिहारनंतर आता बंगालवर लक्ष
– कबीर दास

**98**
राज्यांचे अधिकार काढून घेण्याचे पाप केंद्र सरकार करते आहे
– सुप्रिया सुळे

**101**
कांदा आयात–निर्यात धोरण शेतकरी विरोधी
– शरद पवार

**102**
शेवटचे पान– उजळत्या वाटा
– हेमन्त टकले









**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई–४०० ०३८
०२२–३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
वार्षिक रु. ५००/–
वर्गणीचा धनादेश ‘हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.’ या नावाने काढावा.
www.ncp.org.in यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **‘हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.’** च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

## प्रारंभिक



# समाधानाचा प्रकाश

अनेक संकटे आणि दुःखांचा सामना करीत आपण यंदाच्या दिवाळीला सामोरे जात आहोत. २०२० हे वर्ष कोरोना महामारीच्या संकटामुळे आयुष्यभर आपल्या सर्वांच्या लक्षात राहिल. पूर्वीच्या काळी प्लेगच्या साथी यायच्या आणि गावेच्या गावे उध्वस्त व्हायची व प्रेतांचा खच पडायचा असे आपण सर्वांनी ऐकलेले आणि वाचलेलं आहे. प्रत्यक्ष तशी दृश्ये पाहिलेली माणसे आता फारशी कुठे अस्तित्वात असतील, जिवंत असतील असे वाटत नाही. कारण प्लेगच्या साथी येण्याचे बंद होऊन आता ९० ते १०० वर्षे होऊन गेली आहेत. पण प्लेगची पुन्हा आठवण यावी असेच चित्र कोरोना कोविड-१९ या महामारीने केवळ भारतापुढेच नाही तर संपूर्ण जगासमोर उभे केले आहे. महामारीच्या या संकटाची दुसरी वेगवान लाट सध्या युरोपात आली असून त्याची मोठी झळ इटली, स्पेन, डेन्मार्क, जर्मनी, नेदरलँन्ड व आसपासच्या देशांना बसली आहे. पहिल्यापेक्षा दुप्पट-तिप्पट वेगाने लोकांना या विषाणूजन्य संसर्गाचा प्रादूर्भाव होतो आहे. अमेरिकेत तर जवळपास १ कोटी लोकांना या कोरोना आजाराचा सामना करावा लागला आहे. लाखो लोकांचे प्राण या कोरोनाने घेतले. त्यामुळे लाखो घरांमध्ये दुःख आहे.



या संकटामुळे अनेक छोटे-मोठे उद्योग व व्यवसाय बंद पडले. अगोदरच आर्थिक मंदीने त्रस्त झालेल्या माणसांना कोरोनाने उध्वस्त केले. लाखो लोकांचा रोजगार गेला. नोकरी गेली. रोजचे उत्पन्न मिळण्याचे साधन बंद झाले. मजुरांची मजुरी गेली. हातावर पोट असणाऱ्यांचे तर अधिकच हाल होऊन त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. दोन वेळेच्या अन्नालाही महाग झालेल्या लोकांना दिवाळी साजरी करा असे सांगणे म्हणजे त्यांच्या जखमेवर मिठ चोळण्यासारखे आहे. कोरोनाने संकटात सापडलेल्या अशा लोकांची संख्या आपल्या देशात तर खूप मोठी आहे. या सर्वांना मदत करुन पुन्हा मजबुतीने उभे करणे हे आपल्यापुढचे मोठे आव्हान आहे. महाराष्ट्रात तीन पक्षांचे म्हणजे महाआघाडीचे सरकार सत्तेवर असून ते प्रामुख्याने आपल्याच पक्षाचे नेते मा. शरदरावजी पवारसाहेब यांच्या मार्गदर्शनानेच सत्तेवर बसले आहे. त्यामुळे आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून जनतेला खूप मोठ्या अपेक्षा आहेत. संकटकाळी जनतेला धीर देऊन पुन्हा उभे करण्याचे काम राष्ट्रवादीच करू शकते असा प्रचंड आशावाद संकटग्रस्त जनतेच्या मनात घर करुन बसलेला आहे. त्यामुळे आपल्या पक्षात काम करीत असलेल्या मंत्र्यांपासून अगदी तळागाळातील शेवटच्या कार्यकर्त्यांपर्यंत प्रत्येकाची काम करण्याची जबाबदारी वाढलेली आहे. सर्वांना मनापासून अंगचोरपणा न करता काम करावे लागणार आहे. गोष्टी अगदी साध्या असतील. उदा. दिवाळीत प्रामुख्याने साखर, बेसनपीठ आणि खाद्यतेल लागते. ते रास्त दरात स्वस्त धान्य दुकानातून म्हणजे रेशनिंगवर गरजूंना उपलब्ध होते आहे की नाही हे पाहिजे पाहिजे. सणासुदीच्या काळात बरेच दुकानदार याचा काळा बाजार करतात. बाहेरच्या व्यावसायिकांना हा माल विकून टाकतात. शासन जाणीवपूर्वक दिवाळीसाठी जीवनावश्यक वस्तु स्वस्त व रास्त दराने गोरगरींबाकरिता उपलब्ध करुन देत असते. त्यांच्यापर्यंत त्या पोहोचतात की नाही हे आपल्या कार्यकर्त्यांनी कटाक्षाने पाहिजे पाहिजे. अशीच गोष्ट अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या लोक व शेतकऱ्यांची आहे. नुकसानीचे पंचनामे बरोबर होऊन नुकसानग्रस्त लोकांना मदत मिळते की नाही हे ही तपासले पाहिजे. संकट समयी गरीबांच्या घरी मदतीचा आपला हात पोहोचला तर दिवाळीचा दिवा त्यांच्या घरी तर लागेलच पण समाधानाचा उजेड व प्रकाश तुमच्या घरातही पडेल एवढी खूणगाठ मनाशी नक्की बाळगा !

# प्रबंध संपादकीय



# दिवाळी संवादाची!

दिवाळी हा सर्वांच्या आवडीचा व आनंदाचा सण. प्रत्येकजण याची वर्षभर वाट पाहात असतो. नुसतीच नवीन खरेदी नाही तर नवे काही करण्याचा संकल्प वा प्रकल्प आपण दिवाळीत हाती घेत असतो. दिवाळीची सुरुवात वसुबारसेपासून होते. या दिवशी गाय आणि वासरू यांची पूजा करतात. कृषी परंपरेत गाईचे स्थान महत्त्वाचे आहे. हिंदू धर्म रक्षणाच्या नावाखाली गोरक्षकांनी देशात मागील सहा वर्षांपासून जो काही धुमाकूळ घातला आहे आणि संशयाच्या सुईवरुन निरपराध लोकांवर जे अन्याय, अत्याचार चालविले आहेत त्यामुळे गायी देखील चिंतेत पडून ढसाढसा रडताहेत. वास्तविक गायांचे संगोपन व्यवस्थित केले तर दूधच काय पण शेण, गोमूत्र यापासून होणारा फायदा कितीतरी मोठा आहे. फक्त देशी वा गीर गायीचेच शेण व गोमूत्र चांगले असते आणि जर्सी, होस्टन फ्रीजन किंवा संकरीत गायींचे शेण, गोमूत्र चांगले नसते हा आपल्या मनाचा खेळ आहे. त्याला काहीही शास्त्रीय आधार नाही. इस्राईल मधील गाय दिवसभरात रोज ६० लिटर दूध देत असेल तर आपण अशा गायी वाढवायला नकोत का? गायीचे दूध महत्त्वाचे आहे की फक्त देशीपण महत्त्वाचे आहे? शेतकरी दूधासाठी गायी सांभाळतो की गोमूत्रासाठी? याचे स्पष्ट उत्तर कोण देणार? गायीने जास्त दूध दिले तर ते विकून जास्त पैसे मिळतील आणि हे जास्तीचे पैसे मिळावेत व आपल्या प्रपंचाला थोडा आर्थिक हातभार लागावा म्हणून लोक गायींचा सांभाळ करतात हे वास्तव आहे. ते कोणीही नाकारू शकणार नाही. त्यामुळे वसुबारसेला आपण अधिक दूध देणाऱ्या गायींची जोपासना करण्याचा व त्यांचे गोठे वाढविण्याचा, उभे करण्याचा संकल्प करुन तो तडीस नेला पाहिजे. परदेशातून उच्च प्रतीचे सीमेन आणून ते आपल्या जनावरांमध्ये वापरले पाहिजे. चांगला संकर करुन नवीन वाण तयार केले पाहिजेत. 'जुने ते सोने' असे सतत म्हणत राहणे प्रगती व परिवर्तनाला कोलदांडा घालण्यासारखे आहे. काळाची दिशा व गती लक्षात घेऊन बदलणाराच या जीवघेण्या स्पर्धेत टिकू शकेल. दिवाळीच्या निमित्ताने असा डोळस संवाद सुरू होण्याची गरज आहे. आज समाजाला सांस्कृतिक व धार्मिक दहशतवादापेक्षा सुसंवादी भावमनांची व मुक्त वैचारिक देवाणघेवाणीची जास्त गरज आहे. लोकांना जात, धर्म, पंथ, संप्रदाय याच्या आधारे त्रास देवू नका. एकमेकांशी प्रेमाने वागून मैत्रीपूर्ण संवाद ठेवा. संवाद प्रकाशाचे हे कंदील घरोघरी लागणे हीच खरी दिवाळी आहे.



मनाने विचार करणे हे जिवंत समाजमनाचे लक्षण आहे. माणूस हा नुसता विचारशील प्राणी नाही. तो कृतीशील प्राणी आहे. विचार आणि कृती जेथे एकत्र येते तेथे संवादाचा उगम होतो. संवाद ही फार अर्थपूर्ण मानवी शक्ती आहे. संवाद करावा लागत नाही. तो साधावा लागतो. जिथे संवाद साधतो तिथे समाज आपण होऊन नतमस्तक होतो. कारण माणसाला पुढे नेण्याचे सामर्थ्य संवादात असते. संवाद माणसाला स्वतःचे समर्थ भान देतो. आपण नक्की कुठे उभे आहोत? ते दाखवितो. आपण प्रवाही झालो की नाही की दगडाप्रमाणे एका ठिकाणी घट्ट रूतून राहिलो हे दाखवितो. कोणत्याही थोर पुरुषाचे चरित्र उघडून पाहा. थोर पुरुष आधी स्वतःशी वाद घालतो. स्वतःच्या 'स्व'ला घासून पुसून काढतो. त्याचा अनुभव घेतो आणि मग इतरांशी वाद घालतो किंवा संवाद करतो. हा संवाद माणसाला प्रगती पथावर नेण्यासाठी नवा प्रकाश दाखवितो. या प्रकाशाला सगळेजण दाद देतात. असा प्रकाश या दिवाळीत आपल्याला निर्माण करायचा आहे अशी खूणगाठ मनाशी बाळगा. संवादातला हा प्रकाश गरीबीला श्रीमंती देतो. आकाश दिव्यातला दिवा अनंत ध्येयांच्या साक्षीने पुढे जातो. कधी कधी तर तो नक्षत्रांच्या घरात जातो. दिव्यांच्या प्रकाशात तेजाची लेणी कैवल्याची गाणी होतात. प्रकाशात फिरताना अनंत ध्येयांना आपण सोबत घेतल्यासारखे वाटते. आकाशाचा आणि मातीचा हा मैत्रीचा उत्सव माणसाला उजेडाची दिवाळी करतो. पणतीतला प्रकाश संपूच नये असे वाटते. यासाठी संवादाचे तेल अखंडपणे टाकत राहावे लागते. हा संवाद सतत चालू राहणे हीच खरी दिवाळी आहे!

संपादकीय



# दडपण धर्म बेडीचे!

लोकशाहीवादी मानल्या जाणाऱ्या अमेरिका आणि भारत या दोन देशांच्या पाठोपाठ इस्लामी दहशतवाद्यांनी आता फ्रान्स या देशावर लक्ष केंद्रित करुन गेल्या दोन महिन्यात तीन हल्ले तिथे घडवून आणले आहेत. यापूर्वी २०१५ मध्ये 'शार्लीएब्दो' या व्यंगचित्र मासिकाच्या कार्यालयावर आणि २०१६ मध्ये नाइस शहरात बॅस्टिल डे समारंभासाठी जमलेल्या लोकांच्या गर्दीवर ट्रक घुसवून ८० जणांना चिरडण्याचे काम दहशतवाद्यांनी केले होते. या दोन्ही हल्ल्यानंतर तिसरा हल्ला सप्टेंबर २० मध्ये शार्लीएब्दो मासिकाच्या कार्यालयाबाहेर थांबलेल्या काही व्यक्तींवर एका शरणार्थी व्यक्तीकडून चाकूहल्ला झाला. त्यानंतर १८ ऑक्टोबर रोजी वर्गात प्रेषित महंमदाचे व्यंगचित्र दाखविल्याबद्दल सॅम्युअर पॅटी या शिक्षकाची चेचेनवंशीय मुस्लिम तरूणाकडून हत्या करण्यात आली. मोहम्मद पैगंबर यांच्या व्यंगचित्रावरुन वाद सुरू असतानाच २९ ऑक्टोबरला फ्रान्सच्या दक्षिण भागातील भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील नीस या शहरात असणाऱ्या नोत्र देम या चर्चमध्ये चाकूहल्ला होऊन तीन लोक मारले गेले. हल्लेखोर एकटाच होता आणि तो 'अल्ला हो अकबर' च्या घोषणा देत होता. योगायोग असा की याच दिवशी सौदी अरेबियातील जेहादमध्ये फ्रेंच वाणिज्य दूतावासाच्या सुरक्षा रक्षकावरही एका व्यक्तीने चाकूहल्ला केला. दोन्ही ठिकाणच्या हल्लेखोरांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नीसचे महापौर ख्रिस्तीन एस्त्रोसी यांनी नोत्र देम चर्चवरचा हल्ला हा दहशतवादी हल्ला होता असे सांगितले आहे. हल्लेखोर ट्युनिशियाचा नागरिक आहे. त्याचे नाव इब्राहिम इस्साऔ असे असून तो ४७ वर्षांचा आहे. विशेष म्हणजे हल्ला करताना त्याच्याजवळ कुराणाची प्रत होती. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनीही महापौर एस्त्रोसी यांच्या म्हणण्याला दुजोरा देत हा इस्लामी दहशतवादी हल्ला असल्याचा पुनरुच्चार केला. त्यामुळे भावना दुखावलेल्या मुंबईतील काही मुस्लिम नागरिकांकडून भेंडीबाजार परिसरातील रस्त्यावर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांची पोस्टर्स पादचाऱ्यांच्या पायाखाली तुडविली जातील अशा पद्धतीने रस्त्यावर चिकटविण्यात आली होती. नागपाडा परिसरातील रस्त्यांवरही त्याच पद्धतीने चिकटविली होती. पोलिसांनी बंदोबस्त करुन तत्काळ ती पोस्टर्स काढली. पण 'इस्लामी अतिरेक्यांचा हल्ला' हा मॅक्रॉन यांचा आरोप मुंबईतील काही मुस्लिम नागरिकांच्या जिव्हारी लागला. फ्रान्सच्या अध्यक्षांनी धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी माफी मागावी अशी मागणी मुंबईतील रझा अकादमी आणि समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी केली. धर्म व धार्मिक भावना दुखावल्याच्या नावाखाली इस्लामवादी जिहादी गट व दहशतवाद्यांनी जगभर जो धुमाकूळ घातलेला आहे आणि त्यासाठी पवित्र कुराणचा जो खोटा आधार घेतला जात आहे त्यामुळे सगळे जग व कुराणला मानणारे खरेखुरे मुस्लिम लोकही चिंताक्रांत झाले आहेत. दहशतवादी हल्ल्यात अनेक निरपराध मुस्लिमही रोज मारले जाताहेत. तेव्हा या जिहादी दहशतवादी अतिरेक्यांचा कायमचा बंदोबस्त कसा करायचा हा आज जगापुढचा गंभीर प्रश्न बनला आहे.

इस्लाम आणि कुराण या दोन्ही शब्दांचे अर्थ आपण नीट बारकाईने तपासू लागल्यावर आपल्या असे लक्षात येते की या अर्थाच्या विरुद्ध सगळे वागणे चालू आहे. महम्मद पैगंबरांची प्रतिभा ज्या मुलभूत कल्पनेने भारलेली आहे ती कल्पना ईश्वराचे अद्वितीय एकत्व ही आहे. इस्लाम म्हणजे एकेश्वर-शरणता, अशी इस्लामची थोडक्यात व्याख्या केली जाते. पण ध्यानात घेण्याची गोष्ट ही की सारा वैदिक-भक्तिमार्ग एकेश्वर-निष्ठेवरच उभा आहे. 'एकमेवाद्वितीय' अशी वाक्ये निर्गुण-ब्रह्मपर म्हणून सोडून दिली, सगुण परमेश्वर विषयक वाक्येंच विचारात घेतली, तरी एकेश्वर-निष्ठा प्रतिपादक वाक्यें वेदांपासून गीता-भागवतापर्यंत शेकड्यांनी दाखविता येतील. पण भक्तीसाठी ईश्वराचे एकत्व सोइस्कर असले तरी, एकत्वसंख्येशी ईश्वराला निबद्ध करणे म्हणजे ईश्वराला मर्यादा घालण्यासारखेच होते, असे वैदिक तत्त्वज्ञान म्हणते. तदनुसार, ईश्वर एक आहे, अनेक आहे, असंख्येय आहे, शून्य आहे आणि अनंत आहे असे विष्णुसहस्रनाम सांगते. ईश्वर अनेक आहेत. नव्हे, ईश्वर अनेक आहे, एवढे मात्र विसरायचे नाही. पण हा ही भाषेचा खेळ झाला. 'मनवाचातीत तुझें हे स्वरुप' तिथे कोणत्या शब्दाचा काय आग्रह राखायचा? म्हणून, 'तुका

म्हणे जें जें बोला, तें तें साजे या विठ्ठला' हेच खरे. विज्ञानामुळे जग लहान झाले आहे आणि ते सर्व मानवांना जवळ आणू पाहात आहे. अशा स्थितीत मानवी समाज जाती-धर्मात व जमातीजमातीत विभागलेला, विखुरलेला आणि भंगलेला रहावा व प्रत्येक जमातीने स्वतःला उच्च आणि इतरांना नीच समजावे, असे कसे चालेल? आम्ही परस्परांना नीट समजून घेतले पाहिजे. परस्परांचे गुण ग्रहण केले पाहिजेत हेच कुराणचे सार आहे. इस्लामचा अर्थ आहे शांति + हरिशरणता. हे ज्याच्यात आहे तो मुस्लिम आहे. स्वतःला मुसलमान म्हणवून घेणाऱ्यांनी आपण 'शांती + हरिशरणता' चे उपासक आहोत का हे एकदा तपासले पाहिजे. 'कुराण' याचा शब्दशः अर्थ 'संदेश', भाषण सांगणे असा आहे.

कुराणातील काही भाग मक्केत आलेला आहे. मक्केत अधिक वेळा परमेश्वरी संदेश आलेला आहे! परमेश्वराकडून देवदूत महंमदाकडे येई. तो परमेश्वराला संदेश आणी. हा ईश्वरीय संदेश म्हणजे पवित्र कुराण. इस्लामच्या सर्व धर्माला, तत्वज्ञानाला व वागणुकीला हा ग्रंथ आधारभूत आहे, अशी मुसलमानांची श्रद्धा आहे. त्यांच्या मते हा परमेश्वराचा शेवटचा परिपूर्ण ग्रंथ असल्यामुळे या ग्रंथाच्या शुद्धतेची जबाबदारी स्वतः परमेश्वरानेच घेतलेली आहे. म्हणून त्यात नवीन काही आलेले नाही, त्यातून जुने काही गळून पडलेले नाही. मक्केत असताना एकूण ११४ सुऱ्यांपैकी ९० सुरे परमेश्वराकडून पाठविले गेले. हा संदेश पाठविण्याचा जो साक्षात्कार किंवा ज्या साक्षात्कारात संदेश प्राप्त होतो, त्याला 'वही' असे म्हणतात. मक्केतील सुरे काही प्रमाणात उदारमतवाद सांगणारे आहेत. उदाहरणार्थ सुरे काफरून जर घेतला, तर त्यात असे म्हटले आहे की 'हे काफिरांनो मी ज्या वस्तूची उपासना करतो, ती तुम्हाला उपास्य नाही; उपास्य होणार नाही. तुम्ही ज्या वस्तूंची उपासना करता, ती मला उपास्य नाही, होणार नाही; पण म्हणून काय झाले? 'लकुम् दिनुकुम् वलीये दिन'. तुमचा धर्म तुम्हाला असो, माझा धर्म मला असो'. मक्केतील हा उदारमतवाद आज मदिनेतच काय पण जगभर मावळलेला दिसतोय. अन्यथा जिहादी दहशतवाद एवढा फोफावलाच नसता !

सर्व धर्मांमध्ये प्रचंड धार्मिक साहित्य व धार्मिक ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु त्यांचा सर्व लोकांच्या जीवनावर परिणाम झालेला दिसत नाही. जागोजागी मंदिरे, मशिदी आणि चर्च आहेत. सर्व ठिकाणी प्रार्थना चालतात. आरती भजन होते आणि धार्मिक ग्रंथ सुद्धा वाचले जातात. परंतु या सर्वांचा जीवनावर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. धार्मिक ग्रंथात खरे बोलावे असे सांगतात. परंतु सध्या असे म्हणावे लागते की खरे बोलणारा मनुष्य या जगात मिळणे कठीण झाले आहे. कोर्टात खोटे बोलण्याचे शिक्षण दिले जाते. बाजारात खोट्याशिवाय, असत्याशिवाय चालतच नाही. राजकीय चर्चेमध्ये प्रत्येक वाक्या-वाक्यात असत्य असते. साहित्यांत वक्रोक्ति, अतिशयोक्ति अलंकार मानतात. याप्रमाणे बाजारात, व्यापारात, व्यवहारात, कोर्ट, साहित्य आणि राजनीति वगैरे सर्व क्षेत्रात खोटेपणाचीच प्रतिष्ठा प्रचलित आहे. साहित्यात दानाची गोष्ट सुद्धा खूप केली जाते. करूणेवर सुद्धा जोर देण्यात येतो. परंतु सर्व समाजव्यवस्था निर्दय बनविली गेली आहे. आपल्याला शेजाऱ्यांच्या दुःखाची जाणीवही असत नाही, परंतु त्याला दुःखी पाहून सुद्धा आपण सुखी असावे-व्हावे अशी इच्छा करतो. धार्मिक ग्रंथांचा आपल्या जीवनावर परिणाम का नाही याचा विचार कोण व कधी करणार?

जे लोक खोटे बोलतात आणि धार्मिक ग्रंथ ही वाचतात ते ढोंगी आहेत का? काही लोक ढोंगी असतील. परंतु सर्वच ढोंगी नाहीत. ते धार्मिक ग्रंथ श्रद्धेने वाचतात. तरीही ते व्यवहारात निर्दय बनतात. खोट्यानाट्याचा उपयोग करतात. त्याची ही जरूरी आहे असे म्हणतात. परंतु हे सारे उफराटे असे कसे होत आहे याचा सर्व धर्मांच्या मार्तंडांनी बारकाईने व गंभीरपणे विचार केला पाहिजे. काही लोकांनी आपल्या मनात अशी कल्पना केली आहे की धार्मिक ग्रंथांचा उपयोग आवश्यक आहे, परंतु तो परलोकाची प्राप्ती करण्याकरिता. या लोकात त्याचा विशेषसा उपयोग नाही. काही पुस्तकातून या प्रकारची वाक्ये सापडतात. 'कुरल' या पुस्तकातून सुद्धा या अर्थाचे वाक्य मिळते. 'ज्याप्रमाणे परलोकाची प्राप्ती होण्याकरिता भगवंताची कृपा पाहिजे त्याचप्रमाणे या लोकांत पैसा.' 'कुरल'मध्ये दुसरे एक वाक्य आहे. त्यात सांगितले आहे की, 'जशी या लोकांत सुद्धा प्रेमाची जरुरी आहे तशीच परलोकांत हि.' आपल्या मनात लोकांनी अशी वाटणी केली की पैसे मिळविण्याच्या नियमाने काम करुन पैसा मिळवता येईल परंतु काही विशेष प्रसंगी थोडे दान, जप करुन घ्याल तर परलोक मिळविण्याला एवढे पुरेसे होईल. ही रोजाने करायच्या कामाची गोष्ट नाही. कारण रोजाने करावयाच्या कामात या जगाशी संबंध येतो. तरी पण सत्य, प्रेम, करूणा वगैरे गुणांची परलोकाची प्राप्ती करण्याकरिता जरुर आवश्यकता आहे. सारांश, अशा प्रकारे इहलोक आणि थोडा परलोक ही साधला जाईल असा लोक प्रयत्न करीत आहेत. या प्रकारचे लोक

बहुधा निर्दय असतात असे नाही. कधी कधी थोडी दया पण करतात. तेव्हा त्यांना परलोक सुरक्षित बनतो. आणि इतर सर्व व्यवहारही चालू राहतो. परलोक मिळविण्यासंबंधी आपले धर्मग्रंथ आहेत. इहलोकाबाबत त्यात काही नाही अशी गैरसमजूत आपल्या लोकांत झालेली आहे.

दुसरे काही लोक म्हणतात की हे धर्मग्रंथ परलोक प्राप्त करण्याच्या उपयोगाचे आहेत असे नाही, तर ते इहलोक प्राप्त करण्याला उपयोगी आहेत. परंतु इहलोकांत व्यक्तीच्या उपयोगाचे आहेत, समाजाच्या उपयोगाचे नाहीत. आपल्या व्यक्तिगत चित्तशुद्धीसाठी, उन्नतीसाठी त्यांचा उपयोग आहे. परंतु त्याच्यामुळे समाजाचे रक्षण होऊ शकत नाही. आज सर्व धर्मांची हीच अवस्था, स्थिती आहे. ख्रिश्चन धर्मात येशूने अहिंसेचा मोठ्या प्रमाणात उपदेश दिला आहे. ते प्रेम आणि अहिंसा यासाठी कोणत्याही प्रकारचा अपवाद मान्य करीत नाहीत. परंतु त्यांचे अनुयायी आज जगभर शस्त्रास्त्रे विकून हिंसा, असुरक्षितता व संघर्षच वाढवित आहेत. मागची दोन महायुद्धे त्यांच्या अनुयायांमध्येच झाली. ते चर्चमध्ये जातात. येशूवर श्रद्धा ठेवतात. परंतु त्याच बरोबर युद्धामध्ये हिंसा करतात आणि समाजाला हे करावेच लागते असे समजतात. म्हणून येशू आम्हांला क्षमा करील असा युक्तिवाद करतात. याला काय म्हणायचे?

एखाद्या धर्मातून ईश्वरनिष्ठा, सत्यप्रियता, अहिंसापरायणता, सदाचार आणि सौजन्य इत्यादी तत्वे काढून टाकली तर त्या धर्मात काय राहील? जे राहील ते फक्त कर्मकांडाचे निष्प्राण, निरर्थक, निष्क्रिय कलेवर असेल! सत्यनिष्ठा, ईश्वरनिष्ठा, चारित्र्य यांच्या परिपालनात जर धार्मिकता नसेल, तर ती दाढीत आणि शेंडीत सापडेल असे का समजावयाचे? जानव्यात किंवा कृपाणात ती सापडण्याची आशा करावयाची? जटाजुटात किंवा मुंडनात ती दृग्गोच्चर होईल असे म्हणावयाचे की धोतर, पायजमा किंवा लुंगी सारख्या क्षुद्र कर्मकांडाशी तिचा संबंध जोडावयाचा? ज्या आंतरिक गुणांच्या विकासासाठी कर्मकांड आणि बाह्य प्रतीके अस्तित्त्वात येतात त्या गुणांना जर गौण समजण्यात येऊ लागले तर खरा धर्म जगात फळाफुलाला येण्याची आशाच नको!

खरा प्रकार असा आहे की, आम्हांला धर्माबिर्माची काहीही पर्वा नाही. आम्हांला जगात स्वतःची प्रतिष्ठा आणि गौरव वाढवावयाचा आहे. त्यासाठी आम्ही ''आमच्या ईश्वराची'' पूजा करुन ''दुसऱ्याच्या देवाची'' निंदा करतो, हेटाळणी करतो, मूर्त्या फोडतो आणि तेवढ्यावर समाधान झाले नाही तर मंदीर, मशिद, चर्च पाडून टाकतो किंवा त्यात बॉम्बस्फोट घडवून आणतो. याचा अर्थ दुसऱ्यांच्या देवांबद्दल, धर्मस्थळांबद्दल, मंदिरांबाबत आमच्या मनात अनादर, तिरस्कार, द्वेष ठासून भरलेला असतो. यावरुन निष्कर्ष हाच निघतो की आम्हाला धर्मापेक्षा अहंभावाची जास्त तळमळ आहे. आमच्याकडून धर्माचा पुरस्कार जो होतो तो केवळ 'आमचा' धर्म म्हणून! आत्मियता आणि उत्कट भाव असेल तर ते भक्तीच्या लक्षणात गणले जातात आणि त्यांचे पर्यवसान आत्मनिवेदनात होते. पण तत्वतः हा निकृष्ट कोटीचा अहंकार असतो व यास्तव 'माझ्या आणि तुझ्या' देवांत व 'माझ्या आणि तुझ्या' धर्मात संघर्ष निर्माण होतो. हाच तो नलराजाचा अंगठा, की ज्यातून धर्माच्या शरीरात कलीचा प्रवेश होत असतो!

मुसलमान म्हणतो, सर्वश्रेष्ठ धर्म माझा. कारण काय, तर तो लोकतंत्रावर आधारलेला आहे. तो मुसलमानात आपपर असा भेद करीत नाही. पण शिया आणि सुन्नींमध्ये जो काही जगभर संघर्ष चालू आहे ते पाहिल्यावर धर्म एक असला तरी राष्ट्र एकजीव व शांत राहू शकत नाही याचीच साक्ष पटते. आणि हाच लोकतंत्रवादी मुसलमान मुस्लिमेतर सत्पुरुषांना काफीर मानतो, नापाक समजतो, जीवनाच्या परमश्रेष्ठ गतीला तो पात्र नाही असे मानतो.

ख्रिस्ती म्हणतो, धर्म श्रेष्ठ जर असेल तर तो माझाच. कारण त्याचे अधिष्ठान दया, क्षमा, शांती, करूणा आहे; पण याच ख्रिस्त भक्ताची इतर धर्मियांसंबंधी अशी भावना असते की, ती वाट चुकलेली मेंढरे आहेत. त्यांना कळपात आणण्यासाठी तो बरे वाईट प्रयत्न करीत असतो.

हिंदू म्हणतो, सर्व धर्मात धर्म जर श्रेष्ठ असेल तर तो माझाच. कारण त्यात व्यक्तिवशिष्ठ्याचा समष्टिगत ऐक्याशी सुंदर समन्वय साधला आहे. भेदात अभेद पाहण्याची कला तो शिकवितो. कुणाला लालूच दाखवून, धाकदपटशा करुन किंवा मारुन झोडून, सक्तीने किंवा लव्ह जिहादी तंत्र वापरून तो बाटवीत नाही. हिंदू बनण्याचा आग्रहही धरीत नाही. सहिष्णुता व सेक्युलॅरिझम हा त्याचा पाया आहे. इतरांना तो धर्मभ्रष्ट करु इच्छित नाही. प्रत्येकासाठी स्वधर्म श्रेष्ठ आणि मुक्तिदायक आहे असा हिंदू धर्माचा सिद्धांत आहे.

हे सर्व बोलताना किंवा ऐकताना फार बरे वाटते. एका दृष्टीने त्यात वावगेही काही नाही. पण जगातील सर्व धर्मांची आजची स्थिती व वागणे पाहिले तर कथनी आणि करणी यात किती प्रचंड महदंतर आहे हे लक्षात आल्याशिवाय

राहात नाही. हे संपादकीय लिहित असतानाच म्हणजे ३ नोव्हेंबरला दहशतवादी हल्ल्याने ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना हादरली आणि या हल्ल्यात ४ ठार १७ जखमी अशी बातमी आली. ऑस्ट्रियाचे चान्सलर सेबेस्टियन कुर्ज यांनी ''दहशतवाद्यांसमोर कधीच झुकणार नाही. हल्ल्याचा मास्टरमाइंड शोधून काढू.'' अशी लगेच प्रतिक्रियाही दिली. क्रियेला उत्तर म्हणून लगेच प्रतिक्रियाही येते असे म्हणतात. (Every Action there is equal reaction असा नियमच आहे.) या न्यायाला धरून फ्रान्सने इस्लामिक कट्टरवादी आणि दहशतवाद्यांविरुद्ध आक्रमक पवित्रा कायम ठेवत २९ ऑक्टोबरच्या चर्चवरील हल्ल्याचा वचपा म्हणून ३० ऑक्टोबरला आफ्रिका खंडातील माली देशामध्ये एअरस्ट्राईक केला. त्यात अलकायदाच्या ५० दहशतवाद्यांचा खात्मा झाला. ४ दहशतवाद्यांना जिवंत पकडण्यात आले. एअरस्ट्राईकपूर्वी फ्रान्सच्या संरक्षणमंत्री फ्लोरेन्स पार्ले यांनी नायजरचे राष्ट्रपती महामदौ इरसोफो यांच्याशी चर्चा केली. त्यानंतरच फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी दोन मिराज फायटर जेट आणि मिसाईलवाहू ड्रोनमधून अन्सार-उल-इस्लाम या अल कायदाशी संबंधित गटाच्या दहशतवाद्यांवर हल्ले करण्यास परवानगी दिली. आता प्रश्न असा आहे की हल्ल्याला प्रतिक्रिया म्हणून हल्ले करुन दहशतवाद कायमचा बंद होणार आहे का? याचे मूळ नेमके कशात आहे हे कोण व कधी शोधणार? इस्लामच्या तत्त्वज्ञानात जर याचे मूळ असेल तर हे तत्वज्ञान काळानुरूप बदलून सुसंगत करण्याचा कार्यक्रम जगातले मुस्लिम मुल्ला मौलवी व धर्मपंडित हाती घेणार की नाही? इस्लामचे स्पष्टीकरण करणारे जे धर्मपंडित असतात, त्यांना 'उलेमा' म्हणतात. धर्मशास्त्राच्या ज्ञानामुळे हे उलेमा धर्मसभेचे सदस्य होतात. इस्लाममध्ये राजसत्ता व चर्चा एकच आहे. म्हणून धर्मसभा व संसद एकच आहे. खलिफा हाच धर्मगुरु व सम्राट असतो. या धर्मसभेला 'जमहूर' असे म्हणतात. हा जमहूर धर्मशास्त्र पाहतो व कायदे करतो, न्यायदान करतो, राजाला सल्ला देतो. हे इस्लाममधील लोकशाहीचे स्वरुप आहे. खुद्द मुसलमानांनाच मतदानाचा, प्रतिनिधी निवडण्याचा हक्क नाही. स्वतंत्र विचार केल्यास देहदंडाची शिक्षा आहे. हक्क फक्त धर्मपंडितांना-तोही धर्मशास्त्र पाहून. असे इस्लामी लोकशाहीचे स्वरूप असताना इस्लामने जगातील आदर्श लोकशाही निर्माण केली असे म्हणता येईल का?

तत्त्वज्ञानात इस्लामचे तत्त्वज्ञान परिपूर्ण द्वैताचे तत्वज्ञान आहे. वस्तुहून वस्तु निराळी, जिवाहून जीव निराळा, मुसलमान जीवाहून बिगर मुसलमान जीव निराळा, पुरूषाहून स्त्री निराळी, या सर्वांच्यापेक्षा प्रेषित निराळा, त्याहून परमेश्वर निराळा, असे हे परिपूर्ण द्वैताचे तत्त्वज्ञान आहे. धार्मिक तत्त्वज्ञानात अद्वैती तत्त्वज्ञाने समाजविन्मुख कर्तव्यच्युतही करु शकतात. द्वैताचे तत्वज्ञान मात्र गुलामीशिवाय दुसरे काहीच देऊ शकत नाही. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मते द्वैताचे तत्त्वज्ञान जीवनातील नीतिमत्तेचा पायाच उध्वस्त करते. कारण परमेश्वर सर्वश्रेष्ठ असतो. त्याला सर्वस्वी शरण जायचे असते. परिपूर्ण द्वैत सांगणाऱ्या या तत्वज्ञानातून समानता व व्यक्तिस्वातंत्र्य निर्माण होणे शक्यच नव्हते. त्यामुळे तेथे समाजवाद व लोकशाही यांना वावच नव्हता. शिवाय, हे द्वैती तत्वज्ञान शस्त्रबळावर विजयी होणाऱ्यांचेच होते. जे तत्वज्ञान अनुयायांनाच विनाअट शरणागती मागते, ते तत्वज्ञान जितांना प्रतिष्ठा देणार तरी कसे? इस्लामच्या धर्मशास्त्राने मुसलमान कडवा आणि तलवारीवर श्रद्धा ठेवणारा बनविला. मक्कावासियांनी मदिनेवर हल्ला केला नसता तर जिहाद सुरु झालाच नसता. म्हणून जिहाद हा इस्लाममधील धर्मप्रचाराचा नित्य धर्म नव्हे, तर स्वसंरक्षणाचा आपध्दर्म.

कोणत्याही धर्मात किंवा समाजजीवनात धार्मिक चिकित्सा हीच सर्व चिकित्सकपणाची मूलगामी व मानवाच्या आधुनिकतेचा आरंभ असते. धर्म पवित्र असतो. अनुयायी तो अपवित्र व भ्रष्ट करतात, हे म्हणणे एका मर्यादेपर्यंत खरेच आहे, पण या म्हणण्याच्या खरेपणाला मर्यादा आहे. धर्म हीच मुळात मानव निर्मिती असल्यामुळे ती कालाने मर्यादित झालेली, परिस्थितीने मर्यादित झालेली, पुष्कळशी पवित्र, पण पुष्कळदा काही अशुद्ध, अपवित्र हे ही जतन करणारी एक निर्मिती असते. काळ बदलला, म्हणजे हे सारे धर्मही एक बेडी होतात. समाजाच्या एका अवस्थेत जी उदारता असते, जी इष्टता असते, जे संरक्षण असते, त्याच बाबी समाजाच्या दुसऱ्या अवस्थेत अनुदार, अनिष्ट असे दडपण ठरतात. सगळेच धर्म सारखेच खरे व चांगले आहेत, या उदार भूमिकेला धर्मश्रद्ध मध्ययुगाची मर्यादा आहे. ती ओलांडून सगळे धर्म सारखेच खोटे असून सगळेच कालबाह्य झालेले आहेत, या सत्य व उदारतेपर्यंत आधुनिक काळात जावे लागेल. त्यासाठी आपली तयारी आहे का?

जळगाव जिल्ह्यातील दिग्गज नेते एकनाथ खडसे
मा. शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.




# नाथाभाऊंमुळे खानदेशात

यांनी भारतीय जनता पक्षाला रामराम ठोकत
मुंबई येथे झालेल्या या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तांत...




# पक्षवाढीला गती मिळेल

## शरद पवार




# नाथाभाऊंच्या साथीत सामान्य माणसाला अडचणींतून बाहेर काढू

## राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांची ग्वाही

आजचा दिवस हा अतिशय आनंदाचा दिवस आहे. संबंध महाराष्ट्राचा, संघटनेचा ज्यावेळी मी विचार करतो, त्यावेळेला एक बदल दिसतो, नवी पिढी मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादीमध्ये सहभागी होण्यासाठी मोठी उत्सुक आहे आणि दिवसेंदिवस शक्ती वाढतेय लोकांचं काम करण्याच्यासाठी. या संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता कष्ट करतोय अशा प्रकारचं चित्र दिसतंय. पण काही ठिकाणी संघटनेचं काम अधिक वाढवायची गरज आहे, अशा ठिकाणांचा विचार ज्यावेळी मी करतो, त्यावेळी खानदेश माझ्या नजरेसमोर येतो. मग धुळे असेल, जळगाव असेल, नंदूरबार असेल, या सगळ्या परिसरामध्ये आपल्याला अधिक काम करण्याची गरज आहे. अनेक सहकारी गेले अनेक वर्षांपासून याठिकाणी कष्ट करतायंत, राबतायंत. पक्ष वाढवायचा प्रयत्न करतायंत. पण त्याला खऱ्या अर्थानं गती यायची असेल, तर नाथाभाऊच्या आजच्या निर्णयामुळं ती गती येईल, याच्याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही.

हा खानदेश एकेकाळी गांधी–नेहरूंच्या विचारानं वाढलेला खानदेश म्हणून याचा लौकिक होता. काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्याच्यानंतर देशातली पहिली राष्ट्रीय काँग्रेस ग्रामीण भागामध्ये कुठं झालेली असेल, तर ती जळगाव जिल्ह्यामध्ये झाली. आणि हा सगळा परिसर काँग्रेसच्या विचाराचा होता. मला आठवतंय, की अनेकांच्या बरोबर मी या जिल्ह्यात काम केलंय एका काळामध्ये. साधी माणसं, पक्षाच्या संबंधी अतिशय निष्ठा असलेले लोक, विचाराच्या बाहेर कधीही जायचं नाही अशा प्रकारची भूमिका घेणारे लोक आणि हा विचार, ही विचारधारा ही विशेषत: जळगाव जिल्ह्यामध्ये घराघरामध्ये म्हणजे एकेकाळी होती. म्हणजे मला आठवतंय, की जळगाव जिल्ह्यामध्ये पूर्वी मी गेल्याच्यानंतर गावात गेल्याच्यानंतर स्वागताचा नारळ कुणी हातात दिला, त्याच्यावर हातरूमाल असायचा, तो हातरूमालसुद्धा खादीचा असायचा. एवढं त्या खादीच्या संबंधीचं प्रेम या जिल्ह्यामध्ये होतं.

अनेक नेते होऊन गेले. देशाच्या राष्ट्रपती तिथनं होऊन गेल्या. प्रतिभाताई. माझ्याबरोबर ज्यांनी काम केले, ते ज्येष्ठ म्हणून मधुकरराव चौधरी त्याठिकाणी होते महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये. अध्यक्ष होते. नंतरच्या काळामध्ये अरूणभाईंनी अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली होती. माझ्याच काळामध्ये सुरूवातीच्या दोन केएम, एक केएम भाऊसाहेब आणि दुसरे केएम बापूसाहेब. मला माहिती नाही, जुन्या लोकांना कदाचित माहित असेल, पण नव्यांना माहिती आहे की नाही, पण यांचं अतिशय महत्त्वाचं योगदान या जिल्ह्यामध्ये असे. अनेक लोक मला आठवतात. कशाचीही अपेक्षा नाही. गो. तु. पाटील, ओंकार अप्पा, अनेकांची नावं मला सांगता येतील आणि या सगळ्या माणसांनी आपलं आयुष्य हे समाजाच्यासाठी दिलं.

म्हणजे मी ज्यावेळेला तरूणांच्यामध्ये महाराष्ट्रात काम करत होतो पक्षामध्ये, त्यावेळी अनेकदा तुमच्या जिल्ह्यामध्ये आलो. आम्हा सगळ्यांची कार्यकर्त्यांच्या घरी उतरायची पद्धत असायची आणि जिल्ह्याच्या दौरा करायचा म्हटल्याच्यानंतर एसटीनं दौरा असायचा. त्यावेळेला काँग्रेस कमिटीमध्ये एक काळकर नावाचे गृहस्थ होते, ते पक्षाच्या संबंध संघटनेचं काम बघायचे आणि दौरा पक्षाचा ठरल्याच्यानंतर सकाळी दशम्या, पिशवी घेऊन गावोगाव जायच्यासाठी आम्हाला कार्यक्रम तयार करून द्यायचे आणि मी जवळपास सगळ्या जिल्ह्यामध्ये अनेकदा त्याठिकाणी गेलेलो आहे. तर सांगायचं तात्पर्य, एका निष्ठेनं काम करणारा जिल्हा म्हणून हा जिल्हा होता आणि गांधी–नेहरूंच्या विचारानं जाणारा जिल्हा होता. पण, मध्यंतरी एक असा काळ येऊन गेला, की त्या काळामध्ये ही काँग्रेसच्या विचारधारेला उतरती कळा लागली आणि त्याच्यामध्ये नवी पिढी उभी करण्याच्या संबंधाची कामगिरी ज्यांनी केली, त्यामुळं खरं म्हटलं तर तिथलं काँग्रेसचं चित्र घसरलं आणि ती नवी पिढी कुणी उभी केली असेल तर ती नाथाभाऊंनी उभी केली. त्यानंतरच्या काळामध्ये त्यांनी आत्ताच हिशोब सांगितला, की एवढे खासदार, एवढे आमदार, एवढे जिल्हा परिषद, एवढ्या पंचायत समित्या, तिथं जिल्हा बँक, दूध संघ



या सगळ्या ठिकाणी आपलं वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या संबंधी या जिल्ह्यातला कार्यकर्ता यशस्वी झाला आणि त्याच्या पाठीमागं नाथाभाऊंसारखी एक सक्षम शक्ती आणि लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या संबंधी आस्था असलेली एक व्यक्ती ही त्याच्यामागं होती, त्यामुळं खऱ्या अर्थानं आज त्याठिकाणचं चित्र बदललेलं पहायला मिळतंय.

इतिहासातला पहिला टप्पा संपला. आता दुसरा टप्पासुद्धा संपतोय. त्यांनी सांगितलं आत्ता, की आता तो शब्द त्यांनी त्याठिकाणी दिलेला आहे आणि त्यामुळं यत्किंचितही चिंता करण्याबद्दलचं काय कारण नाही.

आपल्यापुढं प्रश्न खूप आहेत. अतिवृष्टी झाली. नुकसान झालं अनेक ठिकाणी. महाराष्ट्रात विशेषत: मराठवाड्यामध्ये, कोकणामध्ये फार नुकसान झालं. आपल्याही भागामध्ये काही प्रमाणात नुकसान झालं. हे दुरूस्त करायचंय. मला आनंद आहे, की मंत्रिमंडळातले मंत्री याठिकाणी आहेत. या सगळ्यांनी बसून आत्ता इथे



यानंतरच्या काळामध्ये हा जिल्हा पुन्हा एकदा राष्ट्रवादी विचारानं चालणारा या प्रकारचं चित्र उभं करण्याच्यासाठी आम्ही सगळ्यांना बरोबर घेऊन आम्ही याठिकाणी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहोत आणि तो रिझल्ट तुम्हाला बघायला मिळेल. हा जाहीरपणानं शब्द आपल्या सगळ्यांना त्यांनी दिलेला आहे. नाथाभाऊंची एक गोष्ट आहे, की एखादी गोष्ट करायची म्हटल्याच्यानंतर मग मागं-पुढं नाही. याच्यामध्ये होणार म्हणजे होणार. शब्द दिला म्हणजे शब्द दिला. येण्याच्यापूर्वी दहा हजार कोटीचं पॅकेज शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्याच्यासाठी जाहीर केलं आणि सगळे कार्यक्रम हे तातडीनं करण्याच्याबद्दलचा विश्वास त्यांनी दिला. आत्ता मी बघत होतो टीव्हीवर, चर्चा चालू होती, की पण मिळणार कधी? थोडं असं आहे, की ज्याची जमीन खरवडून गेली, त्याची जमीन नीटनेटकी करायला काय दोन दिवसात होत नसती. त्यासाठी काळजी घ्यावी लागते. माती आणावी लागेल, कष्ट करावं लागेल. आत्ता रानामध्ये

चिखल आहे, त्या चिखलामध्ये कामं होणार नाहीत. अनेक अडचणी आहेत. पण माझी खात्री आहे, की आज याठिकाणी सत्तेवर बसलेले हे सरकार या कष्टकऱ्याच्या, या शेतकऱ्याच्या पाठीशी मजबुतीनं उभं राहिल्याशिवाय राहणार नाही, याच्याबद्दल माझ्या मनामध्ये पूर्ण विश्वास आहे आणि ते चित्र याठिकाणी बघायला मिळेल.

गेले काही दिवस महाराष्ट्रातलं टेलिव्हिजन एकच बातमी देत होता, नाथाभाऊ, नाथाभाऊ. मी बघतोय गेले नाही, पण त्यांनाही किती दिवस तुम्हाला हॉस्पिटलला राहायला लागलं. वीस दिवस. व्हेंटिलेटरवर. हे कोरोनाच्या संबंधीचं संकट. कारण आपण लोकांच्यामध्ये राहणारी लोकं आहोत आणि त्यामुळं वेळप्रसंगी धोका लक्षात येऊनसुद्धा जनतेशी बांधिलकी असल्यामुळं ती बांधिलकी सोडायची नाही हा निकाल घेतला आणि त्यामुळं अडचणींमध्ये आले. आज राज्य सरकारमध्ये काम करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांच्यापैकी मला असं वाटतंय, की जितेंद्र



दोन-तीन दिवस. आता आज काय तरी वेगळंच, तिरकस चित्र दिसलं. मध्येच जाहीर करून टाकलं आमच्या काही मित्रांनी, की अजितदादा नाराज आहेत. खरं? कशाला नाराज आहेत? असं आहे, की या कोरोनाच्या संकटामध्ये प्रत्येकाची काळजी घ्यावी लागते आणि काळजी घेण्याच्यासंबंधीची सूचना आम्ही सगळ्यांना दिली आहे. आज याठिकाणी व्यासपीठावर आहेत, जितेंद्र आव्हाड. जितेंद्र आव्हाड गृहनिर्माण खात्याचे मंत्री, मला आठवत आव्हाडांना त्रास झाला. संजय बनसोडेंना त्रास झाला. मला असं वाटतं, आपले सहकार मंत्री बाळासाहेबांना त्रास आहे. हसन मुश्रीफांना त्रास झाला. धनंजय मुंडेंना त्रास झाला आणि त्यामुळं आपण या सगळ्यांच्या बाबतीत काळजी घेतो आहोत. काही दिवस थांबा म्हणून सांगतो आहोत. लोकांच्यात आपण सतत आहोत. त्यामुळं अशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावं लागतंय आणि त्यासाठी आपण अधिक खबरदारी घ्यावी आणि त्या खबरदारीच्यासाठी आपले कुणी




सहकारी आज याठिकाणी दिसले नाहीत तर लगेच काहीतरी गडबड झाली. काही गडबड नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा शेवटचा कार्यकर्तासुद्धा आज महाराष्ट्र संकटामध्ये असताना पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन त्याठिकाणी संकटग्रस्त माणसांच्यासाठी पडेल ते कष्ट आणि खस्ता खाण्याच्यासाठी त्याठिकाणी तयार आहे, याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. आणि त्याच्यात आता नाथाभाऊंची भर पडलेली आहे. त्यामुळं काही आपण अपेक्षा करू नये.

काही वृत्तपत्रांनी दिलं, काही मंत्रिमंडळाची मागणी केली. मी तुम्हाला स्वच्छ सांगतो, माझ्या आधी जयंतराव, अजित पवार, भुजबळ साहेब, नाथाभाऊ या सगळ्यांची बैठक होऊन पूर्वी चर्चा झाली. पण माझ्याबरोबर चर्चा झाल्याच्यानंतर एका शब्दानेसुद्धा त्यांनी हे सांगितलं नाही, की ही माझी अपेक्षा आहे. त्यांनी एवढंच सांगितलं, चाळीस वर्षे मी कष्ट केले, आज दुर्दैवानं मला हा निर्णय घ्यावा लागतोय, पण हा निर्णय घेत असताना पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या सामान्य माणसाची बांधिलकी ठेवण्याच्यासाठी पडेल ते कष्ट कशाचीही अपेक्षा न करता करण्याची माझी भूमिका आहे आणि त्यासाठी आपण एकत्र काम करावं एवढीच माझी अपेक्षा आहे. यापेक्षा त्यांनी काही सांगितलं नाही.



त्यामुळं आज काही बातम्या आल्यात. कोण मंत्री होतंय, कुणा मंत्र्याला घरी पाठवणार. असं काही नाही. काही बदल नाही. सगळे जण आहे त्या ठिकाणी आहेत. राहतील आणि माझी खात्री आहे, की आज जयंतरावांच्या नेतृत्वाखाली ही संघटना जशी काम करतेय, त्या जयंतरावांच्या बरोबर काम करत असताना त्यांना नाथाभाऊंच्यासारखा एक ज्येष्ठ, अनेक वर्षांचा अनुभव, संघटनेचा अनुभव, प्रशासनाचा अनुभव अशा व्यक्तिमत्वाची साथ मिळाल्याच्यानंतर आपण या राज्यातल्या या सगळ्या अडचणींतून सामान्य माणसाला बाहेर काढू याची पूर्णपणानं खात्री आज मला याठिकाणी वाटते. त्यासाठी त्यांचं अंत:करणापासून याठिकाणी मी स्वागत करतो. त्यांनी जे सांगितलं, की जरा या कोरोनाच्या संकटातनं बाहेर गेल्याच्यानंतर आपण सगळेजणं जळगावला जाऊ, जळगावला त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात एक जबरदस्त शक्तीचं प्रदर्शन, नवे-जुने अशा सगळ्यांना बरोबरीने घेऊन आपण करून दाखवू आणि पुन्हा एकदा नाथाभाऊ काय चीज आहे, हे संबंध महाराष्ट्राला दाखवण्याची परिस्थिती करू. एवढंच याठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■■



# पिक्चर अभी बाकी है।

**जयंत पाटील**



१९९० साली पहिल्यांदा भारतीय जनता पक्षाच्या वतीने खडसे साहेब महाराष्ट्राच्या विधानसभेत आले आणि मला आठवते की, तेव्हापासून मीही सभागृहात आहे. मधुकरराव चौधरी विधानसभेचे अध्यक्ष असताना असे अनेक प्रसंग घडलेले आहेत, ज्यामध्ये खडसे साहेब यांनी विधिमंडळाचा एक सदस्य काय करू शकतो हे दाखवून दिले. नंतरच्या काळात आपलं सरकार आलं आणि एक विरोधी पक्ष नेता सक्षमपणाने म्हणून खडसे साहेबांची कारकिर्ददेखील आम्ही सगळ्यांनी पाहिली. २०१४ साली आपलं सरकार गेलं. भारतीय जनता पक्षाच्या पुढाकारानं नवीन सरकार आलं आणि खडसे साहेबांसारखा एक दिग्गज नेता त्या सरकारमध्ये मंत्री झाला. पण चार-पाच वर्षात अशा काही घटना झाल्या, की पहिल्या रांगेत बसलेल्या नेत्याला जाणीवपूर्वक, कट-कारस्थानं कदाचित झाली असतील, मी त्याच्यावर भाष्य आज करत नाही, पण पहिल्या रांगेत बसलेल्या नेत्याला सभागृहातील मागच्या रांगेवर जाऊन बसवण्याचं काम हे भारतीय



जनता पक्षात झालं. सभागृहात हे सगळे प्रश्न आम्ही मांडले. मला वाटतं, सभागृहात खडसे साहेबांवर जो अन्याय चालू आहे त्याच्यावर सगळ्यात जास्त मीच बोललो असेन.

मी साहेब एक प्रश्न विचारलेला होता. त्याचं उत्तर अजूनही महाराष्ट्राला मिळालेलं नाही. कटाप्पाने बाहुबली को क्यो मारा ? पण पवार साहेब, मी हा प्रश्न ज्यावेळी विचारला त्यावेळी समोरच्या बाजूने सगळे गालात हसत होते. आजही त्या प्रश्नाचं उत्तर नाही. मला खात्री आहे. आजही ते टीव्ही बघत असतील आणि त्यांना आज कळलं असेल, की टायगर अभी जिंदा है. आणि आज त्यांना कळेल, की अभी भी पिक्चर बाकी है. महाराष्ट्राच्या राजकारणात सूडाचं राजकारण कधीही आम्ही ऐकलेलं नव्हतं. तशी आपली महाराष्ट्राची संस्कृतीच नाही. प्रश्न सोडवणं, एकमेकाला सहाय्य करणं, अगदी विरोध पक्षात असला तरी त्याच्या सकारात्मक उपयोगी पडण्याचं काम हे अगदी यशवंतराव चव्हाण साहेबांच्यापासून पवार साहेबांच्यापर्यंत आम्ही सगळ्यांनी पाहिलं. बऱ्याच वेळा आम्ही तरूण असताना आम्हाला प्रश्न पडायचा, की एवढा मोठा विरोधक पण पवार साहेब असे कसे काय त्यांच्याशी गोड बोलतात. पण राजकारणामध्ये सुसंस्कृत महाराष्ट्रात याच पद्धतीनं राजकारण करायचं ही भूमिका चव्हाण साहेबांनी अतिशय जाणीवपूर्वक महाराष्ट्रातल्या तेव्हाच्या पिढीत रूजवली. आणि म्हणून महाराष्ट्रात कधी अशा पद्धतीचं अडचणीत आणण्याचं राजकारण कधी झालं नाही. मागच्या चार-पाच वर्षात त्याचा अनुभव महाराष्ट्रातल्या अनेक कार्यकर्त्यांना आला.

आज माननीय पवार साहेब, ज्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस २०१९च्या निवडणुकीच्या आधी आम्ही सगळे पवार साहेबांच्या बरोबर त्यांच्या नेतृत्वाखाली काम करत होतो. लोकसभेची निवडणूक झाली. लोकसभेचा मोठा फटका आमच्या पक्षाला बसला. विधानसभा आली. भले भले लोकं, ज्यांच्यावर पवार साहेबांनी अनेक वर्षे विश्वास टाकला, अनेक जबाबदाऱ्या दिल्या, त्यांच्या संस्थात्मक उभारणीत तर पवार साहेबांनी पराकाष्ठेचे प्रयत्न करून महाराष्ट्रातील काही कार्यकर्त्यांचे नेते घडवले. अशी माणसेही आम्हाला सोडून निघून गेले. आम्ही सगळे ठामपणानं या विचारावर श्रद्धा ठेवून होतो, की महाराष्ट्राच्या राजकारणात पवार साहेबांचा विचारच महाराष्ट्रातील जनता स्वीकारेल. स्वीकारल्याशिवाय राहणार नाही. पवार साहेबांना ईडीची नोटीस देण्यापर्यंत मजल गेली. पवार साहेबांनी भूमिका घेतली, की चला, ईडीच्या ऑफिसमध्ये जाऊ आणि त्यांना विचारू की काही माहिती हवी असेल तर आत्ताच घ्या. कारण प्रचाराला बाहेर पडल्यानंतर मला वेळ मिळणार नाही. अशा सगळ्या घटना आपल्या डोळ्यासमोर आहेत. मी त्या सगळ्याची उजळणी घेण्याची आणि वेळ घेण्याची गरज नाही. पण पुन्हा महाराष्ट्रात पवार साहेबांच्या अपार कष्टाने, अपार प्रयत्नाने ७९ वर्षांचा हा नेता महाराष्ट्रभर

फिरला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गेला. महाराष्ट्रातल्या जनतेने प्रचंड अशा प्रकारची ताकद त्यांच्या सभांना, त्यांच्या कामाला, त्यांच्या प्रत्येक आगमनाला प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक गावात निर्माण केली. महाराष्ट्रातला तरूण कार्यकर्ता खवळून उठलेला. पवार साहेबांच्या बाबतीत हा विचार जर तेव्हाचं सरकार करत असेल तर आम्ही सगळे पवार साहेबांच्या बरोबर आहोत ही महाराष्ट्रभर भावना निर्माण झाली आणि त्यातून आज या सरकारचा पाया रचला गेला असं मी समजतो.

आज आमचं तीन पक्षांचं सरकार आहे. आत्ताच मी आलो, त्यावेळी आमची चर्चा झाली, की महाराष्ट्रात जिथं अतिवृष्टी झाली, पूर आला, त्या सर्व जिल्ह्यांत अनेक ठिकाणी स्वत: पवार साहेब गेले. आमचे सगळे नेते गेले. त्या सगळ्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी थोड्या वेळापूर्वीच आमच्या राज्य सरकारने दहा हजार कोटी रूपयांचं पॅकेज जाहीर केलं आणि त्या शेतकऱ्यांना ताबडतोब मदत करण्याची भूमिकादेखील जाहीर केली. मी त्या मिटिंगमधूनच मघाशी आलो. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडायचं नाही ही आमची सगळ्यांची कायमची भूमिका आहे. पण अलिकडच्या काळामध्ये केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या संदर्भात काही कायदे केले. त्या कायद्यातून आधारभूत किंमतीला धक्का लागेल अशी भीती महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या शेतकऱ्यांच्या मनात आज निर्माण झाली आहे. मार्केट कमिटीमध्ये माल नाही आणला आणि बाहेर विकला तर त्याला आधारभूत किंमत लागू होणार की नाही आणि लागू करण्यासाठी कोणती सक्षम व्यवस्था राबविणार याचा या देशातल्या राजकर्त्यांनी अजून विचार केलेला नाही किंवा स्पष्टीकरण दिलेले नाही.

महाराष्ट्रातल्या कामगार कायद्यातही प्रचंड बदल झाले. महाराष्ट्रातल्या कामगार कायद्यात तीनशेपेक्षा कमी कामगार असतील तर त्याठिकाणी तुम्ही युनियन तयार करू शकत नाही किंवा त्या कामगारांना घरी पाठवण्यासाठी किंवा कारखाना बंद करण्यासाठी काही परवानगी लागत नाही. आता असा एक वेगळा नियम तयार झालांय. म्हणजे महाराष्ट्रात एका बाजूने शेतकऱ्यांच्यावर काही संकटे निर्माण झाली आहेत. दुसऱ्या बाजूने कामगारांच्यावर संकटे निर्माण झालेली आहेत आणि सगळं उद्योगधार्जिणं काम हे जर दिल्लीहून होत असेल तर त्यालादेखील महाराष्ट्रातला शेतकरी आणि कामगार एकसंघ करून आपल्याला त्यांच्यापुढं लढा उभा करण्याची गरज आहे. भले, आपण आज सरकारमध्ये असू, पण अशा कायद्यांनी तुमच्या आमच्या हक्काच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत, त्या हक्कांना आपल्याला, शेतकऱ्यांना आणि कामगारांना, जे संरक्षण आहे, त्याला धक्का लावण्याचं धाडस जर केंद्रातून कुणी करत असेल तर त्यासाठीदेखील आपल्याला भविष्य काळात ताकदीनं एकत्र व्हावं लागेल.

अनेक गोष्टी आहेत. या सगळ्याच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अधिक भक्कम करणं, अधिक ताकदीनं पुढं नेणं हे आम्हा सर्वांचं कर्तव्य आहे. खडसे साहेब, हे पवार साहेबांचं कुटुंब आहे. देशात अनेक पक्ष आहेत. मला याची जाणीव आहे. पण हे सगळे पक्ष जे आहेत, त्या पक्षांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस हा असा पक्ष आहे, जो कार्यकर्त्यांच्या भावनेचा



विचार करणारा पक्ष आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असा पक्ष आहे, की कार्यकर्त्याच्या अडीअडचणीला धाऊन जाऊन त्याठिकाणी उभा राहून त्याला मदत करणारा पक्ष आहे आणि हा सगळा गुण पवार साहेबांच्यातून महाराष्ट्रातल्या राष्ट्रवादी कार्यकर्त्यांत, प्रत्येकात रूजवण्याचं काम मागच्या अनेक वर्षांत झालंय. आमचा पक्ष लहान होता. पण हळूहळू या पक्षाची ताकद महाराष्ट्रात वाढली, ती फक्त पवार साहेबांच्या स्वभावामुळं आणि त्यांच्या नेतृत्वामुळं वाढली असं मला वाटतं. आज महाराष्ट्रातल्या कुठल्याही कोपऱ्यात एखादं संकट आलं तर तिथला शेतकरी पहिला विचार करतो, की पवार साहेबांना हा प्रश्न सांगूया. साहेब, देशाचे कृषि मंत्री होते. केरळचादेखील शेतकरी आपल्या सुपारीच्या बागेवर काही संकट आलं तर पवार साहेबांच्याकडं बघायचा. काश्मिरचादेखील शेतकरी, त्यांच्या सफरचंदाचे काही प्रश्न निर्माण झाले तर पवार साहेबांच्याकडं धाऊन जायचा. मी हे यासाठी सांगतोय, की पवार साहेब या पक्षाची खरी ताकद आहे. पवार साहेबांच्या जीवावर आम्ही राज्यात राजकारण करतोय, देशात अनेक कार्यकर्ते काम करतायंत. आणि अशा या जिव्हाळ्याच्या पक्षात, ज्या पक्षामध्ये कार्यकर्त्याला आणि विशेषत: तरूणाला जास्त संधी देण्याची प्रवृत्ती पवार साहेबांची आहे.

मला आठवतंय, १९९८-९९ला सरकार आलं,



त्यावेळी अनेक दिग्गज होते. अनेक मान्यवर आमच्या पक्षात होते. पण त्याऐवजी महाराष्ट्रामध्ये आर. आर. पाटलांच्यासारख्या नेत्याला, महाराष्ट्रामध्ये अनिल देशमुखांच्यासारख्या, अजितदादांच्यासारख्या, राजेश टोपेंच्यासारख्या अशा माझ्यासारख्या कार्यकर्त्याला त्यावेळी म्हणजे ज्यावेळी आम्ही वयाच्या ३७-३८व्या वर्षाचे होतो, त्यावेळी डायरेक्ट मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून संधी दिली. मी साहेबांना म्हटलं, की ही फार मोठी जबाबदारी आहे. ते म्हटले, की नाही, महाराष्ट्र उभा करायचा आहे आणि तो उभा करायचा म्हणजे नव्या कार्यकर्त्यांची फौज मला महाराष्ट्रात उभी करायची आहे आणि त्यातल्या कुठल्याही कार्यकर्त्याने पवार साहेबांनी टाकलेली जबाबदारी चांगल्या पद्धतीनच बजावण्याचं काम केलं.

बराच काळ उलटून गेलेला आहे. आज महाराष्ट्रात असंख्य तरूण कार्यकर्ते आमच्या नंतरची पिढीदेखील राजकारणात सक्षमपणानं काम करतेय आणि या सगळ्यांना आकर्षण आहे, ते पवार साहेबांच्या नेतृत्वाचं. आणि म्हणून अशा या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबामध्ये खडसे साहेब आज आपला प्रवेश होतोय. राग, लोभ, मत्सर या सगळ्यांच्या पलिकडं जाऊन प्रेम देणारा नेता, विश्वास देणारा नेता या पक्षात आहे. आणि म्हणून यामध्ये गटबाजीची भावना या पक्षात कधी निर्माण झालेली नाही. या पक्षामध्ये एकसंघपणाने काम करण्याची भूमिका ही सर्व कार्यकर्ते घेतात आणि पवार साहेब सांगतील तोच आमच्या सगळ्यांच्यासाठी अंतिम निर्णय असतो. पवार साहेबांनी निर्णय दिल्यानंतर आमच्या पक्षाने कायम त्या दिशेने जाण्याचं काम केलेलं आहे. कितीही मोठं संकट असलं तरी इथं तीस-तीस, चाळीस-चाळीस वर्षे काम करणारे अनेक कार्यकर्ते आहेत, की जे पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करतायंत. आज जेवढे शक्य होते आणि सोशल डिस्टन्सिंग होतं, त्या मर्यादेतच आम्ही सगळ्यांना निमंत्रित केलंय. मला वाटतं, की जळगावला लवकरच आपल्याला जावं लागेल. सोशल डिस्टन्सिंगचा कार्यक्रम महाराष्ट्रात थांबला, की मला वाटतं, की जळगावला आपल्या सगळ्यांना एकत्रित ताकद काय असते हे दाखवून देण्याचं काम जळगावकर करतीलच असा मला विश्वास आहे.

आज मी माननीय खडसे साहेबांचं, गेले काही दिवस मी त्यांना सांगत होतो, खडसे साहेब नाही म्हणायचे. माझा





पक्ष माझ्यावर अन्याय करणार नाही असा गाढा विश्वास खडसे साहेबांना फार वर्षापासून होता आणि असावा. ज्या पक्षात आहे त्या पक्षाचं काम प्रामाणिकपणानं, निष्ठेनं केलं पाहिजे. तो पक्ष त्यांनी वाढवला. गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या बरोबरीनं काम करून महाराष्ट्रात पक्ष वाढवण्याचं त्यांचं आता, शेवटी कानामागून आला आणि तिखट झाला असे काही प्रश्न वेगवेगळ्या ठिकाणी तयार झाले आणि खडसे साहेबांच्यावर त्या पक्षात सतत अन्याय झाला. आज त्यांचं मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला एक विशेष आनंद झालेला आहे. जळगाव जिल्ह्यातल्या माझ्या सर्व सहकाऱ्यांशी मी बोललो. पवार साहेबांनी सर्वांना विश्वासात घेऊन सगळ्यांशी हितगुज करण्याचा प्रयत्न केला आणि मग पूर्ण विचारांती आज खडसे साहेबांना पक्षात घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला, म्हणून आज आम्ही त्यांना इथं निमंत्रित केलं. मला विश्वास आहे, की येणाऱ्या भविष्यकाळात राष्ट्रवादी काँग्रेस हा फक्त जळगाव जिल्हा किंवा खानदेशमध्येच नाही, तर महाराष्ट्रात वाढवण्यासाठी आणखीन पूर्ण ताकदीनं हा पक्ष पुढे नेण्यासाठी खडसे साहेब भरीवपणानं योगदान करतील. त्यांच्या अनुभवाचा पूर्णपणानं उपयोग राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आम्हा सगळ्यांना होईल, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो आणि आमच्या या कार्यक्रमाला जळगाव जिल्ह्यातून, महाराष्ट्रातून अनेक कार्यकर्ते आलेले आहेत. फक्त शेवटी सोशल डिस्टन्सिंग असल्यामुळं किमान ७० कार्यकर्त्यांची यादी, खडसे साहेब तर म्हणत होते, की सर्वांचाच प्रवेश करा, पण आपण विनंती करून खडसे साहेबांकडून मोजक्या लोकांची यादी करून घेतली. या सर्वांचा आपण प्रातिनिधीक स्वरूपात पक्षात प्रवेश करू. त्यानुसार हा कार्यक्रम होत आहे.

पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रदेश अध्यक्ष म्हणून मी खडसे साहेबांचं स्वागत करतो आणि जाता जाता एवढंच सांगतो, की टीव्ही, मीडियामध्ये बरेच तर्कवितर्क लढवले जातात. मी मीडियाला विनंती करेन, की स्पेक्युलेशन काय करू नका. आम्ही सर्वांनी काही अमकं देतो आणि तमकं देतो असं सांगून खडसे साहेबांना, किंवा त्यांनीही आमच्याशी यावर कधीच चर्चा केलेली नाही. खडसे साहेब एका वेगळ्या विचारानं ही भूमिका घेऊन बाहेर पडलेले आहेत आणि त्यामुळं त्यांचं स्वागत राष्ट्रवादीचा अध्यक्ष म्हणून करताना मला विशेष आनंद होतोय. पुन्हा एकदा खडसे साहेबांचं स्वागत करतो आणि त्यांच्या प्रवेशासाठी त्यांना राष्ट्रवादीचा गमचा घालून त्यांचं स्वागत करतो.

■■■

# निष्ठेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम करून पक्ष वाढवीन

## एकनाथ खडसे यांचा शब्द




सर्वप्रथम राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मला याठिकाणी माननीय शरद पवार साहेबांनी प्रवेश दिला, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. जवळजवळ आयुष्यातली चाळीस वर्षे भारतीयजनता पार्टीमध्ये उभारणीपासून आतापर्यंत काम करत आलो आहे आणि स्वाभाविक आहे, की ज्याठिकाणी आपण चाळीस वर्षे राहिलो मागच्या वक्त्यांनी सांगितलं, की विधानसभेच्या वेळी आम्ही म्हटलं होतं, की तुम्ही या. पण चाळीस वर्षे काढल्यानंतर एकाएकी पक्ष सोडावा असं कधी वाटलं नाही. सर्व महाराष्ट्रानं अनुभवलं आहे, की महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये किती माझी छळवणूक झाली, किती मानहानी झाली, किती बदनामी करण्याचा प्रयत्न केला गेला.

साहेब, मी वारंवार विधानसभेमध्ये, विधानसभेच्या बाहेर तर विचारलं, परंतु सभागृहामध्ये हे वारंवार विचारायचो, की माझा गुन्हा कायआहे? मी कायकेलं असेल तर समोर तुम्ही सांगा. तुमच्या दृष्टिकोनातून गैरव्यवहार असेल तर त्याची कागदपत्रे द्या. तुमच्यादृष्टिनं कायअन्यायअसेल तर तो तुम्ही सभागृहामध्ये सांगा. परंतु या क्षणापर्यंत माझ्या प्रश्नाचं हे उत्तर मला अजून मिळालेलं नाही. मी खूप संघर्ष केला. संघर्ष हा भारतीयजनता पार्टीत केला असं नाही, तर



राजकारणामध्ये येत असताना अगदी मंत्रिमंडळातसुद्धा संघर्ष करावा लागला. संघर्ष करणं हा माझा स्थायी स्वभाव आहे.

साहेब, ज्यावेळी भारतीय जनता पार्टी आमच्या इथे कुठेही नव्हती, त्यावेळीपासून भारतीय जनता पार्टीचं काम करत असताना आमच्या उत्तर महाराष्ट्रात सहा जागा भारतीय जनता पार्टीच्या आमच्या वाट्याला खासदारकीच्या यायच्या. त्यापैकी प्रत्येक वेळी पाच जागा आम्ही निवडून आणल्या. जळगाव जिल्हा असा जिल्हा आहे, की १९८९, ९१, ९६, ९८, ९९, २००४, २००७, २००९ आणि २०१४ या दहा इलेक्शन झाल्या, त्याच्यामध्ये २० खासदार आम्हाला निवडून द्यायचे होते. त्या २०पैकी १७ खासदार सातत्याने आम्ही निवडून दिले. एकट्या जळगाव जिल्ह्यात. प्रत्येकवेळी दोन्ही खासदार त्याठिकाणी निवडून गेले. अख्ख्या उत्तर महाराष्ट्रात ६पैकी ५ खासदार आमचे गेले. नंदूरबारचा खासदार त्या कालखंडात येऊ शकला नव्हता. पण आता नंदूरबारलाही आपल्याकडंनच गावितांना घेतलं आणि नंदूरबारला त्याठिकाणी हिना गावितांना निवडून दिलं. म्हणजे संघर्ष केला. समोरासमोर लढलो. पण कधी एकमेकांविषयी विद्वेष भावना किंवा द्वेषाची भावना नाही ठेवली.

मी संघर्ष केला, समोरासमोर केला. मी पाठीमध्ये खंजीर कधी खुपसला नाही. जे चित्र तुम्ही पाहिलंय, की इकडे गोड म्हणायचं, ज्येष्ठ म्हणायचं, सगळं म्हणायचं आणि पाठीमध्ये खंजीर खुपसायचा, तो प्रयोग मी कधी केला नाही. राजकारणामध्ये चाळीस वर्षे मी काढले. पण या चाळीस वर्षामध्ये महिलेला समोर ठेऊन कधीच राजकारण केलं नाही. बाईला समोर ठेवायचं आणि करायचं, अजिबात नाही केलं. कुणाला तरी समोर ठेऊन आरोप करायला लावायचे हा माझा स्वभाव नाहीये. अरे, याठिकाणी मी तसा कायलेचापेचा नाहीये. एकवेळ जयंतरावांशी चर्चा करत असताना, जयंतराव मला म्हणाले, की तुम्ही राष्ट्रवादीमध्ये येतांय. म्हटलं, हो. म्हटले यायचंय. मी म्हटलं, जर तुम्ही मला मदत केली, प्रवेश दिला तर मी येईन. जयंतराव मला बोलले, की ते ईडी-बीडी तुमच्यामागे लागेल ना. मी म्हटलं, जर त्यांनी ईडी लावली, तर मी सीडी लावेल. लावायची की नाही लावायची? म्हणजे तुम्हाला माहिती आहे, की कायप्रकार आहे. पण आज आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मला प्रवेश मिळाला.

मी यासाठी साहेबांचं अभिनंदन आणि आभार मानले, कारण भारतीय जनता पार्टीने जवळपास मला अडगळीत टाकलं होतं. यापुढे भारतीय जनता पार्टीमध्ये मला काही संधी मिळेल अशी अपेक्षा अजिबात नव्हती. रोहिणीताईंना तिकिट दिलं, ते मी मागितलं नव्हतं. जबरदस्ती तिकिट मला दिलं गेलं पावणे तीन वाजता. आम्ही कधी तिकिट मागितलं नाही आणि मला म्हणतात, की नाथाभाऊंना एवढं दिलं, मग पक्ष बदलायची काय गरज आहे. अरे, पण नाथाभाऊनं उभी हयात तुमची सेवा केली त्याचं काय? उभं आयुष्य दिलं. दगडं-धोंडं खाल्ली, सगळं माती अंगावर घेतली. थुंकायचे माझ्या अंगावर लोकं. कायत्या भाजपाला घेऊन बसले म्हणायचे. अशा कालखंडामध्ये आम्ही काम केलं ना. पार्टीसाठी संघर्ष करता करता आमचं चाळीस वर्षांचं आयुष्य पक्षासाठी दिलं. त्यामानानं तुम्ही मला काय केलंय. अँटी करप्शन, इन्कम टॅक्स, कुणी महिला दिली नाही, मागे लावली. पण मी सांगतो आपल्याला पवार साहेब, मला प्रवेश मिळाला.

मी कुठलीही अपेक्षा ठेवलेली नाही. आपल्याशी चर्चा करत असताना मी आपल्याशी काहीही बोललेलो नाहीये. मला मनाला माहिती आहे, की आपल्याला आता काम करत राहायचं आहे आणि मी तुम्हाला याठिकाणी शब्द देतो, की जेवढं काम भारतीय जनता पार्टीचं निष्ठेनी केलं, तेवढंच काम राष्ट्रवादी काँग्रेसचं मी करणार आहे. माझ्यासहित असंख्य कार्यकर्त्यांच्या मदतीने जेवढी भारतीयजनता पार्टी विस्तारली, वाढली, त्याच्या दुप्पट वेगाने मी तुम्हाला वाढवून दाखवेल. आणि हे करून दाखवू. अरूणभाईंना माहिती आहे, की आपण किती जिद्दी आहोत. आणि मी तुम्हाला करून दाखवेल. जेवढा विस्तार करता येईल, जेवढ्या लोकांना घेता येईल, जेवढ्या लोकांची कामं करता येतील, तेवढ्या लोकांची कामं करण्याचा आम्ही प्रयत्न करू. साथ हवी आहे आपल्या लोकांची. पाठीशी माझ्या भक्कम



उभं राहिल्यानंतर मी कुणालाच घाबरत नाही आणि ते राहावं याच्यासाठी, आता याठिकाणी अनेकांना आपण प्रवेश दिला आणि असे खूप लोकं याठिकाणी बसलेले आहेत, की त्यांनी प्रवेश घेतलेला नाही कारण ते चिन्हावर उभे आहेत. माझ्या जिल्हा परिषदेचे सदस्यआहेत, शंभर टक्के पंचायत समित्या, शंभर टक्के नगरपालिका एकही दुसऱ्या पक्षाचा नाही. माझ्या मतदारसंघामध्ये ९ जिल्हा परिषद सदस्यआहेत आणि नऊच्या नऊ निवडून आलेले आहेत. एकही दुसऱ्या पक्षाचा नाहीये. हेच चित्र पुढच्या कालखंडामधील निवडणुकामध्ये आम्ही तुम्हाला दाखवून देऊ. हेच चित्र दाखवू.

मेहनत करावी लागेल. आमच्या मनातली इच्छा, माझ्या नव्हती, ही कार्यकर्त्यांची भावना होती, की आता पक्ष सोडला पाहिजे. ही कार्यकर्त्यांची भावना होती, की एनसीपीमध्ये गेलं पाहिजे. नाहीतर साऱ्याच पक्षांचे मला बऱ्याच जणांच्या ऑफर होत्या. आपले सहयोगी पक्ष सांगायचे, की नाथाभाऊ इकडे या. पण जेव्हा कार्यकर्त्यांशी महाराष्ट्रभरातल्या कार्यकर्त्यांशी जेव्हा चर्चा करत असताना बोलायचो, सहा महिने मी चर्चा केली असेल. पण साऱ्या





कार्यकर्त्यांचं एकमुखी नाव होतं, एनसीपीमध्ये तुम्ही जा. निव्वळ कार्यकर्त्यांची इच्छा होती असं नाही जयंतराव. दिल्लीमधले जे वरिष्ठ आहेत, त्या वरिष्ठांशीसुद्धा मी चर्चा केली, आणि त्यांनी मला सांगितलं. मी म्हटलं अशी स्थिती आहे. ते म्हणाले, नाथाभाऊ आता तुम्हाला इथं भवितव्य नाही. मी म्हटलं, काय करू? त्यांनी सांगितलं, की तुम्हाला पक्ष बदलायचा असेल तर बदला. मग कुठे जाऊ? तुम्हाला सांगतो, एनसीपीमध्ये जा. मग साहेबांच्या कानावर हा विषय घातला होता. म्हणजे आमच्याही लोकांची इच्छा होती, की त्याठिकाणी असं आहे की भारतीयजनता पार्टीमध्ये असे बरेच लोक आहेत, की ते पक्षाला कंटाळलेले आहेत. परंतु, ते बोलू शकत नाहीत. अशा बऱ्याच जणांना असं वाटतं, की मला दुसऱ्या पक्षात जायला पाहिजे. जे मोठ्या पदावर आहेत. परंतु, ते ईडी लागेल, काही लागेल. बऱ्याच जणांना भीतीपण असते.

पण या पुढच्या कालखंडामध्ये तुम्हाला सांगतो, एक मोठ्ठा कार्यक्रम आपण जळगाव शहरामध्ये, जिल्ह्यामध्ये आपण घेणार. नाथाभाऊची ताकद कायआहे, हे खऱ्या अर्थानं दाखवून देईल. मी जळगावला आपल्याला बोलावणार आहे. आत्ताच आमंत्रण देतोय. सर्वात मोठ्ठं ग्राऊंड जे आपल्याकडं आहे, ते सागरपार्क ओतप्रोत भरून दाखवेल मी आपल्याला. साहेबांसारख्या अनुभवी नेत्याचं मार्गदर्शन मला मिळणार आहे. यापूर्वी पण मिळत होतं. मी अनेकवेळा भाषणांमध्ये उल्लेख केलेला आहे पवार साहेबांचा. विधानसभेत मी कायकधी लाजलो नाही. विधानसभेत मी नेहमी कृषि खात्याचा जर कुणाचा अभ्यास असेल तर तो पवार साहेबांचा सर्वात जास्त आहे हे मी नेहमी बोललो. अगदी बारामतीलाही स्वत: त्याठिकाणी जाऊन मी शेती पाहिली, तो उल्लेख मी सभागृहात अनेकवेळा केला. म्हटलं, शेतीचा अभ्यास करायचा असेल तर त्याठिकाणी जाऊन बघा, महाराष्ट्र सरकारने करोडो रूपये खर्च केले, पण अजूनही आम्ही तेवढं संशोधन करू शकलो नाही. आणि मला याचा आनंद आहे. मी फार बोलत नाही. पण मला आनंद आहे आज आणि माझ्या डोक्यावरचं ओझं गेल्यासारखं, हलकंहलकं वाटतंय.

एक गोष्ट खरी आहे जयंतराव. ज्याच्यावर येतं ना त्याला समजतं. मी आमच्या पक्षामधल्या बऱ्याचशा वरिष्ठ लोकांचे मला फोन आले, अगदी रात्रीसुद्धा. मला दिल्लीहून एकाचा फोन आला. मला खूप समजावत बसले, की नाही असं आहे, तसं आहे. तुम्ही एवढे मोठे आहात. काही ना काही मिळेल. तुम्हाला दिलंय. म्हटलं, हे बघा दिलंय-बिलंयत्याबद्दल भारतीयजनता पार्टीचं मनापासून आभार. पण मला छळलं त्याचं काय. साहेब, माझ्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. खोटा. आत्ता परवा परवा मी बाहेर आलो त्यातनं. म्हणजे इतक्या खालचं जर राजकारण चालत असेल, तर अशा लोकांबरोबर राहणं उचित नाही म्हणून मी पक्षत्याग करतोयअसं मी वर आमच्या वरिष्ठांना सांगितलं. वारंवार, वारंवार आयुष्यातले एवढं माणसानं काम केल्यानंतर तुम्ही माझ्या आयुष्यातली चार वर्षे वाया घालवली. काही कारण नसताना तुम्ही मला अँटी करप्शन, दोनवेळा अँटी करप्शन, नाशिकलाही लावली, पुण्याकडूनही लावली. दोन वेळा अँटी करप्शन. भूखंडाच्या चौकशा. कोणता भूखंड

घेतला मी?

आता जयंतराव, काही दिवस जाऊ द्या. कुणी किती भूखंड घेतले, हे मी तुम्हाला दाखवेल. कुणी कायकेलं आहे, फार दिवस नको, फार काही काळ जाणार नाही, तुमच्या आपोआप माझं बोलणं लक्षात येईल. मी अन्याय करणाऱ्यातला नाही. आम्ही जाणीवपूर्वक कुणाला त्रास देत नाही. पण नियमाच्या बाहेर ज्यांनी केलं असेल अशांवर काहीतरी कारवाई झाली पाहिजे, हे म्हणणाऱ्यातला मी आहे. मी मागणी करेल सरकारकडे, की आता हे केलं पाहिजे. नाहीतर मग शेवटी हे करा, ते करा. जर आपल्यावर दबाव येत असेल तर त्या दबावाला बळी न पडता बाहेर पडून काम करावं लागणार आहे आणि मी करेन. त्यासाठी मी आपला आभारी आहे, पवार साहेब, अत्यंत आभारी आहे. नाहीतर मी राजकीय जीवनातून घरीच बसलो असतो ना. मला दुसरा काय पर्यायच नव्हता. चार वर्षे जसा घरी की ज्या पक्षावर तुम्ही प्रहार केले. मी त्यांना सांगितलं, की मी प्रहार केले, कारण मी माझ्या पक्षाचं काम विधानसभेत प्रामाणिकपणे केलं आणि मी आज याठिकाणी जातो आहे, अरे तुम्ही सकाळी पाच वाजता मिटिंग घेतली, पाच वाजता शपथ घेतली, तेव्हा तुमची नियती, तुमची नीतिमत्ता कुठे गेली? चांगलं आहे म्हणूनच गेले ना. काहीतरी चांगलं होईल म्हणूनच तुम्ही गेले ना. त्यावेळी राष्ट्रवादी तुम्हाला अत्यंत चांगला वाटला होता की नाही. मग मला आता त्याच्यापेक्षा चांगला वाटतो. आणि का नको? मग सर्वांची तोंडं बंद झाली. पण ठीक आहे. यावर फार काय बोलायचं नाहीये. कुणावर टीका टिप्पणी पण करायची नाहीये. आपलं काम आपण करत राहू.

आज मी आपल्या सर्व कार्यकर्त्यांना सांगतो, खूप कार्यकर्ते बसले आहेत जयंतराव, जिल्हा परिषदेचे सदस्य आहेत, पंचायत समितीचे सभापती आहेत, चिन्हावर निवडून



बसलो, शांततेनं बसावं लागलं तसं बसावं लागलं असतं. उभ्या आयुष्यात कायभारतीयजनता पार्टीनं मला तिकिट दिलं नसतं, का दिलं नसतं? कारण, नाथाभाऊ, तुम्ही ज्येष्ठ आहे. तुम्ही मार्गदर्शन करा. हे मार्गदर्शन करा असं सांगणारं कोण? चार दिवस ज्यांनी भाजपमध्ये काढले नाहीत, ते मार्गदर्शन करा असं म्हणायला लागलेत. अनेक लोकं माझ्याकडे आले, ते म्हणाले, की तुम्ही राष्ट्रवादीत जाता आहात. मागे तुम्ही राष्ट्रवादीलाच शिव्याशाप दिल्या. म्हटलं, त्यावेळी मी विरोधी पक्षनेता होतो. पण पवार साहेबांनी मैत्री टिकवून ठेवली. मी राष्ट्रवादीत जातो, त्यावेळी ते म्हणतात, की चूक आहे. फार चुकीचं करून राहिला. तुम्हाला पक्षाने कायनाही दिलं. कसं केलं आणि अशा पक्षात तुम्ही जाता, आलेल्यांची संख्या इथे बसलेल्यांमध्ये जास्त आहे. त्यामुळं अनेकजण प्रवेश करू इच्छितात, पण त्यांना टेक्निकल कारणासाठी येता येत नाही. काहींनी तर सांगितलं, की पद गेलं तरी चालेल, पण आम्हाला प्रवेश करू द्या. पण पुढच्या कालखंडामध्ये निश्चित भारतीयजनता पार्टीमधून जे आज आलेले आहेत, त्यांच्याबरोबरीने राष्ट्रवादी काँग्रेसचं बळ वाढेल या दृष्टिकोनातून निश्चितच प्रयत्न करेल, मी आपल्याला याठिकाणी शब्द देतो, की जे आहे त्याचं प्रामाणिकपणानं काम करावं ही आपली भूमिका आहे. पुढच्या कालखंडामध्ये हेच आम्ही पार पाडून दाखवू. तुम्हाला वर्षभराच्या आत याठिकाणी नक्की बदल दिसेल. एवढंच आपल्याला सांगतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!!

■■■



# भारतीय परराष्ट्र नीती किती काळ प्रभावमुक्त राहणार?

**गहिनीनाथ**



भारत आणि अमेरिकेदरम्यान नुकताच एक करार झाला. त्याच्या बातम्या सर्वांनीच वाचल्या असतील. भारत-अमेरिकेदरम्यान संरक्षण आणि लष्करी सहकार्य व आघाडी प्रत्यक्षात आणण्यासाठी करावयाच्या तीन करारातील हा अखेरचा करार होता. हे तीन करार या संभाव्य सहकार्य आणि आघाडीसाठीचे पायाभूत करार म्हणून ओळखले जातात. आता २७ ऑक्टोबरला झालेल्या कराराचे शीर्षक 'बेका' किंवा 'बेसिक एक्सचेंज अँड कोऑपरेशन ॲग्रीमेंट' असे आहे. या अंतर्गत सामरिकदृष्ट्या संवेदनशील व प्रसंगी गोपनीय अशा भौगोलिक माहितीची देवाणघेवाण होणार आहे. यापूर्वी दोन करार झाले. १)द लॉजिस्टिक्स एक्सचेंज मेमोरँडम ऑफ ॲग्रीमेंट्स 'लेमोआ'(२०१६) आणि २) कम्युनिकेशन्स कंपॅटिबिलिटी अँड सिक्युरिटी ॲग्रीमेंट - 'कॉमकासा'(२०१८) ही त्यांची शीर्षके होती. 'लेमोआ' करारा अंतर्गत एकमेकांच्या सेनादलांना आवश्यकतेनुसार मूलभूत सुविधा पुरविण्याची तरतूद आहे. उदाहरणार्थ अमेरिकेच्या लढाऊ विमानांना, नौदलाच्या ताफ्याला किंवा अमेरिकन पाणबुड्यांना इंधनासह इतरही तांत्रिक मदत पुरविण्याचा यात समावेश आहे. 'कॉमकासा' हा विशेष संवेदनशील आहे. कारण यामध्ये संरक्षण विभागांमध्ये गोपनीय व संवेदनशील माहितीची देवाणघेवाण केली जाणार आहे. यातला विचार करण्यासारखा भाग आहे तो 'देवाणघेवाण' या शब्दाशी निगडित आहे. कारण अमेरिकेबरोबरचा करार म्हणजे त्यांना काही 'देण्यापेक्षा' भारत हा 'घेण्याच्या' भूमिकेतच अधिक राहणार आहे. यातून भारताचे अमेरिकेवरील परावलंबित्व वाढत जाणार हे सांगायला भविष्यवेत्त्याची गरज नाही.



आता हे तीन करार किंवा पायाभूत करार परस्परसंमत झाल्यानंतर भारत व अमेरिकादरम्यानची संरक्षण व लष्करी आघाडी किंवा भागीदारीस सुरुवात झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अर्थात ती आधीपासूनच सुरु झालेली आहे आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखाली एक नवी सामरिक आणि लष्करी आघाडी आकारालाही आलेली आहे. अलीकडेच सर्वांनी 'क्वाड' म्हणजेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत व जपान या चार देशांच्या आघाडीची माहिती वाचली असेलच. नोव्हेंबर महिन्यात या 'क्वाड'तर्फे म्हणजेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत आणि जपान या चार देशांचा संयुक्त नौदल युध्दसराव ३ ते ६ नोव्हेंबर दरम्यान बंगालच्या उपसागरात विशाखापट्टणमजवळ होणार आहे. याचा दुसरा आणि मोठा टप्पा अरबी समुद्रात १७ ते २० नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. 'क्वाड' म्हणजे चार! 'क्वाड्रुपल' असा मूळ शब्द असून त्याचे संक्षिप्त रूप 'क्वाड' असे केले जाते. 'चतुष्कोनी आघाडी' असे या आघाडीला म्हणावे लागेल. इंग्रजीत चतुष्पाद प्राण्याला उद्देशुनही 'क्वाड्रुपल' म्हटले





जाते. तर अशी ही नवी आघाडी आधीच तयार झालेली आहे आणि त्याला भारत-अमेरिकेमधील या करारांनी आणखी बळकटी आली आहे.

या प्राथमिक माहितीनंतर थोडी नजर इतिहासावर टाकून त्याआधारेही या ताज्या घडामोडींचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करावा लागेल. भारत व अमेरिकेच्या मैत्रीचा नवा अध्याय १९९१च्या खुल्या आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेने सुरु झाला असे म्हणणे अगदीच निरर्थक म्हणता येणार नाही. सुरुवातीला मैत्रीपेक्षा सहकार्यावर भर दिला गेला आणि त्यात सावधपणाचा भाग अधिक होता. त्याची कारणे इतिहासात दडलेली होती. त्या इतिहासावरही नजर टाकावी लागेल.

**भारताच्या परराष्ट्र नीतीमध्ये हा एक महत्वपूर्ण बदल झालेला आहे. अमेरिकेच्या गटातील देश म्हणूनच भारताची ओळख प्रस्थापित व्हायला वेळ लागणार नाही. यामुळे पाकिस्तान व चीनची सीमा शांत होण्याची फारशी आशा करणे निरर्थक ठरणार आहे. अमेरिका आणि अमेरिकेच्या पालकत्वाखाली असलेल्या गटात सहभागी होण्याची ही किंमत आहे व ती भारताला चुकवावी लागणार आहे.**

दुसऱ्या महायुध्दानंतर दोन वर्षांनी भारत स्वतंत्र झाला. दुसऱ्या महायुध्दात रशियाने(तत्कालीन सोव्हिएत युनियन) जी कामगिरी बजावली होती त्यामुळे जागतिक सत्ता म्हणून रशियाची ओळख प्रस्थापित झाली. रशियाने पूर्व युरोपात आपले हातपाय पसरले होते. त्यास पायबंद घालण्यासाठी अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स यांचे प्रयत्न चालू झाले होते. दुसऱ्या महायुध्दामुळे ब्रिटन व फ्रान्स जर्जर झालेले असल्याने त्यांना अमेरिकेचे पालकत्व स्वीकारावे लागले. आशियात रशियाने हातपाय पसरु नये यासाठी अमेरिकेने विविध देशांना आपल्या आघाडीत ओढण्यास सुरुवात केली. त्यासाठी आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचा बागूलबोवा तयार करण्यातही आला. या पार्श्वभमीवर अमेरिकेने 'सिअॅटो' नावाने अग्नेय आशियाई देशांचा एक राष्ट्रसमूह स्थापन केला. 'साऊथ-ईस्ट एशियन ट्रीटी ऑर्गनायझेशन' या नावाने हा करार प्रसिध्द आहे. यामध्ये अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, थायलंड, फिलिपिन्स, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांचा समावेश होता. मे-१९५४ मध्ये अमेरिका आणि पाकिस्तान दरम्यान परस्पर संरक्षण साह्य करार झाला आणि याच वर्षाच्या अखेरीला पाकिस्तानने वरील राष्ट्रसमूहाचे म्हणजेच 'सिअॅटो'चे सदस्यत्व स्वीकारले. पुढच्याच वर्षी म्हणजे १९५५ मध्ये पाकिस्तानने

अशाच एका आणखी अमेरिकन पालकत्वाखाली असलेल्या राष्ट्रसमूहाचे सदस्यत्व स्वीकारले. त्याचे नाव होते 'सेंटो'– 'सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन'. यामध्ये ब्रिटन, तुर्कस्तान, इराण व इराक यांचा समावेश होता. पाकिस्तानने अमेरिकेबरोबर संरक्षणविषयक संबंध प्रस्थापित करण्याची ही प्रक्रिया सुरु असतानाच भारत आणि चीन दरम्यान सीमाविवाद सुरु झाला होता. १९५९ ते १९६२ हा काळ निर्णायक ठरला आणि सीमाविवादाची परिणिती चीनने भारतावर आक्रमण करण्यात झाली. या परिस्थितीत भारताने रशिया आणि अमेरिका दोघांकडे मदत मागितली होती. परंतु त्यावेळी रशियाने अमेरिकेच्या अंगणात म्हणजे क्यूबामध्ये क्षेपणास्त्रे तैनात करुन अमेरिकेपुढे गंभीर आव्हान उभे केले







होते. त्या परिस्थितीत रशियाने भारताला मदत केली नाही आणि ती न करुन एकप्रकारे चीनला आक्रमणासाठी हिरवा कंदीलच दिला. अमेरिकेला त्या परिस्थितीत भारताला मदत करणे शक्य नव्हते. परिणामी भारताला पराभवाची नामुष्की स्वीकारावी लागली होती.


किंबहुना आता समोर येत असलेल्य माहितीनुसार चीनला भारतावर आक्रमणासाठी उद्युक्त करणे व तशी परिस्थिती निर्माण करण्यामागे 'सीआयए' या अमेरिकन गुप्तचर संघटनेचा हात असल्याचे स्पष्ट होताना दिसते. १९६२ नंतर तीन वर्षांनीच पाकिस्तानने भारतावर हल्ला केला. १९६५च्या या युध्दात भारताला फारशी कोणत्याच राष्ट्राची मदत झाली नाही. परंतु भारतीय जवानांनी अतुलनीय शौर्य दाखवून पाकिस्तानला चीतपट केले. या युध्दात अमेरिकेने





पाकिस्तानला सेबरजेट आणि पॅटन रणगाडे पुरवले होते आणि त्यांची भारताने धूळदाण उडवली होती. रशियाने भारताला फारशी मदत केली नव्हती परंतु भारत–पाकिस्तान दरम्यान युध्दबंदी करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन ताश्कंदला लालबहादूर शास्त्री व पाकिस्तानचे लष्करशहा जनरल आयुबखान यांना निमंत्रित करुन तह घडवून आणला होता. ती एक प्रकारे भारत व रशियाच्या मैत्रीची सुरुवात म्हणावी लागेल. यानंतर चारच वर्षात पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजेच आताच्या बांगला देशात स्वातंत्र्याची चळवळ मुजिबूर रेहमान यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाली. भारताच्या मुत्सद्दी व धोरणी नेत्या इंदिरा गांधी यांनी या चळवळीस पाठिंबा दिला आणि १९७१ मध्ये पाकिस्तानचे विभाजन होऊन स्वतंत्र बांगला







देशाची निर्मिती झाली. यावेळी देखील अमेरिकेने त्यांची पाकिस्तानधार्जिणी भूमिका कायम राखली आणि भारतीय सेना बांगला देशाच्या मुक्तीसाठी मदत करीत असताना पाकिस्तानने काश्मीर व पंजाब सीमेवर (पश्चिम) युध्द सुरु केले. चीनने देखील त्यांच्या सेना सीमेवर सुसज्ज करुन भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. दोन आघाड्यांवर युध्द करण्याच्या दबावाखाली बांगला देश मुक्तिलढ्यातून भारत अंग काढून घेईल असे त्यांना वाटले. परंतु दूरदृष्टीच्या इंदिरा गांधी यांनी यापूर्वीच परिस्थिती ओळखून सोव्हिएत युनियन म्हणजेच रशियाबरोबर मैत्री व सहकार्याचा करार केलेला होता. भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिका आणि ब्रिटनने त्यांच्या नौदलाचा काफिला बंगालच्या उपसागरात पाठवला होता परंतु भारताच्या विनंतीवरुन

रशियानेही त्यांचा नौदल ताफा भारताकडे रवाना केल्यानंतर अमेरिका व ब्रिटनने माघार घेतली. बांगला देश स्वतंत्र झाला. जागतिक पातळीवर भारत व रशिया मैत्रीचे पर्व सुरु झाले.



त्यानंतर जगाच्या राजकारणात एक आश्चर्यकारक घटना घडली. १९७२ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी चीनचा दौरा केला. अमेरिकन अध्यक्षाचा हा पहिलाच चीन दौरा होता कारण त्यापूर्वी कोणीही अमेरिकन अध्यक्ष चीनला गेलेला नव्हता आणि अमेरिकेने चीनला राजनैतिक मान्यता देखील दिलेली नव्हती किंवा त्यांच्याबरोबर राजनैतिक संबंधही प्रस्थापित केलेले नव्हते. या धक्कादायक व अनपेक्षित घटनेनंतर जागतिक राजकारणाने वळण घेतले. आशियात किंवा भारतीय उपखंडात भारत व रशिया एका बाजुला तर दुसरीकडे अमेरिका-पाकिस्तान व नव्याने सहभागी चीन असा दोन प्रतिस्पर्धी आघाड्या तयार झाल्या. १९९१ पर्यंत ही स्थिती टिकली. या काळात अमेरिकेच्या मदतीने चीनने आर्थिक आघाडीवर आपले स्थान मजबूत केले. भारताने आर्थिक उदारीकरण आणि खुल्या अर्थव्यवस्थेला नुकताच प्रारंभ केला होता. परंतु सोव्हिएत युनियनमध्ये गडबड सुरु होऊन त्या साम्राज्याचे विभाजन झाले. भारताचा एक खात्रीशर मित्र संपुष्टात आला. परंतु भारताने आर्थिक उदारीकरणाची कास धरुन अमेरिकेसह पाश्चात्य जगाला आकर्षित करण्यास सुरुवात केली. याच काळात जगात धार्मिक कट्टरतेचा एक नवा अध्याय सुरु झाला. त्याचा केंद्रबिंदू पाकिस्तान झाला आणि पाकिस्तानचाच उपविभाग म्हणून अफगाणिस्तानात तालिबानचा उदय झाला. आर्थिक मजबुती प्राप्त झालेल्या चीनने वेगळी पावले टाकायला सुरुवात केली आणि जागतिक पातळीवरील मोठी सत्ता होण्याच्या दृष्टीने त्यांची महत्वाकांक्षा





वाढू लागली. साहजिकच अमेरिकेला ते रुचणारे नसल्याने अमेरिकेने भारताकडे चीनला पर्याय म्हणून पाहण्यास सुरुवात

केली. पाकिस्तानबरोबरचे संबंध अमेरिकेने जवळपास नावापुरते ठेवले होते. त्या मालिकेतच मनमोहनसिंग सरकारने नागरी अण्विक ऊर्जा करार अमेरिकेबरोबर करुन भागीदारीला मजबुती देण्यास सुरुवात केली. परंतु या सरकारने अमेरिकेच्या गटात जाऊन बसण्यापासून स्वतःला रोखले. परंतु मनमोहनसिंग सरकारच्या पराभवानंतर नव्या विचारसरणीचे सरकार सत्तेत आले आणि या सत्ताधाऱ्यांनी पूर्णपणे अमेरिकेच्या कह्यात जाण्याचे धोरण अवलंबिले.







त्याचीच परिणिती या करारांमध्ये झाली.

या पार्श्वभूमीवर आता या करारांचे आणि भावी भारत–अमेरिका संबंधांचे मूल्यमापन करावे लागेल. या तिसऱ्या कराराचे एक वैशिष्ट्य ध्यानात घ्यावे लागेल. अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीच्या मतदानासाठी केवळ आठ दिवस उरलेले असताना या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. डोनाल्ड ट्रंप यांच्या काळातच यापूर्वीचे करारही करण्यात आले होते. परंतु अध्यक्षीय निवडणुकीच्या निकालाची वाट न पाहता हा करार करण्यात आला. अमेरिकेत सत्ताबदल झाला तरी या कराराबाबत फारसा धोरणात्मक बदल होण्याची शक्यता नसली तरी राजनैतिक औचित्याचा भाग म्हणून देखील या कराराची विनाकारण घाई करण्यात आली असे मानले जाते. चीनने लडाखमध्ये केलेली घुसखोरी व त्यामुळे भारत व चीनदरम्यानचा तणाव आणि तो निवळण्याऐवजी अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत असल्याने या कराराची घाई करण्यात आल्याचे सोयीस्कर कारण राज्यकर्त्यांकडून पुढे केले जात आहे. याचा अर्थ भारताला शांततेऐवजी संघर्ष हवा आहे काय असा लावायचा का ? भारतातील वर्तमान सत्ताधाऱ्यांवर अमेरिकेचा किती वरचष्मा आहे याचे उदाहरण या कराराच्या सह्या करण्याच्या निमित्तानेच समोर आले. सर्वसाधारणपणे परक्या देशात जाऊन तिसऱ्या देशाबाबत मतप्रदर्शन किंवा टिप्पणी करणे राजनैतिक दृष्ट्या उचित मानले जात नाही. तो एक प्रकारे राजशिष्टाचाराचा भंगही मानला जातो. परंतु अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री आणि संरक्षणमंत्री या दोघांनीही या औचित्याचा भंग केला आणि भारतीय भूमीवरुन आणि भारताबरोबरच्या अधिकृत चर्चेचे निमित्त असताना चीनवर टीका केली. भारताच्या उत्तर सीमेवर चीनने सैन्य जमवाजमव केल्याचे ते म्हणाले. तसेच चिनी कम्युनिस्ट पक्षाचा लोकशाहीवर विश्वास नसल्याचेही या मंत्री महोदयांनी म्हटले.

भारताने त्यास हरकत घ्यायला हवी होती परंतु ते



धाडस भारताचे संरक्षणमंत्री किंवा परराष्ट्रमंत्री दाखवू शकले नाहीत. तरीही त्या दोघांनी भारत-चीन दरम्यानच्या सध्याच्या तणावाचा कुठेही थेट उल्लेख न करण्याचे भान राखले हेही नसे थोडके.

भारत-अमेरिका संरक्षण व लष्करी भागीदारीच्या संदर्भातील पायाभूत करार झाल्यानंतर आता अधिकृतपणे भारत हा अमेरिकेचा









सामरिक भागीदार देश झाला आहे. हे एक धोरणात्मक वळण आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कारण एकेकाळी अलिप्त राष्ट्र चळवळीचा संस्थापक देश म्हणून भारताची जगाला असलेली ओळख आणि त्याचबरोबर भारताचे सोव्हिएत युनियनकडे झुकलेले परराष्ट्र धोरण जगाला माहिती होते. अफगाणिस्तानात सोव्हिएत फौजा मुक्तिसेना म्हणून गेल्या होत्या परंतु प्रत्यक्षात अफगाणिस्तानवर ताबा मिळविण्याचे ते कृत्य होते आणि त्याची तीव्र जागतिक प्रतिक्रिया उमटल्यानंतर ज्या मोजक्या देशांनी सोव्हिएत युनियनला साथ दिली त्यात भारताचा समावेश होता. परंतु याची परिणिती अफगाणिस्तानमध्ये धर्मांध व कट्टरपंथी शक्तींच्या उदयात झाली. अमेरिकेसह पाश्चात्य व विशेषतः रशियाविरोधी देशांनी या धर्मांध शक्तींना खतपाणी घातले. त्यांना सर्व प्रकारची साधनसंपत्तीची मदत केली व त्यातूनच तालिबानचे भूत उभे राहिले.हे संदर्भ अशासाठी की जगात होत असलेल्या प्रत्येक घडामोडीची प्रतिक्रिया हमखास

उमटत असते. त्यामुळे भारत व अमेरिकेच्या या संरक्षण व लष्करी भागीदारी कराराच्याही प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत.

अमेरिकेबरोबर सामरिक भागीदारीला पूर्णत्व देणारे करार केल्यामुळे भारत व रशिया यांच्यातील प्रदीर्घ व जवळपास पन्नास वर्षांची भागीदारी आता समाप्तीच्या टप्प्यावर आली आहे असे म्हणावे लागेल. १९७१चा करार हा पायाभूत धरल्यास पुढच्या वर्षी म्हणजे २०२१ मध्ये त्यास पन्नास वर्षे होणार आहेत. अजुनही भारत व रशियाचे संबंध चांगल्या पातळीवर आहेत आणि उभय देशांच्या शिखर नेतृत्वादरम्यानच्या वार्षिक संवाद प्रक्रियेत अजुनतरी खंड पडलेला नाही.

दरवर्षी रशियाचे अध्यक्ष व भारतीय पंतप्रधान या व्यवस्थेनुसार भेटून द्विपक्षीय संबंध, सहकार्याचा आढावा घेत असतात. आता अमेरिकेबरोबरच्या या करारांनंतर २०२१ मध्ये या पातळीवर काय घडते ते पहावे लागेल. त्यावेळी जे काही व्हायचे असेल ते होईल पण या करारानंतर लगेचच एका परिषदेत बोलताना रशियाचे प्रमुख व्लादीमिर पुतिन यांनी जे सूचक उद्‌गार काढले ते भारताच्या परराष्ट्र धोरणकर्त्यांना ध्यानात घ्यावे लागतील. पुतिन यांनी रशिया व चीन दरम्यान संरक्षण व लष्करी भागीदारीचा प्रस्ताव या भाषणात केला. रशिया आणि चीनदरम्यान लष्करी व संरक्षण सहकार्य विविध पातळ्यांवर चालूच आहे परंतु त्याला औपचारिक व संस्थात्मक स्वरुप देण्याची कल्पना पुतिन यांनी मांडली. चीनने या त्यांच्या प्रस्तावावर अतिशय सावध पवित्रा घेतला आहे आणि फारसे मतप्रदर्शन केलेले






नाही. याच्या थोडे इतिहासात गेल्यास चीनने स्वातंत्र्य प्राप्त केल्यानंतर माओ त्से तुंग व स्तालिन यांच्यात संरक्षण व लष्करी करार झाला(१९५०) होता. परंतु नंतरच्या काळात दोन्ही देशांचे संबंध बिघडत जाऊन हा करारही संपुष्टात आला होता. त्यामुळेच पुतिन यांच्या या प्रस्तावावर चीनने सावधगिरीची प्रतिक्रिया देऊन आताच याची आवश्यकता भासत नसल्याचे म्हटले आहे.

दुसरीकडे भारतीय उपखंडातही याची प्रतिक्रिया वेगळ्या रीतीने उमटत आहे. या करारांप्रमाणेच वर्तमान राजवटीने जम्मू-काश्मीर व लडाखचे दोन भागात विभाजन करुन त्यांचे रुपांतर केंद्रशासित प्रदेशात केले. हे करताना देशाच्या गृहमंत्र्यांनी संसदेच्या पटलावर गिलगिट-बाल्टिस्तानसह पाकव्याप्त काश्मीर आणि अक्साई चिन हा भूप्रदेशही पुन्हा मिळविला जाईल अशी घोषणा केली होती. संसदेच्या पटलावर ही बाब बोलणे याचा अर्थ सरकारच्या अधिकृत धोरणाचा तो उच्चार असतो.

त्यामुळेच चीनच्या लडाखमधील घुसखोरीमागे हे देखील एक मोठे कारण मानले जाते. आता अमेरिकेबरोबर घाईने करार करण्यामागेही चीनच्या घुसखोरीचे कारण दिले जाते. पण अक्साई चिन अजुनही चीनच्या ताब्यात आहे व गिलगिट-बाल्टिस्तानही अद्याप पाकिस्तानच्याच ताब्यात आहे. आतापर्यंत पाकिस्तान हा भाग स्वतंत्र प्रशासकीय भाग मानून तेथे प्रशासन चालवीत असे. पाकिस्तानला हा भाग अधिकृतपणे जोडण्यात आला नव्हता किंवा पाकिस्तानचा एक प्रांत म्हणून त्याला मान्यता देण्यात आलेली नव्हती. परंतु भारतीय राज्यकर्त्यांनी जम्मू-काश्मीर-लडाखचे स्वरुप बदलले आणि पाकिस्तानने







आता गिलगिट-बाल्टिस्तान हा पाकिस्तानचे नवा प्रांत झाल्याची घोषणा केली आहे. गेल्या सत्तर वर्षात पाकिस्तानने जे धाडस केले नव्हते ते आता त्यांनी केले आहे. याला चीनची फूस व चिथावणी आहे हे अप्रकट सत्य आहे. कारण यानंतर पुढचे पाऊल म्हणजे या प्रांतात चीनचा शिरकाव आणि प्रसंगी एखादा लष्करी तळही उभारला जाऊ शकतो असे तज्ञांचे सांगणे आहे. याच्याच बरोबरीने चीनने आता तिबेटपर्यंत पोहोचलेल्या त्यांच्या रेल्वेचा विस्तार सुरु केला आहे आणि पार अरुणाचलच्या सीमेपर्यंत या रेल्वेमार्गाचा विस्तार केला जाणार आहे. एकदा अशा प्रकारचे सुप्त संघर्ष सुरु झाले की त्याचा शेवट कसा होईल याचा अंदाज बांधणे अवघड असते.

भारताच्या परराष्ट्र नीतीमध्ये हा एक महत्वपूर्ण बदल झालेला आहे. अमेरिकेच्या गटातील देश म्हणूनच भारताची ओळख प्रस्थापित व्हायला वेळ लागणार नाही. यामुळे पाकिस्तान व चीनची सीमा शांत होण्याची



फारशी आशा करणे निरर्थक ठरणार आहे. अमेरिका आणि अमेरिकेच्या पालकत्वाखाली असलेल्या गटात सहभागी होण्याची ही किंमत आहे व ती भारताला चुकवावी लागणार आहे. यामुळेच आगामी काळातील भारतीय परराष्ट्र नीती व धोरण हे अमेरिका पुरस्कृत आणि अमेरिकाभिमुख राहणे अपरिहार्य असेल. त्याचप्रमाणे अन्य क्षेत्रातही अमेरिकेवरील परावलंबित्वात वाढ होणेही अटळ होईल. भारत-अमेरिकेदरम्यान मैत्री संबंध राखण्यास विरोध नसला तरी त्या देशावर परावलंबी राहणे अनेक तज्ञ मंडळींना खटकत आहे आणि यामुळे भारताच्या स्वतंत्र व अन्य देशांपासून प्रभावमुक्त परराष्ट्र धोरण व नीतीच्या भवितव्याबद्दल त्यांना चिंता वाटत आहे. त्यातही भारताची सीमा लागून असलेल्या निकटच्या शेजारी देशांबरोबरचे संबंध हे स्वतंत्र व अन्य देशांपासून प्रभावमुक्तच असले पाहिजेत आणि त्यांचे स्वरुप द्विपक्षीच राखले गेले पाहिजे असे आग्रही मत बहुतेक परराष्ट्र संबंध विशेषज्ञांनी व्यक्त केले आहे. याचे कारण स्पष्ट आहे. शेजारी देशांबरोबरचे संबंध हे पूर्णत्वाने द्विपक्षीय हिताने प्रभावित असतात आणि त्यात तिसऱ्या देशाचा प्रवेश किंवा हस्तक्षेप ते संबंध बिघडविण्यास कारणीभूत ठरतो.




काश्मीरबाबत भारताची हीच भूमिका आहे. पण लडाखबाबत अमेरिकेचे मंत्रीद्वय भारतात येऊन जाहीर निवेदने करुनही भारतीय नेतृत्व मूग गिळून गप्प राहते हे परराष्ट्र नीती प्रभावित करण्याचे उदाहरण आहे. त्यामुळे भारत-चीन सीमाविवाद हा उभय देशातील द्विपक्षीय मुद्दा असून तिसऱ्या देशास त्यात स्थान नसल्याचा खुलासा चीनतर्फे झाला हे बरेच झाले. खरे तर भारताने तसे निवेदन करणे आवश्यक होते पण ते घडले नाही व त्यामुळेच महाशक्तीचा हा दबाव व प्रभाव असाच वाढत जाणार काय हा प्रश्न आगामी काळात सतत सतावल्याखेरीज राहणार नाही!

■■■

# सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ‘कोविड’ने शिकविलेला धडा

- डॉ.नीळकंठ रथ













राज्याच्या एकंदर खर्चापैकी जवळपास चार टक्के इतका खर्च आजघडीला आरोग्यसेवांवर केला जातो. राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा कार्यरत बनवायची म्हणले तर आजच्या दुप्पट म्हणजे साधारणतः राज्याच्या एकंदर वार्षिक खर्चापैकी आठएक टक्के इतका खर्च आरोग्याकडे वळवावा लागेल. एकीकडे





शालेय शिक्षणापोटी जवळपास इतकाच खर्च होत असताना आरोग्यसेवेसाठी तेवढीच तरतूद केली जावी, अशी अपेक्षा धरणे अनाठायी, अवाजवी म्हणता येईल का ?

'कोविड' १९ या विषाणूच्या प्रादुर्भावाने आपल्या सगळ्यांनाच एक महत्त्वाचा धडा शिकविलेला आहे. वास्तविक पाहता हा धडा आपण अगोदरच गिरवायला हवा होता. या धड्याचा संबंध आहे तो आपल्या देशातील सार्वजनिक आरोग्यविषयक व्यवस्थेशी, तिच्या वाढविस्ताराशी, रचनेशी आणि कार्यपद्धतीशीही. 'कोविड १९'चा संसर्ग झालेली अथवा तशी प्राथमिक लक्षणे आढळून येणारी एखादी व्यक्ती कुटुंबात आहे किंवा कसे याची चौकशी करण्यासाठी घरोघरी भेट देण्याकरिता तरूण महिला व पुरूष उमेदवारांची भरती करण्यासंदर्भात राज्य सरकारे अलीकडे जाहिराती प्रकाशित करत असल्याचे आपण बघतो आहोत. हे काम चालणार आहे केवळ दोनच महिने. आता, एवढ्या मोठ्या देशात घरोघर जाऊन ही चौकशी करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण लाभलेले तरूण पुरूष व महिला उमेदवार आपल्याला एवढ्या मोठ्या संख्येने कोठून व कसे मिळणार आहेत...आणि तेही जास्तीतजास्त केवळ दोनच महिन्यांच्या उमेदवारीसाठी ! आपल्या देशातील प्रत्येक खेड्यापाड्यात आणि शहरांमधील प्रभागा-प्रभागांत प्राथमिक आरोग्य केंद्रांची यंत्रणा आपण या पूर्वीच कार्यरत बनविली असती तर आज आली तशी आणि तेवढी बिकट व हातघाईची परिस्थिती आपल्यावर ओढवते ना. अशा प्रकारची यंत्रणा या आधीच कार्यान्वित केली गेली असती तर 'कोविड १९'च्या आजच्या फैलावासारख्या घडीलाच केवळ नव्हे तर एरवीही ती आपल्या कामाला आली असती. पूर्वापार येणाऱ्या साथीच्या रोगांप्रमाणेच कोरोनासारख्या नवनवीन विषाणूंच्या प्रादुर्भावापायी उद्भवणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यास आपल्याला त्यांमुळे अधिकच मदत झाली असती. अधूनमधून उद्भवणाऱ्या किरकोळ आजारपणांदरम्यान उपचारांसाठी नजिकच्याच शासकीय दवाखान्यामध्ये जाण्याची सवय लोकांच्या अंगवळणी पडली असती तर परिसरातील सरकारी दवाखान्यांची यंत्रणा आणि तिथे काम करणारा वैद्यकीय कर्मचारी वर्ग यांच्याबद्दल सर्वसामान्यांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण होण्यास त्यांमुळे आपसूकच हातभार लागला









लोकसंख्येची सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती त्या मानाने खूपच चांगली असलेल्या देशांमध्येही सर्वत्र कार्यरत असलेली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था तत्पर असल्याची कित्येक उदाहरणे आज दाखविता येतात. वैद्यकीय सेवा आणि आरोग्यविषयक विम्यासारख्या संरक्षक कवचांसाठी अशा देशांमधील समाजघटक खासगी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे चित्र तिथे दिसत नाही. परंतु, वैद्यकीय सेवेसाठी खासगी क्षेत्रावरच निर्भर राहण्याकडे आपल्या देशातील वैद्यकीय सेवाविषयक धोरणांचा कल मात्र अलीकडील काळात झुकताना दिसतो. परिणामी, कोरोनासारख्या विषाणूच्या साथीपायी आजच्यासारखी परिस्थिती उद्भवली की तिच्यातून भरडून निघण्याचे भागधेय आपल्या





असता. विषाणूच्या साथीचा आजच्यासारखा फेरा आल्यानंतर वैद्यकीय मदतीसाठी आज सर्वसामान्यांची जी धावाधाव आणि शोधाशोध चाललेली आपण अनुभवतो आहोत ते चित्र त्यांमुळे दिसले नसते. किंबहुना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल स्तरांत मोडणाऱ्या कुटुंबांची संख्या व प्रमाण एकूणांत मोठे असणाऱ्या आपल्यासारख्या देशात तर अशा धर्तीच्या वैद्यकीय सेवाव्यवस्थेची नितांत निकड भासते व आहेही. अशा सगळ्या समाजघटकांना वैद्यकीय उपचारांसाठी खासगी वैद्यकीय व्यावसायिकांकडे पावले वळविण्यास भाग पाडणे हे केवळ अव्यावहारिकच नव्हे तर तत्वशःदेखील अनुचितच होय. एकूणांतील मोठ्या

वाट्याला आलेले आहे. हे चित्र बदलणे आपल्याच हातात आहे– कार्यक्षम सार्वजनिक आरोग्य सेवा पुरविण्याची हमी देणाऱ्या पक्षाच्याच हाती सत्तेची सूत्रे सोपविणे. आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये आजमितीस सक्रिय असणाऱ्या पक्षांपैकी कोणीही, समजा, या कामाबाबत बांधिलकी दाखविण्यास राजी नसेल तर, सार्वजनिक आरोग्य सेवेचे सक्षमीकरण घडवून आणण्यास कटिबद्ध असणारा नवीन राजकीय पक्ष निर्माण करणे अथवा त्या दिशेने संघटनात्मक प्रयत्न करणे गरजेचे ठरेल. आपले आजचे धोरणकर्ते समाजातील केवळ 'आहे रे' वर्गाचेच प्रतिनिधित्व करत आहेत अथवा करताना दिसतात. 'आहे



रे' गटात समावेश नसलेले बाकी सारे निद्राधीन झालेले आहेत. झोपी गेलेल्यांच्या पदरात कधीच काहीच पडत नसते.

'काय करायला हवे...?' किंबहुना, 'काय करायला हवे होते...?' हे प्रश्न अशा सगळ्या परिस्थितीमध्ये पुढ्यात उभे ठाकतात. आपण अगदी तळापासूनच सुरुवात करू. सार्वजनिक वैद्यकीय सेवेसंदर्भात आपल्या देशातील धोरणामध्ये नमूद प्रचलीत मानकांनुसार दर तीन हजार लोकसंख्येमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असावयास हवे. त्याचप्रमाणे, एक परिचारिका आणि वैद्यकीय पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेला एक डॉक्टर या दोन व्यक्ती प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नियुक्त असावयास हव्यात. प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्वच्छता-साफसफाई राखणारे तसेच प्रसुतीदरम्यान लागणारी मदत पुरविणारे मनुष्यबळ तर वेगळेच. महाराष्ट्राची आजची लोकसंख्या जवळपास १२ कोटींच्या घरात भरते. ही लोकसंख्या लक्षात घेता,




राज्यातील सर्व खेडी व शहरे मिळून आजघडीला गरज आहे जवळजवळ ४० हजार प्राथमिक आरोग्य केंद्रांची. परिचारिकेचा अगदी सुरुवातीचा मासिक पगार १२ हजार रुपये धरला तरी, संपूर्ण राज्यभरातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील परिचारिकांच्या पगारापोटी आपल्याला वार्षिक गरज आहे ५७६ कोटी रुपयांची. परस्परांच्या निकट असलेल्या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी मिळून एक डॉक्टर तरी हवाच. प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये तो अर्धा-अर्धा दिवस कार्यरत असेल, असे आपण गृहीत धरू. एम. बी. बी. एस झालेल्या डॉक्टरला दर महिना ५० हजार रुपये पगार या हिशेबाने २० हजार प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी राज्यभरातील डॉक्टरांच्या पगारापोटी वर्षाला १२०० कोटी रुपये आपल्याला लागतील. परिचारिका आणि डॉक्टर या दोघांच्या वेतनापायी दरवर्षी कराव्या लागणाऱ्या या खर्चाची रक्कम भरते १७७६ कोटी रुपये इतकी. उपचारांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राकडे धाव घेणाऱ्या प्रत्येक रुग्णाकडून

दरवेळी १० रुपये इतका आकार घेतला जाईल, असे आपण गृहीत मनाशी धरू . दर प्राथमिक आरोग्य केंद्राला दर महिन्याला सरासरी ३०० रुग्ण भेट देतात असे गृहीत धरले तर, राज्यभरातील ४० हजार प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दरवर्षाला जमा होणाऱ्या वैद्यकीय शुल्काची रक्कम भरते ४४ कोटी रुपये इतकी. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामधील एक परिचारिका आणि एक डॉक्टर यांच्या पगाराचा वार्षिक खर्च आणि रुग्णांकडून वैद्यकीय शुल्काच्या रुपाने जमा होणारी रक्कम या दोहोंतील फरक येतो वर्षाला १६३२ कोटी रुपये असा. म्हणजेच, वर्षाला राज्यशासनाला नक्त १६३२ रुपये त्याच्या तिजोरीमधून खर्च करावे लागतील. सन २०२०-२१ या चालू वित्तीय वर्षासाठी राज्य सरकारच्या आरोग्य आणि कुटुंबनियोजन विभागाचे अंदाजपत्रक आहे १६ हजार कोटी रुपयांचे. म्हणजेच, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रातील एक परिचारिका व एक डॉक्टर यांच्या पगारापोटी राज्य शासनाच्या तिजोरीवर पडणाऱ्या वार्षिक नक्त १६३२ कोटी रुपयांचे राज्याच्या आरोग्य विभागाच्या वार्षिक अंदाजपत्रकाशी गुणोत्तर प्रमाण काढले तर ते भरते केवळ दहा टक्के इतके. (लोकसंख्या आणि आरोग्य विभागासाठीचे वार्षिक अंदाजपत्रक हे







दोन्हीही महाराष्ट्रापेक्षा कमी असणाऱ्या ओडिशा या राज्यामध्ये अशाच प्रकारची व्यवस्था राबविली गेली तर, ओडिशाच्या तिजोरीवर त्यांपायी पडणाऱ्या अतिरिक्त नक्त बोज्याचे प्रमाणही त्या राज्याच्या आरोग्य विभागाच्या विद्यमान अंदाजपत्रकाच्या दहा टक्के इतकेच दिसते). प्राथमिक आरोग्य केंद्राशी संलग्न किमान मनुष्यबळाचाच काय तो खर्च या ठिकाणी आपण विचारात घेतलेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत, ती बांधण्याचा भांडवली खर्च अथवा ती भाड्याने घेतली तर वर्षाकाठी अदा करावे लागणारे शुल्क, औषधखरेदीसाठी लागणारा पैसा, अन्य अनुषंगिक खर्च यांचाही हिशेब मांडणे गरजेचे ठरते. परंतु, या खर्चाचा अंदाज बांधणे मला तरी इथे शक्य नाही.

मात्र, या संदर्भातील एक बाब सुरुवातीलाच नोंदवून ठेवणे मला इष्ट वाटते. रोजच्या व्यवहारात उद्भवणाऱ्या नेहेमीच्या आजारांसाठी उपयोगी ठरणारी, तुलनेने फार महाग नसणारी अशीच औषधे शासनसंस्थेने उपलब्ध करून द्यावीत. अधिक महाग आणि काही आजारांवरील खास औषधे मात्र त्या त्या रुग्णाने त्याची त्याची खरेदी करावीत. या संदर्भात कैक वर्षांपूर्वीचा एक अनुभव अजूनही माझ्या स्मरणात आहे. एम. बी. बी. एस.ची पदवी प्राप्त करून घेतलेल्या पुण्यातील एका तरूण डॉक्टरची, तत्कालीन शासकीय नियमांना अनुसरून, प्रशिक्षणार्थी डॉक्टर म्हणून ग्रामीण भागातील एका प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सहा महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात आलेली होती. त्याच्या



उमेदवारीचा कार्यकाल संपण्याच्या सुमारास, एके दिवशी, तो डॉक्टर त्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील संबंधित दस्तऐवज घेऊन बसला आणि शासनातर्फे प्राथमिक आरोग्य केंद्राला पुरवठा करण्यात आलेल्या औषधांचा खर्च तो मांडून पाहू लागला. त्या वेळी त्याच्या ध्यानात एक मोठी रोचक बाब आली. ती अशी की, दररोजच्या जगण्यात उद्भवणाऱ्या नेहेमीच्या किरकोळ आजारांवर उपयुक्त ठरणाऱ्या वाजवी किमतींच्या औषधांचा वर्षभरासाठीचा साठा केवळ तीनएक महिन्यांच्या काळातच संपून जात असे. साहजिकच, अशी औषधे मग संबंधित रुग्णांना बाहेरून खरेदी करणे भाग पडे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांचाही नाइलाज असे.

परंतु, अधुनमधूनच केवळ उद्भवणाऱ्या रोगांवरील खास व महागड्या औषधांचा शासनाकडून केला जाणारा पुरवठा मात्र वर्षाचा काळ उलटून गेला तरी पडून राहत असे. प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरवठा केल्या जाणाऱ्या औषधांच्या आकृतिबंधासंदर्भातील हे वास्तव अनाकलनीय असेच होते. नेहेमीच्या आजारपणांवर लागू पडणाऱ्या औषधांचा पुरवठा शासकीय आरोग्य यंत्रणेला





करणाऱ्या पुरवठादारांना अशा औषधांच्या पुरवठ्यादाखल संबंधित यंत्रणेच्या हातावर मलई टिकवणे शक्य होत नसावे; मात्र, अधिक महाग औषधांमध्ये तशा व्यवहारांना वाव असल्यामुळेच तो सारा प्रकार घडत असावा, असा कयास मी ते सगळे ऐकले तेव्हा बांधला. अनेक वर्षांपूर्वी तेव्हा मला ज्ञात झालेला असा प्रकार महाराष्ट्रात आणि देशातील बव्हंश राज्यांत कदाचित आजही अव्याहत चालू






असावा. वेळोवेळी उद्भवणाऱ्या किरकोळ आजारांवर प्रभावी ठरणाऱ्या वाजवी किमतींच्या औषधांचा वर्षभर पुरेल इतका साठा प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरविला जावा आणि काही विशेष आजारांवरील महागडी अशी खास औषधे मात्र संबंधित रुग्णांनी गरजेनुसार त्यांची त्यांनी खरेदी करावीत, अशा प्रकारचे औषधखरेदीविषयक धोरण या संदर्भात अंमलात आणले जाणे अगत्याचे ठरते.


आजघडीला महाराष्ट्रामध्ये २०१२ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. साहजिकच, प्रचलीत मानकांनुसार ३८ हजार अधिक प्राथमिक आरोग्य केंद्रे आपल्याला निर्माण करणे भाग आहे. यापायी १६ हजार ८७२ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च येईल. प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून उपचार घेणाऱ्या रुग्णांकडून भरणा झालेल्या वैद्यकीय शुल्क ध्यानात घेता हा हिशेब १५ हजार ४३२ कोटी इतक्या नक्त रकमेचा भरतो. यांत अधिक भर पडेल ती औषधखरेदी तसेच अन्य आनुषंगिक बाबींसाठी कराव्या लागणाऱ्या तरतुदीची. प्रसृतीसाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किमान दोनएक वेगळ्या स्वतंत्र खोल्या, त्यासाठी आवश्यक असणारी उपकरणे, औषधे आणि कर्मचारी वर्ग आवश्यक ठरतो. स्थानिक परिसरातील आशा कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका प्राथमिक आरोग्य केंद्राशी संलग्न करून घेतल्या जाणे आवश्यक व उपयुक्त ठरते.

तसेच शहरांतील प्रत्येक प्रभागात १०० खाटांचे एकेक इस्पितळ असावयास हवे. प्रसुतीची सुविधाही अशा रुग्णालयांमधून पुरविली गेली पाहिजे. तज्ज्ञ आणि विशेषज्ञ डॉक्टर, परिचारिका, अन्य आनुषंगिक कर्मचारी, उपकरणे, क्ष-किरण यंत्रे यांसारख्या सोयीसुविधांनी अशी इस्पितळे सुसज्ज असायला हवीत. परिसरातील गरजवंत रुग्णांना इस्पितळापर्यंत घेऊ न येण्यासाठी रुग्णवाहिकांची उपलब्धताही तिथे असावयास हवी. प्रसुतीची सुविधा आणि ५०० खाटांची क्षमता असणारे एकेक रुग्णालय प्रत्येक जिल्ह्याच्या गावी उभारले गेले पाहिजे. तज्ज्ञ विशेषज्ञ, प्रशिक्षित परिचारिका व अन्य कर्मचारी, उपकरणे, रुग्णवाहिका, सोयीसुविधा, शस्त्रक्रियेसाठी सुसज्ज दालने यांसारख्या बाबी तिथे तैनात असावयास हव्यात. आजघडीला राज्यामध्ये एकंदर ३६ जिल्हे आहेत. या प्रत्येक जिल्ह्यामध्ये असे रुग्णालय उभारले गेले पाहिजे. आज कार्यरत असलेल्या जिल्हा रुग्णालयांचे आवश्यक ते सक्षमीकरण घडवून आणत नमूद केल्याप्रमाणे तिथे खाटांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये कार्यरत असणारी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था तसेच खेडोपाडीची प्राथमिक आरोग्य केंद्रे यांनी शिफारस करून उपचारांसाठी धाडलेले रुग्ण जिल्हा रुग्णालयांकडे येऊ शकतील. जिल्हा पातळीवर कार्यरत असणाऱ्या अशा रुग्णालयांमधून परिचारिकांच्या प्रशिक्षणाचीही सुविधा कार्यान्वित केली जाणे अगत्याचे ठरते. कारण, 'कोविड १९'सारख्या विषाणूच्या साथीदरम्यान प्रशिक्षित परिचारिकांची गरज मोठ्या संख्येने भासणार आहे. सरकारी तसेच खासगी



हे सगळे विवेचन झाले ते अगदी तळाच्या स्तरावरील आरोग्य सेवा व व्यवस्थेसंदर्भातील. आजमितीस राज्यात एकंदर तालुके आहेत ३५५. शहरोशहरींचे प्रभाग वेगळेच. त्यांची गणना इथे केलेली नाही. तालुक्याच्या गावी

Best Compliments






## BUDGET ALLOCATION FOR VARIOUS SECTORS

| ALLOCATION FOR EDUCATION | | ALLOCATION FOR HEALTH | | ALLOCATION FOR AGRICULTURE | |
|---|---|---|---|---|---|
| 2017-18 | 2018-19 | 2017-18 | 2018-19 | 2017-18 | 2018-19 |
| 14.1% | 13.9% | 4% | 4.5% | 3.9% | 3.3% |

वैद्यकीय महाविद्यालये तथा अत्यंत विशेष प्रकारचे खास उपचार करणारी उपचार केंद्रे यांची व्यवस्था वेगळी. तिचा विचार या ठिकाणी प्रस्तुत नाही. सार्वजनिक आरोग्यासंदर्भात आज ज्या प्रकारच्या आव्हानाला आपण तोंड देत आहोत तशा आव्हानांप्रमाणेच एरवीही लागणारी किरकोळ रुग्णसेवा गरजूंना पुरविण्यात ही सारी व्यवस्था कामी येईल.

राज्याच्या एकंदर खर्चापैकी जवळपास चार टक्के इतका खर्च आजघडीला आरोग्यसेवांवर केला जातो. इथवर विवरण केल्याप्रमाणे राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा कार्यरत बनवायची म्हणले तर आजच्या दुप्पट म्हणजे साधारणतः राज्याच्या एकंदर वार्षिक खर्चापैकी आठएक टक्के इतका खर्च आरोग्याकडे वळवावा लागेल. एकीकडे शालेय शिक्षणापोटी जवळपास इतकाच खर्च होत असताना आरोग्यसेवेसाठी तेवढीच तरतूद केली जावी, अशी अपेक्षा धरणे अनाठायी, अवाजवी म्हणता येईल का?

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा भाग असलेल्या



रुग्णालयांचे नियंत्रण व व्यवस्थापन हा या संदर्भातील एक कळीचा मुद्दा शाबीत होतो. आजची व्यवस्था अशी आहे की, या संदर्भात निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करते ते राज्य सरकारच. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्या वेळी तत्कालीन राज्य सरकारने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या स्थापनेसाठी कायदा मंजूर केला. राज्याच्या तत्कालीन अंदाजपत्रकापैकी जवळपास ४० टक्के रक्कम एकगठ्ठा जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित केली गेली. त्यांच्या त्यांच्या परिसरातील आवश्यक

(४) त्या कामांसाठी तसेच विकासोपक्रमांसाठी जिल्हा परिषदांनी त्या रकमेचा विनियोग करावा, अशी अपेक्षा व ती व्यवस्था होती. भारतीय राज्यघटनेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या ७३व्या घटनादुरुस्तीद्वारे तशीच व्यवस्था देशभरात अस्तित्त्वात आली. जिल्ह्याजिल्ह्यांत कार्यरत असणारे राज्य सरकारी कर्मचारी जिल्हा परिषदेचे कर्मचारी म्हणून त्या त्या जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत नियुक्त केले गेले. जिल्ह्यातील विविध संस्थांमध्ये भरती करावयाच्या कर्मचाऱ्यांची निवड करण्यासाठी वेगळे निवड मंडळ स्थापन करण्यात आलेले होते. साहजिकच, एका जिल्ह्यामधून दुसऱ्या जिल्ह्यामध्ये कर्मचाऱ्यांची बदली वगैरे होण्याचा अथवा केली जाण्याचा प्रश्नच उरला नाही. जिल्ह्यातील रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी जिल्हा प्रशासनाकडे होती व असे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या या प्रयोगाच्या अत्यंत यशस्वी अंमलबजावणीनंतर राज्य सरकारने एक कायदा मंजूर करू न ती व्यवस्था बरखास्तच करून टाकली. जिल्ह्यासंदर्भात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची तामिली करणारी यंत्रणा एवढेच काय ते स्वरूप जिल्हा परिषदांना आज व्यवहारात प्राप्त झालेले आहे. जिल्हाजिल्ह्यांतील विकास कामांसंदर्भातील निर्णयप्रक्रियेमधून तसेच त्या संदर्भात केल्या जाणाऱ्या कार्यवाहीमधून आपण वगळले गेल्याची अथवा जात असल्याची भावना आमदारांमध्ये दाटू लागल्यामुळे ते पाऊल उचलले गेले. राज्य विधानमंडळामध्ये कायदे मंजूर करणे तसेच शासनासाठी निधी उभारणे यांसारखी लोकप्रतिनिधींकडून स्वरू पतः अपेक्षित असणारी कामे तितकीशी महत्त्वाची नाहीत, अशी आमदारांची बनलेली धारणा याच्या मुळाशी होती अथवा असावी. जिल्हा परिषदांसंदर्भात राज्यात १९६१ साली अस्तित्त्वात आणला गेलेला तो कायदा पुनर्स्थापित करू न या लेखामध्ये सुचविण्यात आलेली रुग्णालयांची व्यवस्था अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदांकडे सुपूर्त केली जाण्यास अधिक विलंब होता कामा नये. अशा प्रकारची विकेंद्रीत व्यवस्था आजमितीस केरळमध्ये









कार्यरत आहे. 'कोविड १९'च्या फैलावापायी उद्भवलेल्या परिस्थितीचा सामना त्यांमुळेच तिथे अधिक चांगल्या प्रकारे करता आला.

राज्यातील विद्यमान सार्वजनिक आरोग्य सेवेसंदर्भात उपरोक्त विवेचनादरम्यान सुचविण्यात आलेली व्यवस्था एका वर्षात राबविता येणे शक्य नाही, हे तर उघडच आहे. परंतु, त्यांपायी प्रस्तुत योजना डोळ्यांआड केली जाणे अथवा तिच्या अंमलबजावणीदरम्यान काही तडजोड होऊ होणे हे उभय धोके टाळण्याच्या दृष्टीने या ठिकाणी एक बाब सुचवावीशी वाटते. या योजनेच्या तामिलीसाठी जेवढा म्हणून संभाव्य कालावधी आवश्यक ठरेल त्या कालावधीसाठी राज्य सरकारने एक कायदा मंजूर करून सुनिश्चित आराखडा निर्धारित करावा. जिल्ह्यांच्या लोकसंख्येच्या आधारे नव्याने उभारावयाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या, तालुका पातळीवरील रुग्णालयांची संख्या त्या आराखड्यामध्ये निर्देशित केली जावी. तसेच, राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये आजघडीला कार्यरत असलेल्या रुग्णालयांची क्षमता, तेथील सेवांची गुणवत्ता उंचावण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचा तपशीलही त्या आराखड्यात असावा. परिचारिकांच्या रिकाम्या जागा एका फटक्यात भरणे कदाचित शक्य होणार नाही. पुरेसे प्रशिक्षण न लाभलेल्या उमेदवार परिचारिका सेवेमध्ये दोन वर्षांच्या कालावधीनंतर कायम होण्याचा सध्याचा परिपाठ भविष्यातही चालू राहू नये यासाठी परिचारिकांचा परिवीक्षा कालावधी पाच वर्षांचा असावा. वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिकून बाहेर पडणाऱ्या डॉक्टरांना त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दोन वर्षे सेवा बजावल्यानंतरच अंतिम पदवी प्रदान करण्यात यावी. ही सारी व्यवस्था दशकभराच्या काळात सुविहितपणे कार्यरत व्हावी अथवा होईल अशी अपेक्षा. त्यासाठी जनसामान्यांनी तिच्या अंमलबजावणीबाबत आजच आग्रह धरावयास हवा.

■■■

Best

Compliments

# आधुनिक भारताचे शिल्पकार



# महात्मा फुले

आधुनिक भारताचे शिल्पकार महात्मा फुले यांचा सरकारकडून पहिला सत्कार १६ नोव्हेंबर १८५२ रोजी झाला. मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल सरकारी विद्या खात्याकडून त्यांचा सत्कार झाला. याच नोव्हेंबर महिन्यात २८ नोव्हेंबर १८९० रोजी त्यांचे निधन झाले. म्हणून त्यांचे हे कृतज्ञ स्मरण.

– प्रा. डॉ. गणेश राऊत

परंपरेने ज्यांना शिक्षण नाकारले अशा व्यक्तींसाठी शाळा चालविणाऱ्या आणि परंपरेने ज्यांना शिक्षण नाकारले त्याच वर्गातील एका व्यक्तीचा इंग्रजांकडून शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड काम केल्याबद्दल (खरं म्हणजे अभूतपूर्व) सत्कार आयोजित करण्यात येणे, हा आधुनिक भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा क्षेत्रातील एक 'टर्निंग पॉइंट' होता. ज्या कामासाठी त्यांचा सत्कार होणार होता त्याचे कारण म्हणजे स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून आणि विधात्याने आणि निसर्गाने इच्छिलेले स्थान त्यांना प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी अनेक योजनांचा विचार केला. त्या विचारांची निष्पत्ती म्हणजे अनेक अडचणींना तोंड देऊन मुलींची शाळा काढण्याचा निर्धार ही होय. या कामाच्या संदर्भात फुले यांची स्तुती आणि शिफारस केली होती. लंडनमधील कंपनी सरकारला राज्यपालांनी महात्मा फुले यांच्या कार्याची माहिती कळविली.

सरकारने या कामाची दखल घेऊन दोनशे रुपये किमतीची शाल (महावस्त्र) व सत्कार करण्याची आज्ञा आपले प्रतिनिधी म्हणून मेजर कँडी यांना कळविले. १६ नोव्हेंबर १८५२ रोजी विश्रामबागवाड्यात सभा झाली. या कार्यक्रमास युरोपियन गृहस्थ, स्त्रिया उपस्थित होत्या. फुले दांपत्याचा मित्रपरिवार आणि विद्यार्थी हजर होते. सत्काराला उत्तर देताना महात्मा फुले म्हणाले, "मी माझे कार्य सद्सद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेमुळे आणि विशेषतः ईश्वरी इच्छेप्रमाणे केले." 'स्त्रियांचा उद्धारकर्ता म्हणून महात्मा



निर्णयामुळेच ते जोतीबाचे 'महात्मा' झाले. फुले दाम्पत्याने चालविलेल्या शाळांचे । दादोबा पांडुरंग तर्खडकर आणि शिक्षामंडळाचे अध्यक्ष नामदार जॉन वॉर्डन यांनी कौतुक केले होते. मेजर कँडी यांनी जोतीबांच्या संस्थेला सरकारने अनुदान द्यावे अशी शिफारस करून दक्षिणा पारितोषिक समितीकडून दर महिना ७५ रुपयांचे अनुदान मान्य केले. मुंबईचे राज्यपाल नामदार व्हायकाऊंट फॉकलंड यांनी या फुले यांचा सत्कार झाला. अशा स्वरूपाची ही पहिलीच अभूतपूर्व घटना होती. म्हणूनच 'महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक' अशा शब्दात ख्यातनाम लेखक, इतिहास संशोधक धनंजय कीर यांनी त्यांचा गौरव केला आहे. यापेक्षा अधिक चांगल्या शब्दात वर्णन करता येणे अवघडच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले यांचे चरित्र लिहिणार होते. त्यांचे स्वप्न धनंजय कीर



Jyotirao established the first girls' school in August 1848. Later, he also opened two more schools for girls and lower castes- Mahars and Mangs.

यांनी पूर्ण केले हे विशेष.

पेशवाईत खासगी पाठशाळांमधून संस्कृत, व्याकरण, न्याय, वैद्यकशास्त्र, ज्योतिष, वेदांत, अलंकार आणि धर्मशास्त्र हे विषय शिकविले जात असत. त्याकाळी राज्यकर्त्यांची आणि काही वर्गांची अशी समजूत होती की शिक्षण ही फक्त काही लोकांचीच मिरासदारी आहे. अन्य कोणालाही शिकण्याचा अधिकार नाही. धनंजय कीर यांच्यासारख्या थोर चरित्रकारांनी लिहिले आहे की, "बाळबोध लिपी ब्राह्मणांशिवाय कदाचित कोणी शिकत असे. इतर लोक मोडी लिपी लिहावयास व वाचायला शिकत. अंक गणिताचा अभ्यास बराच घोटून घेण्यात येई. इतिहास किंवा भूगोल यासारखे विषय नावालादेखील नव्हते. त्याकाळची पुस्तके म्हणजे हस्तलिखित पोथ्या. त्यात देव-देवतांच्या ऐकीव कथा असावयाच्या.



प्रत्येक मुलगा म्हणजे एक वर्गच. आपले धडे तयार करताना विद्यार्थी एकाच तारस्वरात घोकंपट्टी करीत. जुने आणि जाणते विद्यार्थी नवीन मुलांना शिकवीत." या उताऱ्यावरून आपणास तत्कालीन शिक्षण पद्धतीची कल्पना येऊ शकेल.

१८३६ मध्ये, म्हणजे पेशव्यांची सत्ता संपून दोन दशक पूर्ण व्हायच्या आतच सरकारी खर्चाने पुणे जिल्ह्यातील खेड्यांमध्ये 'ग्राम' शाळा सुरू करण्यात आल्या. यात लेखन, वाचन आणि अंकगणित शिकविले जात असे. हा प्रयोग २६ वर्षे झाल्यावर बंद करण्यात आला. पुढे ९० वर्षांनी या प्रकल्पाचा अभ्यास करण्यात आला तेव्हा "ह्या ग्रामशाळांसंबंधी जे प्रतिवृत्त उपलब्ध आहे, ते खेड्यातील शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यास सध्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांस अत्यंत उपयुक्त ठरेल" असे कीर यांनी नमूद करून, "भारतीय शिक्षण क्षेत्राच्या इतिहासात हा प्रयोग मोठा

अपूर्व होता असे मानण्यात येते" अशी टिप्पणी जोडली आहे.

१८१३ च्या कायद्याने शिक्षण सर्वांसाठी खुले झाले तरी ते सर्वांपर्यंत पोहोचले नव्हते. १८२१ मध्ये 'पूना कॉलेज उर्फ संस्कृत पाठशाळा सुरू झाली. पुढे त्यात सर्वांना प्रवेश देण्यात येऊ लागताच त्या विरोधात प्रतिक्रिया उमटली. विधायक,सुधारणावादी विचारांची बाजू लक्षात घेऊन 'ज्ञानोदय' पत्राने सरकारची बाजू लावून धरली. प्रतिगाम्यांवर टीका करून ज्ञानोदयने लिहिले आहे की, "कलकत्ता महाविद्यालयात सर्व जातींच्या मुलांना प्रवेश मिळतो. सरकारने पोकळ मानापमानाच्या कल्पनेचे लाड करण्यासाठी आपल्या उत्पन्नातून पैसे खर्च करावेत, हे अयोग्य आहे. सार्वजनिक संस्था या सर्व वर्गांना खुल्या असल्याच पाहिजेत."

१८३५ च्या सरकारी निर्णयानुसार भारतात इंग्रजी भाषेतून पाश्चात्य शिक्षण देण्याचा ठराव झाला. पुढे एलेन बरो याने शिक्षण वरच्या वर्गातून खालपर्यंत झिरपत जाईल या 'झिरपणी सिद्धांतास' पाठिंबा दिला.

या पार्श्वभूमीवर श्री. गोविंदराव फुले यांनी जोतिराव यांस वयाच्या सातव्या वर्षी मराठी प्राथमिक शाळेत घातले. पुढे त्यांनी मिशनरी शाळेत माध्यमिक (इंग्रजी) शिक्षण घेतले. या शिक्षणातून आणि व्यक्तिगत आयुष्यात घडलेल्या प्रसंगांतून त्यांच्या असे लक्षात आले की, राजकीय गुलामगिरीपेक्षा सामाजिक गुलामगिरी अधिक वाईट आहे. जातिभेद हा संघटनेचा, एकोप्याचा आणि सुसंस्कृत जीवनाचा शत्रू आहे. यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता आपण दूर केली पाहिजे, असे महात्मा फुले यांनी ठरविले. कीर लिहितात, "अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रकाश." शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे मूळ असून ज्ञान सर्वांपर्यंत नेऊन शिक्षणाच्या माध्यमातून समतेचा प्रसार करण्याचे महात्मा फुले यांनी ठरविले.



महात्मा फुले यांनी हे ठरविले ते साल होते १८४८. जगाच्या दृष्टीने हे साल महत्त्वाचे आहे, कारण आशिया खंडात महात्मा फुले शिक्षणाच्या माध्यमातून समतेकडे जाण्यासाठी भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू करतात, युरोप खंडात कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो प्रसिद्ध होतो आणि अमेरिका खंडात न्यूयॉर्क शहरी स्त्री सुधारणा चळवळ सुरू होते, अशा तीन गोष्टी वरवर पाहता वेगळ्या परंतु एकाच अंत:प्रेरणेने सुरू झाल्या होत्या. अहमदनगर येथील अमेरिकन मिशनच्या





शाळेत मुलींना ज्या प्रकारे शिक्षण देण्यात येत होते त्याप्रमाणे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी कार्य सुरू केले. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता मुलींना शिकवणे किती अवघड असेल याची कल्पनादेखील करणे आज शक्य नाही. त्या काळातील काही समजुती पहा- मुलीने शिक्षण घेतल्यास तिचा नवरा अकाली मरतो. स्त्रियांनी चप्पल घातल्याने पुरूषांचा अपमान होतो वा ही गोष्ट अपवित्र आहे. तिने चप्पल, छत्री वापरायची नाही. घरादारासमोर, ज्येष्ठांसमोर नवऱ्याशी गप्पा मारायच्या नाहीत. स्त्रीने नवऱ्याचे जेवण झाल्यावरच जेवायचे. नवरा बाहेरगावी नोकरीधंदा करत असल्यास त्याच्या पत्नीने सासरीच राहायचे. अशा नानाविध बंधनात स्त्रियांना पुरुषांनी अडकवून टाकले होते. यामुळे स्त्री शिकण्यासोबतच आता शिकविण्यासाठी (क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले) घराबाहेर पडली. हे पाहून सनातनी लोक त्यांच्या अंगावर घाण टाकू लागले. त्या एवढंच म्हणाल्या, "मी आपले कर्तव्य करीत



आहे. देव तुम्हाला क्षमा करो." कीर यांनी या घटनेसंदर्भात लिहिले आहे की, "सावित्रीबाईंचा शिक्षण क्षेत्रात प्रवेश झाल्यापासून हिंदू स्त्री सार्वजनिक क्षेत्रात उतरली असे म्हणण्यास हरकत नाही."

१८१९ मध्ये कलकत्ता येथे सुरू झालेल्या अमेरिकन मिशनच्या शाळेत शिक्षक मुलींच्या घरी जाऊन त्यांना घेऊन येत असत. या शिक्षकांचा पगार मुलींच्या संख्येवर होता. १८४० मध्ये अमेरिकन मिशनने स्कॉटिश ख्रिस्ती धर्मोपदेशकांची शाळा चालविली. त्यात दहा मुली होत्या. शाळा पुढे बंद पडली आणि महात्मा फुले हे स्वतंत्रपणे मुलींची शाळा काढणारे पहिले भारतीय ठरले. जसजसा शाळांचा विस्तार झाला तसतसे गुरुवर्य लहुजीबुवांनी शाळेत मुली पाठविल्या. सदाशिवराव गोवंडे मुलींसाठी पाटी-पेन्सिल आणि दरमहा दोन रुपये देणगी देत, विष्णुपंत थत्ते हे शिक्षक, मेजर कँडी शाळेसाठी पुस्तके तर मोरो विठ्ठल वाळवेकर व देवराव ठोसर शाळेचा पत्रव्यवहार बघू लागले. अण्णासाहेब चिपळूणकरांनी आपला वाडा दिला तर केशवराव भवाळकर मदत करू लागले. महात्मा फुले यांनी शैक्षणिक कार्य अधिक जोमाने पुढे नेता यावे म्हणून एक कार्यकारी मंडळ नेमले. या मंडळात अण्णा सहस्रबुद्धे, बापूरावजी मांडे, विष्णू भिडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि विष्णुशास्त्री पंडित (विद्यार्थी) यांचा समावेश होता. या त्यांच्या कार्याचा पूना ऑब्झर्व्हर, बॉम्बे गार्डियन, ज्ञानप्रकाश, ट्रिब्यून यांनी गौरव केला आहे. १८५४ च्या वूडच्या खलित्यात असे नमूद करण्यात आले होते की, 'जातीचे कारण सांगून कुठल्याही मुलास सरकारी शाळेत अथवा महाविद्यालयात प्रवेश नाकारता येणार नाही.' यामुळे सरकारी शाळा सर्वांसाठी खुल्या झाल्या. हंटर कमिशन समोर साक्ष देताना महात्मा फुले यांनी 'जनतेमध्ये प्राथमिक शिक्षण काही वयोमर्यादेपर्यंत सक्तीचे करावे, निदान बारा वर्षे वयोमर्यादेपर्यंत तरी ते करावे अशी मागणी केली. 'अभ्यासक्रम आणि शिक्षक यंत्रणा यांची आमूलाग्र सुधारणा व्हायला हवी. शिक्षकांच्या नोकरीचे नियम आणि अटी या अधिक सोयीच्या आणि त्यांच्यासाठी स्वास्थ्यदायी पाहिजेत. त्यांच्या पगारात आणि दर्जात वाढ केली पाहिजे. अध्यापनशास्त्राची परीक्षा दिलेल्या शिक्षकांच्याच नेमणुका मुख्यत्वे व्हायला हव्यात.'





शिक्षणविषयक क्षेत्रातच त्यांनी कार्य केले असे नाही तर मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या सर्वच क्षेत्रात त्यांनी लीलया संचार केला. वरील लेखात त्यांच्या शिक्षणविषयक कार्यासाठी झालेला सत्कार समारंभ वर्णिला आहे. कीर यांच्याच शब्दात सांगायचे । तर, "आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचा जनक, भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य यांचा उद्गाता, शेतकरी व कामगार यांची दुःखे नि दारिद्र्य निवारण्यासाठी चळवळ उभारणारा पहिला पुढारी, जातिभेद संस्थेवर कडाडून हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारा पहिला लोकनेता, सामान्य जनतेच्या दुःखाला आणि अन्यायाला वाचा फोडणारा पहिला महात्मा आणि सत्यमेव जयते या दिव्य तत्त्वाने भारून गेलेला खरा सत्यशोधक अशा या नरोत्तमास महात्मा गांधींनी खरा महात्मा म्हणून गौरवावे, वीर सावरकरांनी समाजक्रांतिकारक म्हणून प्रशंसावे, भारतभूषण डॉ. आंबेडकरांनी गुरु मानून त्यांचा जयजयकार करावा आणि न्यायमूर्ती रानडे यांनी त्यांचे सहकार्य घ्यावे, यावरूनच जोतीरावांच्या ऐतिहासिक भूमिकेची सार्थकता व श्रेष्ठता पटण्यासारखी आहे." यावर अधिक काही लिहिण्याची गरज आहे काय?

■■■

# मुंबईचे शिल्पकार



# मेहता फिरोजशहा मेरवंजी

फिरोजशहा मेहता ‘मुंबईचे अनभिषिक्त सम्राट’ म्हणून ओळखले जातात.
भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक, उत्तम वकील, प्रशासक,
राष्ट्रवादी विचारसरणीचे सच्चे भारतीय म्हणून ते ख्यातकीर्त आहेत.
त्यांचा जन्म मुंबई येथे ४ ऑगस्ट १८४५ रोजी आणि
मृत्यू ५ नोव्हेंबर १९१५ रोजी झाला.. – प्रा. डॉ. गणेश राऊत



सर अलेक्झांडर ग्रँट



आर. डी. जिजीभॉय

फिरोजशहा यांचे शालेय शिक्षण आयर्टन शाळेत झाले. १८६१ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. एलफिन्स्टन कॉलेजात ते इतिहास आणि इंग्लिश या विषयांचे अत्यंत हुशार विद्यार्थी होते. त्यांच्या हुशारीमुळे महाविद्यालयाचे प्राचार्य सर अलेक्झांडर ग्रँट प्रभावित झाले. त्यांनी फिरोजशहांना 'दक्षिणा फेलो रूपाने मदत केली. आर. डी. जिजीभॉय यांच्या संस्थेकडे फिरोजशहा यांची शिफारस केली. यामुळेच ते पुढे इंग्लंडला गेले. प्राचार्यांनीच फिरोजशहा यांच्या वडिलांचे मन वळवून उच्चशिक्षणासाठी फिरोजशहांना इंग्लंडला पाठवले. इंग्लंडमधील 'लिंकन इन' येथे त्यांनी अभ्यासाची वर्षे आनंदात घालवली.

१८६४ ते १८६८ अशी चार वर्षे त्यांनी इंग्लंडमध्ये व्यतीत केली. इंग्लंडमध्ये असताना ते दादाभाई नौरोजी यांच्या संपर्कात आले. दादाभाईंचा प्रभाव त्यांच्या आयुष्यावर कायम राहिला.

१८६९ मध्ये मुंबईत 'बॉम्बे असोसिएशन' संस्था सुरू करून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाचा श्रीगणेशा केला. इंग्रजांचे वर्चस्व आपण संपविले पाहिजे अशाच विचारांनी ते भारावले होते. न्या. का. त्र्यं. तेलंग, बद्रुद्दिन तय्यबजी आणि फिरोजशहा हे तिघे 'मुंबईचे तेजस्वी तारे' म्हणून याच काळात ओळखले जाऊ लागले. याचे कारण म्हणजे सुरत येथे झालेल्या आंदोलनात भारतीयांची बाजू घेऊन त्यांनी न्याय मिळवून दिला. राष्ट्रीय जागृती करण्यास त्यांनी सुरुवात केली. या काळात त्यांचा न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, सर



काशिनाथ तेलंग



बद्रुद्दिन तय्यबजी



गोपाळ कृष्ण गोखले



महादेव गोविंद रानडे



सर दिनशॉ वाच्छा


दिनशॉ वाच्छा, व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्याशी संबंध आला. या सगळ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम फिरोजशहांवर झाला. याच्याच जोडीला सर अलेक्झांडर ग्रँट, ॲलन ह्यूम, विल्यम वेडरबन या पाश्चात्त्यांचाही त्यांच्यावर प्रभाव पडला. ते आयुष्यभर इंग्लिश आणि फ्रेंच साहित्याचे अभ्यासक राहिले. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळातील जहालमतवादी विचारवंतांच्या साहित्याचा त्यांनी कसून अभ्यास केला होता. टेलिसन, सर चार्लस डिकन्स यांच्या



ॲलन ह्यूम



व्योमेशचंद्र बॅनर्जी



दादाभाई नौरोजी

साहित्याचे ते नि:सीम चाहते होते. 'पवित्र बायबल'चा सुद्धा त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता. शिक्षण हा त्यांचा आयुष्यभराच्या ध्यास होता. भावी पिढ्यांना उत्तम शिक्षण मिळावे अशी त्यांची इच्छा होती. याचमुळे त्यांनी इंग्लंडमध्ये असताना ईस्ट इंडिया असोसिएशनच्या सभेत 'मुंबईमधील शिक्षण व्यवस्था' या विषयावर संशोधनपर निबंध वाचला होता. 'शिक्षण हेच सर्वांगीण सुधारणांचे महाद्वार आहे' यावर त्यांचा विश्वास होता. इंग्रजी भाषेत शिक्षणास त्यांनी प्रोत्साहन दिले. सरकारच्या शैक्षणिक धोरणांवर त्यांनी जोरदार टीका केली. अनुदान पद्धतीवरही त्यांनी टीका केली. संरक्षणावर ४० टक्के खर्च आणि शिक्षणावर १ टक्का खर्च यावरही टीका करून त्यांनी सरकारला धारेवर धरले. सर रिचर्ड टेंपल ज्या पद्धतीने मुंबई विद्यापीठ चालवीत होते, त्यावर मेहता यांनी जोरदार

टीका केली. राष्ट्राच्या संपत्तीचे रक्षण करण्यावर त्यांनी भर दिला. स्वयंनिर्भर होण्यासाठी आर्थिक स्वयंपूर्णतेला पर्याय नाही, असेच त्यांचे मत होते. यातूनच त्यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया या स्वदेशी बँकेची स्थापना केली. (१९११) बँक आर्थिकदृष्ट्या संकटात आली तेव्हा मेहता यांनी वेळोवेळी बँकेस मदत केली. आपले मित्र न्या. तेलंग यांच्या सहकार्याने त्यांनी स्वदेशी साबण निर्माण करण्याचा कारखाना काढला होता.



१८७२ च्या मुंबई महानगरपालिका विधायक कायद्यावर त्यांनी अगोदरच भरपूर सूचना केल्या होत्या. या कायद्यावर त्यांचीच छाप होती. म्हणूनच त्यांना 'मुंबईतील नागरी शासनाचे पिता' असे म्हणतात. नगरपालिकांमधील निवडणुकीचे तत्त्व या विषयावरील त्यांचे भाषण विलक्षण गाजले. १८८८ चा महानगरपालिकांच्या संदर्भातील कायदा हे मेहता-तेलंग प्रभृतींचे श्रेय आहे. या कायद्यासाठी त्यांना १८७३ च्या काळात मुंबईच्या आयुक्तपदावर केलेल्या कामाचा उपयोग झाला. १८८४-८५ मध्ये आणि १९०५ मध्ये ते मुंबई महानगरपालिकेचे अध्यक्ष होते.



१८८६ मध्ये ते मुंबई कायदेमंडळाचे सदस्य झाले. यासाठी त्यांना ऐन पंचविशीत केलेल्या कार्याचा उपयोग झाला. दादाभाई नौरोजी यांच्या प्रभावाने त्यांनी 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ची शाखा म्हणून 'बॉम्बे असोसिएशन' मुंबईत सुरू केली होती. या 'बॉम्बे असोसिएशनचे 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन'मध्ये रुपांतर झाले तेव्हा मेहता, न्या. तेलंग आणि दिनशॉ वाच्छा हे तिचे पहिले सरचिटणीस झाले. सार्वजनिक जीवनातील त्यांच्या या वावरानेच त्यांना कायदेमंडळाच्या सदस्यत्वापर्यंत नेले. वृत्तपत्रांच्या संदर्भातील कार्यासाठी फिरोजशहा अजरामर आहेत. १९१३ मध्ये 'बॉम्बे क्रॉनिकल' हे इंग्रजी भाषेतील पहिले राष्ट्रीय बाण्याचे वृत्तपत्र त्यांनी मुंबईत सुरू केले. याला कारण व्हर्नाक्युलर ॲक्ट होता.

१८७८ ते १८८० या काळात वृत्तपत्रांची गळचेपी करणारा कायदा अस्तित्वात होता. या कायद्यावर टीका करणे, जनजागृती करणे ही कामे फिरोजशहा यांनी जोरदारपणे केली. याच्याच जोडीला इंग्लंडमध्ये तयार झालेल्या कापडास भारतात हुकमी


बाजारपेठ निर्माण होण्यासाठी आयात करातून देण्यात आलेली सूट यावरही फिरोज शहा यांनी टीका केली. इंग्रजांची दुटप्पी धोरणे, त्यांची दांभिकता यावर त्यांनी उघड उघड टीका केली. इल्बर्ट बिलाला त्यांचा पाठिंबा होता. ब्रिटिशांच्या या प्रश्नावरील दुटप्पी भूमिकेवर त्यांनी प्रखर टीका केली. १८८५ मध्ये बॉम्बे



प्रेसिडेन्सी असोसिएशनचे काम करीत असतानाच ते अखिल भारतीय राष्ट्रीय सभेच्या कार्याकडे आकृष्ट झाले. १८८५ च्या पहिल्या मुंबई अधिवेशनात त्यांनी हिरीरीने भाग घेतला.

यातूनच पुढे त्यांनी काँग्रेसचे अध्यक्षपदही भूषविले. १८९२ मध्ये ते इंपीरियल कौन्सिलचे सदस्य म्हणून निवडले गेले. मुंबईच्या कायदेमंडळात त्यांनी अर्थसंकल्पावर केलेले भाषण विशेष गाजले. त्यात शिक्षणासाठीच्या तरतुदी






कमी असण्याबद्दल त्यांनी जोरदार टीका केली. कायदेमंडळात त्यांचे वक्तृत्व फुलून यायचे. इंग्रज सरकारविरुद्ध टीका करताना वक्रोक्ती, इंग्लिश भाषा, वेळेचा

योग्य वापर, अचूक शब्दयोजना, कायद्यातील त्रुटी अशी सगळी आयुधे ते वापरीत असत. मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असताना त्यांनी सार्वजनिक पैशाच्या उधळपट्टीवर बंधने आणली होती. अविचाराने कोणीही खर्च करू नये किंवा कोणाही सदस्याला आणि इंग्रज अधिकाऱ्यांना वायफळ खर्च करता येऊ नये अशा तरतुदी त्यांनी कायद्यात केल्या.



मुंबई सरकारने प्लेग रोग निवारणासंदर्भात जी कमिटी नेमली होती, त्या कमिटीच्या उधळपट्टीवर त्यांनी लगाम लावला. इंपिरियल कौन्सिलचे सदस्य म्हणून निवडले गेल्यावर त्यांनी शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी विविध उपाय सुचविले. लष्करी खर्च आणि शासकीय खर्चात कपात करण्यासाठी आग्रह धरला. लॉर्ड कर्झन याने 'विद्यापीठ कायदा' करून विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर बंधने आणण्याचा प्रयत्न करताच त्यावर त्यांनी कडाडून टीका केली. विद्यापीठांवरील सरकारी नियंत्रणास त्यांनी विरोध केला. एक आदर्श विरोधी पक्षनेता कसा असू शकतो, याचे ते उत्तम उदाहरण होते. नियतीचा संकेत असा की, ज्या विद्यापीठ कायद्यावर त्यांनी टीका केली, त्यांचाच कारभार सुधारण्यासाठी १९१५ मध्ये ते मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले. त्यांनीच १९१५ चे काँग्रेस अधिवेशन मुंबईत भरविण्यास मदत केली. सरकारने त्यांना 'सी. आय. ई.' हा किताब देऊन गौरविले होते. विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ लॉज' सन्मान दिला. गांधीजींनी त्यांच्या आत्मकथेत फिरोजशहा यांचा प्रामाणिकपणा, स्मरणशक्ती याचे कौतुक केले आहे. फिरोजशहा यांच्या सूचनेनेच गांधीजींनी भारतातील सर्व भाषणे अगोदर लेखी स्वरूपात तयार केली होती. फिरोजशहांविषयी गांधीजींनी एकच वाक्य लिहिले, 'सर फिरोजशहा तर मला हिमालयासारखे वाटले.'

■■■



**आकाश, नवी दिल्ली**

करोना विषाणूच्या विरोधात लढण्यासाठी पंतप्रधानांनी स्वत: टीव्हीच्या पडद्यावर अवतीर्ण होऊन लोकांना त्यांच्या मोबाईलमध्ये 'आरोग्यसेतु ॲप' डाऊनलोड करण्याचे आवाहन केले होते. पंतप्रधानांचे आवाहन हे सूचनावजा आदेश असतो. काही नागरिक त्याविरुध्द न्यायालयात गेले आणि हा नागरिकांच्या 'प्रायव्हसी' म्हणजे 'खासगीपणा'वर आक्रमण करण्याचा प्रकार आहे असा युक्तिवाद केला. न्यायालयाने आधार कार्डाप्रमाणेच आरोग्यसेतु ॲपची सक्ती फेटाळून लावली. तोपर्यंत सरकारने विमानप्रवासासह सरकारी कर्मचारी आणि नोकरदारांवर या ॲपची सक्ती जाहीर केलेली होती. सरकारच्या वाढत्या दडपशाहीचा हा एक नमूना पुरेसा आहे.




# केंद्र सरकारची



CENTRAL BUREAU OF INVESTIGATION
INDIA
Aarogya Setu
Protect one
Protect all
Protect India
आरोग्य सेतु एप्प
Google Play
ENFORCEMENT DIRECTORA

# वाढती दडपशाही



दिवाळी - दीपोत्सव ! भारतीय माणसाचा सर्वात आवडता सण ! उल्हास, आनंद आणणारा हा सण ! यावर्षी मात्र करोना विषाणूची पडछाया या दिव्यांच्या उत्सवावर आहे. ओढूनताणून का होईना बिचारी लोकं करोनाने काळवंडलेल्या सणाला आनंद-उल्हास-प्रकाशाने उजळवण्याचा प्रयत्न तर करणारच ! पण त्यात नेहमीच्या उत्साहाचा अभाव हा राहणारच आहे. करोना विषाणू आणि त्यामुळे निर्माण झालेल्या जीवघेण्या परिस्थितीच्या चक्रातून जगभरातले लोक जातच आहेत. त्यामुळे आहे त्या परिस्थितीला शरण जाणे आणि त्यातच आनंद मानण्याच्या प्रवृत्तीने सामान्यजन दिवाळीला सामोरे जातील. ही परिस्थिती टाळणे अशक्य होते ही वस्तुस्थिती मान्य करतानाच तिची उचित आणि योग्य किंवा योजनाबध्द रीतीने हाताळणी केली असती तर कदाचित लोकांचे इतके हाल झाले नसते या वास्तवाकडेही दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्यामुळेच वर्तमान परिस्थितीचा आढावा हा तेवढ्याच डोळसपणे घ्यावा लागेल.

आताच्या घडीला सभोवतालच्या परिस्थितीवर नजर टाकल्यावर काय दिसते? राष्ट्रीय पातळीवरील एकंदर परिस्थिती पाहता फक्त विचका आणि अनागोंदी आढळून येते. गेले किमान सहा महिने आणि त्याही आधीपासून देशाच्या आर्थिक स्थितीबाबत राज्यकर्त्यांनी डोळ्यावर कातडे पांघरलेले होते. देशाची अर्थव्यवस्था कमजोर, दुर्बळ झाली आहे, आर्थिक स्थिती खालावली आहे, या घसरणीमुळे सामान्य माणसाचे जीवनमान हालाखीचे होत चालले आहे, बेकारी वाढत आहे, विकासदर ऐतिहासिक नीचांकी पातळीला चालल्याचे राज्यकर्ते मान्य करायला तयार नव्हते. करोनाच्या संदर्भात सुरुवातीच्या काळात टीव्हीच्या पडद्यावर अवतीर्ण होणाऱ्या पंतप्रधानांनी एका



संबोधनात 'अर्थव्यवस्थेला काहीही झालेले नाही, ती चांगल्या अवस्थेत आहे' अशी ग्वाही पण दिली होती. प्रत्यक्षात घसरण वेगाने सुरु झाली होती. नेहमीप्रमाणेच ज्यांनी सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला त्यांना देशहित-विरोधी ठरविण्यात आले. ही झाली आर्थिक आघाडीवरची स्थिती. राजकीय आणि सामाजिक आघाडीवरही फारशी चांगली स्थिती आढळून येत नाही. शेतीविषयक कायदे, जीएसटीची राज्यांना द्यावयाची थकबाकी, सीबीआय, ईडीच्या माध्यमातून राज्यांच्या स्वायत्त अधिकारांवर अतिक्रमणाचे प्रकार, त्यातून केंद्र व राज्यांमधील वाढता तणाव आणि संघराज्य भावनेला बसलेला तडा, जम्मू-काश्मीरमधील बिघडती स्थिती, विविध माध्यमातून ध्रुवीकरणाच्या राजकारणाची अखंड मालिका, हे सर्व चालूच आहे. करोना विषाणूची साथ हे सरकारला मिळालेले आयते हत्यार आहे. कोणत्याही उत्तरदायित्वाला धुडकावून सरकारकडून अनेक निर्णय केले जात आहेत आणि त्यासाठी करोनाचे कारण पुढे करण्याचा सर्रास प्रकार सुरु झाला आहे. आंतरराष्ट्रीय किंवा परराष्ट्रसंबंधांच्या पातळीवरही साहसवादी भूमिकेचा अवलंब सुरु आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर व राजकारणात स्वतंत्र धोरण राखणारा देश ही भारताची ओळख जवळपास लुप्त होताना आढळत आहे आणि एका महासत्तेचा दुय्यम सहाय्यक देश म्हणून भारताची ओळख प्रसारित होताना दिसते. दिवाळीच्या सुखद प्रसंगी ही परिस्थिती पाहणे अतिशय दुर्दैवी आणि त्रासदायक आहे. परंतु देश या स्थितीला आला आहे या वास्तवाकडे डोळेझाक करुन तोंडदेखलेपणाने 'वाह वा, काय चांगली स्थिती आहे, यातूनही आपण बाहेर पडणार आहोत' अशा फुशारक्या मारणे अशक्य आहे. असंख्य लोकांच्या घरांमध्ये दिवे तरी लागतील काय अशी स्थिती आहे !


देशात सारे काही आलबेल आहे यासाठी वातावरणनिर्मिती करणे सुरु झाले आहे. एका आघाडीच्या आर्थिक वृत्तपत्राला मुलाखत देताना पंतप्रधानांनी देशाची



अर्थव्यवस्था बळकट असून पुढील वर्षी ती उसळी मारुन प्रगतीपथावर येईल असा विश्वास व्यक्त केला आहे. या असल्या 'उसळ्या' आणि 'दावे' गेली काही वर्षे सातत्याने ऐकण्यात आलेले आहेत. प्रत्यक्षात गेल्या दीड ते दोन वर्षांपासून अर्थव्यवस्था मंदावत गेलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. 2019च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळेसच देशातील बेकारी 45 वर्षात खालावलेली नव्हती एवढी नीचांकी नोंदली गेली होती. त्यानंतर त्यात वाढ नोंदली गेलेली नाही. घसरण चालूच राहिली. औद्योगिक उत्पादन, निर्यात या आघाड्यांवर कोणतीही 'उसळी' नोंदली गेली नाही. त्यातच करोना विषाणूचे आक्रमण झाल्यानंतर पुन्हा एकदा देशाच्या अर्थव्यवस्थेवर असा काही आघात



झाला की ती जवळपास पंगु झाली. तिचे आरोग्य प्रथम सुधारुन ती दोन पायांवर चालू लागल्यानंतरच 'उसळी' मारण्याचे दावे करणे शक्य होईल. परंतु सफाईदारपणे आणि बिनधास्तपणे छातीठोक दावे करण्यात 'प्रथम-क्रमांकी' नेतृत्व असल्यावर मागेपुढे पाहण्याचे कारणच उरत नाही. लोकांना एका मायावी वातावरणात आणि मायाजालात गुंतवले की हेतु सफल ! जेव्हा देशाचे नेतृत्व अर्थव्वस्था पुढील वर्षापर्यंत पूर्वपदावर येण्याचा दावा करते त्यासाठी सर्वाधिक थेट परकी गुंतवणुकीचे प्रस्ताव भारताकडे सादर झाल्याचे सांगण्यात येते. चीन, व्हिएतनाम, कोरिया यांच्या तुलनेत भारताकडे हे सर्वाधिक प्रस्ताव येतात याचाच अर्थ भारतीय अर्थव्यवस्थेच्या खात्रीशीरपणावर जागतिक गुंतवणूकदारांचा विश्वास आहे असा दावा केला जात आहे. तूर्तास हा दावा मान्य करु. परंतु आयएमएफ किंवा खुद्द भारतीय संख्याशास्त्र संस्था किंवा रिझर्व बँकेसारख्या भारतीय संस्थांनी भारताचा विकासदर नकारात्मक म्हणजे




जवळपास 'वजा किंवा उणे 23 टक्के' इतका खाली जाण्याचे अनुमान केले आहे ते खोटे मानायचे काय? अगदी अर्थ मंत्रालयाने कशीबशी बाजू सावरण्यासाठी ही टक्केवारी थोडी वाजवीपेक्षा जास्तच असल्याचे सांगताना देखील 'उणे-वजा 10 ते 12 टक्के' घसरण मान्य केलीच ना? अर्थमंत्र्यांनी ताज्या निवेदनात विकासदर शून्य टक्के किंवा त्याहून किंचितसा आणखी खाली जाण्याचे मान्य केले. याचा अर्थ काय घ्यायचा? कोण खरं बोलतंय? कोणती आकडेवारी



खरी?

अजुनही आपले संघराज्य आहे. देशात 28 राज्ये आहेत आणि नऊ केंद्रशासित प्रदेश आहेत. (जम्मू-काश्मीर-लडाख यांचे विभाजन करुन आणि त्यांचा पूर्ण राज्याचा दर्जा काढून घेऊन त्यांचे रुपांतर केंद्रशासित प्रदेशात केल्याने एक राज्य कमी झाले.) या राज्यांच्या आर्थिक

कामगिरीचा देशाच्या अर्थव्यवस्थेशी घनिष्ठ संबंध असतो. जीएसटी करप्रणाली लागू झाल्यानंतर राज्यांची अवस्था याचकासारखी झाली आहे कारण सर्व आर्थिक अधिकार केंद्र सरकारच्या हाती कें द्रित झाले आहेत. जीएसटी लागू करण्याच्या प्रक्रियेत म्हणजेच संक्रमण काळात राज्यांचे जे महसुली नुकसान होईल त्याची पहिली पाच वर्षे शंभर टक्के भरपाई केंद्र सरकारने करण्याची तरतूद यासंबंधीच्या कायद्यात करण्यात आली होती.

प्रत्यक्षात या ना त्या कारणाने केंद्र सरकारने त्यासाठी टाळाटाळ सुरु केली व यातूनच केंद्र आणि राज्यांदरम्यान संघर्षाची स्थिती उद्‌भवली. राज्यांना भरपाई देण्याऐवजी 2.8 टक्क्यांपर्यंत ती राखणे अपेक्षित होते पण परिस्थितीने दगा दिल्याने आता केंद्राची आणि राज्यांची देखील वित्तीय तूट आटोक्याबाहेर जाताना आढळते. राजकोषीय तूट म्हणजे खर्च आणि मिळकत यातील तफावत होय. सध्या राज्य आणि केंद्र या दोन्ही पातळ्यांवर महसुली आवक म्हणजेच मिळकत किंवा प्राप्ती ही तुटपुंजी आहे आणि खर्च मात्र मोकाट सुटलेला आहे. रिझर्व बँकेने त्यांच्या राज्यां संबंधीच्या अहवालात राज्यांच्या आर्थिक स्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त केलेली आहे व त्यामध्येच वरील मुद्यांकडे लक्ष वेधलेले आहे.

गेल्या चार वर्षात राज्यांच्या डोक्यावरील आर्थिक






केंद्र सरकारने उद्दामपणे राज्यांना तुम्ही कर्ज काढा असे सांगितल्यावर राज्य सरकारे खवळणे स्वाभाविक होते. करोनाविरुध्दच्या लढाईत प्रत्यक्ष लढाई राज्य सरकारे करीत आहेत म्हणजेच रणांगणावर राज्य सरकारे आहेत आणि केंद्र सरकारने केवळ मागे बसण्याची भूमिका घेतलेली आहे. ही लढाई किचकट व गुंतागुंतीची आहे आणि त्यामुळे त्याचा सर्व भार राज्यांच्या तिजोरीवर येऊ लागला आहे. देशाच्या एकंदर भांडवली खर्चाचा 60 टक्के भार राज्य उचलतात आणि म्हणूनच या विषाणूशी सामना करताना त्याचा ताण राज्यांच्या आर्थिक आरोग्यावर पडणे अटळ आहे. प्राथमिक अंदाजानुसार राज्यांची एकंदर वित्तीय तूट किंवा राजकोषीय तूट चार टक्क्यांचा आकडा पार करण्याची शक्यता आहे. बोजा साडेचार टक्क्यांनी वाढून 26.6 टक्के झाला आहे. राज्यांच्या तिजोरीवरील आर्थिक ताण वाढता असल्याने राज्यांच्या खर्चावरही मोठ्या मर्यादा आलेल्या आहेत आणि परिणामी आर्थिक विकासवाढ ही भरपूर मार खाणार आहे. राज्यांच्या दबावामुळे केंद्र सरकारने जीएसटीची भरपाई देण्याचे मान्य केले असले तरी ती अंशतः आहे. सुमारे अडीच लाख कोटि रुपयांपैकी तूर्तास केंद्राने 1.10 लाख कोटि रुपयांची भरपाईच देऊ केलेली आहे. उर्वरित भरपाईबाबत राज्यांनी खुलासा मागितलेला आहे.

ढोबळमानाने जी ताजी आर्थिक स्थिती आहे त्यानुसार लॉकडाऊन मागे घेतल्यानंतर मंदगतीने का होईना पण आर्थिक व्यवहार सुरु झाले आहेत. अद्याप बाजारात

मागणीला उठाव आलेला नाही. दिवाळीमुळे काही प्रमाणात बाजारात हालचाल जाणवत असली तरी ती काही क्षेत्रांपुरतीच मर्यादित असलेली आढळते. विशेषतः वाहन उद्योगात मागणी वाढल्याचे मोठमोठे दावे केले जात आहेत. परंतु त्याला काही कारणे आहेत. करोनामुळे सार्वजनिक वाहतूक म्हणावी त्या प्रमाणात पूर्वस्थितीला आलेली नाही. त्याचप्रमाणे सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करण्यातील धोके लक्षात घेऊन लोकांचा कल स्वतःचे वाहन घेण्याकडे





अधिक आहे. त्यासाठी प्रसंगी पोटाला चिमटा आणि कर्ज काढूनही वाहने घेतली जात आहेत. त्याला खऱ्या अर्थाने मागणी म्हणता येणार नाही. परंतु ही तेजी इतरत्र आढळून येत नाही. कपडेलत्ते, घरगुती उपकरणे आणि ग्राहकोपयोगी दैनंदिन उपयोगाच्या वस्तु यांची जी खरेदी दिवाळीनिमित्त होत असे किंवा जुना टीव्ही बदलून नवीन टीव्ही घेण्याचे प्रकारही कमी झालेले आहेत. शेतकऱ्यांना शेतमजूर मिळत नसल्याने काही शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर खरेदीचा मार्ग अवलंबिलेला आहे. त्यामागेही मागणीपेक्षा नाईलाज हा भाग अधिक आहे. यातून शेतकरी पुन्हा कर्जबाजारीच होणार आहे. त्यात त्याला पुरेशी मिळकत न झाल्यास हा बोजा वाढतही जाऊ शकतो.






त्यामुळेच विविध वित्तीय संस्था आणि आर्थिक घडामोडींवर लक्ष ठेवणाऱ्या अनेक अध्ययन संस्थांच्या मते अर्थव्यवस्थेने अद्याप वळण घेतलेले नाही.

तसेच उद्योगांमध्ये उत्पादनवाढ किंवा व्यवसायांमध्ये देखील स्थिती पूर्वपदावर आलेली नाही. जोपर्यंत याबाबत निर्णायक किंवा ठोस अशी दिशा स्पष्टपणे दिसून येत नाही तोपर्यंत अर्थव्यवस्था पुन्हा प्रगतीच्या मार्गावर आल्याचे म्हटता येणार नाही असे या संस्थांनी स्पष्ट केले आहे. कामगार कपात आणि कामगारांच्या उपलब्धतेमधील नव्या अडचणी लक्षात घेऊन कारखाने आणि उद्योगांनी स्वयंचलित किंवा ऑटोमॅटिक यंत्रणा उभारण्याचे ठरविले तर त्याची अत्यंत वाईट झळ कामगार क्षेत्राला बसू शकते असा एक भयावह अंदाजही काही तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. याचे एक उदाहरणही समोर आले आहे. करोना साथीच्या निमित्ताने एका मोठ्या सिमेंट कंपनीने काही हजार कामगारांना लेऑफ दिला. सिमेंट उत्पादनही बंद केले. आता त्या कंपनीने नव्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे सिमेंट प्रकल्प पुन्हा सुरु करण्याचे काम सुरु केले आहे. यासाठी त्यांना पूर्वीपेक्षा निम्म्याहून कमी कामगार म्हणजेच मनुष्यबळ लागणार आहे. हा नवा पायंडा भीती उत्पन्न करणारा आहे. त्यात वर्तमान राज्यकर्ते हे कामगारांपेक्षा मालकांना अधिक धार्जिणे असल्याचे ताज्या कामगारविषयक नव्या कायद्यांवरुन स्पष्ट झालेलेच आहे. त्यामुळे बेकारी वाढण्यापेक्षा त्यात आगामी काळात वाढ झालेली आढळल्यास कुणाला आश्चर्य वाटायला नको !

पंतप्रधानांनी त्यांच्या अतिकडक लॉकडाऊनचे समर्थन केले आहे. परंतु यामुळे अर्थव्यवस्थेची चाके थांबली. थांबलेली चाके सुरु होण्याऐवजी आणखी खाली रुतली आणि आता ती वर काढून पुन्हा चालू करणे यातच सरकारची शक्ति खच्ची होताना आढळत आहे. ती लडखडत चालताना दिसत असली तरी काही चाके चालत आहेत तर काही अद्याप बंद पडलेली आहेत. म्हणूनच अर्थव्यवस्था मार्गस्थ झालेली नाही हे त्यावरुन स्पष्ट होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने काही आर्थिक मदतयोजनांची घोषणा केली असली तरी अर्थव्यवस्थेत असलेला पैशाचा ठणठणाट अद्याप संपलेला नाही.

पैसा खेळता नसल्याने व्यवहार बंद पडल्यासारखे आहेत. उद्योग-व्यवसाय बंद, ते पुन्हा सुरु करायचे झाल्यास त्यासाठी



लागणारे भांडवल किंवा पैसा जवळ नाही, तसेच सहा महिन्यांच्या राष्ट्रीय टाळेबंदीने मिळकत शून्य झालेली आहे, सरकारचे कर किंवा कर्जाचे हप्ते भरण्यासाठी पैसे नाहीत आणि त्याचा बोजा वाढत चालला आहे. दुसरीकडे कर्जांची व त्यांच्या हप्त्यांची परतफेड नसल्याने वित्तीय संस्थांचे प्राण कंठाशी आले आहेतच परंतु लोकांनी खर्चाऐवजी पैसे सुरक्षित ठेवण्याच्या हेतुने बचतीवर भर द्यायला सुरुवात केली आहे. उद्योग व्यवसाय नवीन कर्ज काढेनासे झालेले आहेत.







सरकारला कररुपाने मिळणारा महसूलही अद्याप खालावलेलाच आहे. त्यामुळे सरकारच्या खर्चावरही मर्यादा पडल्या आहेत. सरकारही कर्ज काढून गरजा भागवण्याच्या अवस्थेत आहे. थोडक्यात आत्मविश्वासाचा अभाव, अनिश्चितता अशा भोवऱ्यात किंवा दुष्टचक्रात अर्थव्यवस्था सापडलेली आहे. त्यातून बाहेर येण्याची धडपड चालू असली तरी अद्याप त्याला यश मिळताना दिसत नाही. त्यात 'आत्मनिर्भर भारत' अशी घोषणा करुन आर्थिक सुधारणांचे काटे मागे फिरविण्याचे उद्योग सुरु झालेले आढळतात. यामध्ये काही विशिष्ट उद्योगपतींची चांदी करणे, सरकारी उद्योगांची मनमानी विक्री करुन त्यामार्गेही काही मोजक्याच मंडळींना फायदा पोहोचविणे, विमान, रेल्वे, पेट्रोलियम व डिझेलच्या तेलकंपन्या, बँका

यांच्या सरसकट खासगीकरणाची मोहिमच सरकारने हाती घेतलेली दिसते. सरकारी उद्योगांची स्थापना ही प्रामुख्याने गरीब व कमकुवत वर्गाच्या सेवेच्या उद्दिष्टाने करण्यात आली होती. रेल्वेचे भाडे सामान्यांना परवडेल असे ठेवण्यामागे हीच भूमिका होती. परंतु ते सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्याऐवजी अनियंत्रित व बेलगाम खासगीकरणाचा अट्टाहास सुरु करण्यात आला आहे. करोनाच्या नावाखाली सर्वसामान्यांच्या सोयीसवलती काढून घेण्यात आल्या आहेतच आणि आता खासगीकरणाच्या माध्यमातून आक्रमक राष्ट्रवादाच्या माध्यमातून धार्मिक व सामाजिक ध्रुवीकरण, बहुसंख्यकवादाला वाढते खतपाणी, वाढती असहिष्णुता आणि एवढ्यातेवढ्या कारणांवरुन विरोधी मत नोंदविणाऱ्यांविरुध्द थेट राष्ट्रविरोधी कारवायांच्या नावाखाली विविध तपाससंस्थांच्या माध्यमातून चौकशा व तपासाचा ससेमिरा लावणे असे सर्वसाधारण चित्र आहे. सरकारच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या माध्यमांना देखील या प्रकारच्या सरकारी तंत्राशी सामना करावा लागत आहे. प्रत्येक राज्यात आपल्याच पक्षाचे सरकार कसे सत्तेत येईल या अट्टाहासाने






या सर्व सेवा सामान्यांना न परवडणाऱ्या करण्याकडेच राज्यकर्त्यांचा कल दिसून येतो. वर पंतप्रधान हे मुलाखती देऊन 'भारताने बाजारावर आधारित अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे' असे दावे करीत आहेत. सामान्य माणसावर ते लादण्यात येत आहे हे वास्तव नाकारण्याचा हा प्रकार आहे.

राजकीय-सामाजिक आघाडीवरील स्थिती याहून वाईट आहे. लोकशाही संस्थांचा ऱ्हास चालूच आहे. सत्ता आणि अधिकारांचे अतिकेंद्रीकरण, संघराज्य संकल्पनेऐवजी केंद्र सरकारकडे सर्व सूत्रे आणि अधिकार राखण्यावर भर, इरेस पेटलेले नेते सध्या राजकारणात आहेत आणि त्यासाठी वाटेल त्या थराला जाण्याचे उद्योग सुरु आहेत. त्यासाठी राज्यपालासारख्या घटनात्मक संस्थेचा गैरवापरही सुरु आहे. बिहारनंतर पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. तेथील ममता बॅनर्जी यांच्या सरकारचे अस्तित्व असेच सत्ताधाऱ्यांना असह्य होत असल्याने त्यांचे तेथून उच्चाटन कसे करता येईल यासाठी सध्या आटापिटा-धडपड आणि मनसुबे सुरु झाले आहेत. त्यामुळे राजकीय व सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवर असहिष्णुतेचा प्रभाव आढळून येतो.

आंतरराष्ट्रीय किंवा परराष्ट्रसंबंधांच्या पातळीवरील घडामोडी पाहता आतापर्यंत जागतिक राजकारणात भारताने कोणत्याही विशिष्ट गटात समाविष्ट न होता स्वतःची तटस्थ

आणि स्वतंत्र अशी परराष्ट्र नीती किंवा धोरण राखण्यात यश मिळवले होते. परंतु आता साहसवाद आणि संघर्ष ही तत्वे परराष्ट्र धोरणात अमलात आणली जात आहेत की काय अशी शंका येते. शेजारी देशांना व त्यांच्याबरोबरच्या संबंधांमध्ये सुधारणा करण्यास प्राधान्य देण्याच्या मारे फुशारक्या मारण्यात आल्या होत्या. त्याचे बारा वाजले आहेत. सर्व शेजारी देश या ना त्या कारणाने बिथरलेले आहेत. चीनबरोबरच्या संबंधांचे जिवंत उदाहरण लडाखमध्ये अनुभवाला येतच आहे. पाकिस्तान हा भारताच्या दृष्टीने हिणकस देश असूनही त्याला सतत बरोबरीच्या











नात्याला आणून त्या आधारे देशातल्या अल्पसंख्यकांविरुध्द वातावरणनिर्मिती आणि स्वतःचे आसन बळकट करण्यासाठी ध्रुवीकरण व देशभक्तीचा कैफ तयार करण्याचे नवे रसायन सत्ताधाऱ्यांच्या हाती आले आहे. त्याचा सर्रास वापर केला जात आहे. आजतागायत भारताने स्वतंत्र परराष्ट्र धोरण राखताना कोणत्याही महासत्तेच्या अवाजवी कच्छपि लागण्याचे नाकारले होते आणि या सर्वच महासत्तांशी अंतर राखून आपले परराष्ट्र धोरण परिपक्व राखले होते. परंतु आता भारताला अमेरिकेच्या दावणीला बांधण्याचे काम सुरु आहे. शेजारी देशांबरोबरचे संबंध हे वेगळ्या व स्वतंत्र पातळीवरुन हाताळण्याचे भारताचे धोरण होते पण आता त्यात बदल आढळतो. भारताला विशिष्ट महासत्तेच्या गटाचा सक्रिय सदस्य करण्याच्या दिशेने वाटचाल सुरु दिसते. दीर्घकालीन दृष्टीने आणि भारताच्या भविष्याच्या दृष्टीने हे धोरण फारसे उपकारक ठरणारे नाही असे तज्ञांचे म्हणणे आहे. अमेरिकेने उदार धोरण अवलंबिले असले तरी त्यातील खात्रीशीरपणाबद्दल नेहमीच शंका राहतील असे या तज्ञांचे मत आहे.

दिवाळीच्या निमित्ताने देशातील सद्यःस्थितीबद्दल चिंता व्यक्त करण्याची आवश्यकता का आहे? एक साधी गोष्ट घ्या. करोना विषाणूच्या विरोधात लढण्यासाठी पंतप्रधानांनी स्वतः टीव्हीच्या पडद्यावर अवतीर्ण होऊन लोकांना त्यांच्या मोबाईलमध्ये 'आरोग्यसेतु ॲप' डाऊनलोड करण्याचे आवाहन केले होते. पंतप्रधानांचे आवाहन हे सूचनावजा आदेश असतो. काही नागरिक त्याविरुध्द न्यायालयात गेले



आणि हा नागरिकांच्या 'प्रायव्हसी' म्हणजे 'खासगीपणा'वर आक्रमण करण्याचा प्रकार आहे असा युक्तिवाद केला. न्यायालयाने आधार कार्डाप्रमाणेच आरोग्यसेतु ॲपची







सक्ती फेटाळून लावली. तोपर्यंत सरकारने विमानप्रवासासह सरकारी कर्मचारी आणि नोकरदारांवर या ॲपची सक्ती जाहीर केलेली होती. सरकारच्या वाढत्या दडपशाहीचा हा एक नमूना पुरेसा आहे. आता माहिती अधिकाराअंतर्गत हे 'आरोग्यसेतु ॲप' तयार कुणी केले अशी विचारणा केली असता सरकारने त्याबाबत चक्क उत्तर टाळण्याचा प्रयत्न केला आहे. आता 'आरोग्यसेतु ॲप'चा कर्ताकरविता कोण, त्याला जन्माला घालणारा कोण याची माहितीच सरकारला नाही किंवा नसेल तर मग सर्व नागरिकांना त्यांच्या मोबाईलमध्ये ते 'ॲप' डाऊनलोड करण्याची सक्ती कशी केली जाऊ शकते? जर या 'ॲप'च्या अधिकृतपणाबद्दलच शंका आहे आणि सरकारलाच त्याबद्दल निश्चित माहिती नसेल तर देशाचे पंतप्रधान त्याचा प्रचार व प्रसार करु शकतात? सरकारच्या या टोलवाटोलवीने यासंदर्भात शंका व संशयास उधाण आले आहे. कारण सध्या 'डेटा सिक्युरिटी'चा मुद्दा गरम आहे आणि जर अशा अनधिकृत ॲपच्या माध्यमातून भारतीय नागरिकांची आरोग्यविषयक माहिती बाहेर फोडली जात असेल तर ती बाब गंभीर आहे. या एका उदाहरणावरुन देशात सध्या सक्रिय असलेल्या मनोवृत्तीचा उलगडा होतो. या लपवाछपवीमुळेच सरकारच्या हेतुबद्दल शंका निर्माण झाल्याखेरीज रहात नाही.

म्हणूनच सामान्य नागरिकांच्या व्यक्तिगत व खासगी माहितीचे बारीकसारीक तपशीलांची नोंद सरकारदरबारी करण्याचा हा अट्टाहास देशाला 'पोलिस राज्य' बनवल्याखेरीज राहणार नाही. त्या दिशेने सुरु झालेली वाटचाल धोकादायक आणि चिंताजनक आहे. त्याला आळा कसा आणि कोण घालणार हा प्रश्न आहे. देशाच्या राज्यकारभाराचा गुंता व विचका जसजसा वाढत जाईल त्या प्रमाणात ही बंधने वाढत जातील हे स्पष्ट आहे. सरकारला जेव्हा विविध आघाड्यांवर अपयश येऊ लागते तेव्हा सत्तेला चिकटून राहण्यासाठी विविध दबाव, बंधने लादण्याचे आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याचा संकोच करण्याचे प्रकार सत्ताधाऱ्यांकडून केले जाऊ लागतात. त्यासाठी विविध कारणे पुढे केली जाऊ लागतात. परिस्थिती विचार करण्यासारखी आहे. सार्वत्रिक चिंतेच्या टप्प्यातून देश चालला आहे !

■■■







# का हो धरला मजवर राऽऽऽऽऽऽग????

काँग्रेसची गळती चालूच आहे.

रोज कुणी ना कुणीतरी पक्ष सोडून जातानाच्या बातम्या येत आहेत. अगदी ताजे उदाहरण घ्यायचे झाल्यास उत्तर प्रदेशातून लोकसभेच्या सदस्य राहिलेल्या अन्नू टंडन यांचे आहे.

अन्नू टंडन या उत्तर प्रदेशातील उन्नाव मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आल्या होत्या. त्यांच्या पतीच्या माध्यमातून त्यांचे देशाच्या कॉर्पोरेट जगताशी निकटचे संबंध आले. पतीच्या निधनानंतरही ते कायम राहिले. देशातल्या सर्वात मोठ्या उद्योगसमूहाशी आणि त्या समूहाच्या



प्रमुख कुटुंबियांशी त्यांची निकटता टिकून आहे.

उन्नाव जिल्ह्यात त्या त्यांच्या आई-वडिलांच्या नावाने स्थापन संस्थेच्या माध्यमातून समाजसेवेचे काम करतात. २००४ मध्ये काँग्रेसच्या तिकिटावर त्या लोकसभेवर निवडून आल्या परंतु लागोपाठच्या दोन निवडणुकात - २००९ व २०१४ - मध्ये त्या हरल्या. पण काँग्रेसमध्ये कायम राहिल्या.

आता बहुधा त्यांची सहनशीलता संपली असावी आणि त्यांनी काँग्रेसला रामराम करुन समाजवादी पक्षात प्रवेश केला आहे.

काँग्रेसच्या गळतीचे आणखीही एक वैशिष्ट्य दिसून येते. अनेक प्रमुख महिला नेत्यांनी पक्षत्याग केल्याचे आढळून येते. अन्नू टंडन यांचे अगदीच ताजे उदाहरण आहे. पण त्यांच्या आधीच म्हणजे साधारण दोन आठवड्यांपूर्वी तमीळनाडूतील

काँग्रेसच्या 'हाय प्रोफाईल' नेत्या आणि पक्षातर्फे प्रवक्त्या म्हणून टीव्हीवर गेली काही वर्षे झळकलेल्या अभिनेत्री खुशबू सुंदर यांनीही काँग्रेसचा 'हात सोडून 'कमळ' हाती धरले...............म्हणजे भाजपमध्ये प्रवेश केला.

तमीळनाडूमध्ये कोणताच पाया नसलेल्या भाजपला त्यांच्या प्रवेशाने





हर्षवायू झाला. कानोकानी आलेल्या माहितीनुसार त्याचे कारण असे आहे की भाजपला त्यांच्यामध्ये दिवंगत मुख्यमंत्री आणि तमीळनाडूच्या गाजलेल्या अभिनेत्री व नेत्या जयललिता यांचे रूप दिसू लागले आहे. तमीळनाडूतीलच अन्य एक अतिलोकप्रिय अभिनेते रजनीकांत यांनी राजकारणात प्रवेश करावा असे प्रयत्न काही मंडळी करीत आहेत आणि त्यामागे भाजप नेतृत्वाचा हात असल्याची चर्चा कानावर येते. ते अजुन शक्य न झाल्याने 'काँग्रेसत्यागी' खुशबू यांना त्यांनी भाजप पुरस्कृत सर्व मंचांवर मोठी भूमिका देण्यास सुरुवात केली आहे.

मुंबईतील काँग्रेसमध्ये सक्रिय असलेल्या आणि काँग्रेसच्या प्रवक्त्या म्हणून टीव्हीवर नेहमीच झळकणाऱ्या प्रियंका चतुर्वेदी यांनीही पक्षत्याग केला आणि शिवसेनेत प्रवेश केला. त्या नशीबवान ठरल्या कारण शिवसेनेने त्यांना लगोलग राज्यसभेवरही पाठविले. त्यामुळे त्यांचा पक्षत्याग त्यांना लाभदायक ठरला.

परंतु आता महाराष्ट्रात शिवसेना आणि काँग्रेस एकत्र सरकारमध्ये आहेत त्यामुळे अप्रत्यक्षपणे का होईना त्या पुन्हा काँग्रेसच्याच जवळ राहिल्या आहेत असे म्हटल्यास वावगे होणार नाही. उदाहरणे अनेक आहेत.

रीता बहुगुणा जोशी या एकेकाळी उत्तर प्रदेशासारख्या महत्वाच्या व मोठ्या राज्याच्या प्रदेश काँग्रेस अध्यक्ष होत्या. काँग्रेसतर्फे आमदारही होत्या.





दोनवेळेस त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवली पण यशस्वी झाल्या नाहीत.

२०१६मध्ये त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. सध्या त्या अलाहाबादचे (प्रयागराज) लोकसभेत प्रतिनिधित्व करतात.

भारतीय राजकारणात झंझावाताप्रमाणे प्रविष्ट झालेले तेलगु अभिनेते एन.टी.रामाराव यांच्या कन्या डी. पुरंदेश्वरी या काँग्रेसमध्ये होत्या. लोकसभेवर होत्या, मनमोहनसिंग मंत्रिमंडळात राज्यमंत्रीही होत्या.

परंतु रामाराव यांचे जावई आणि ज्यांनी रामाराव यांना दगा देऊन त्यांचा तेलगु देशम पक्ष ताब्यात घेतला त्या चंद्रबाबू नायडू यांच्याबरोबर काँग्रेसने आघाडी केल्याने नाराज होऊन त्यांनी काँग्रेसचा त्याग केला आणि थेट भाजपमध्ये प्रवेश केला.

अलीकडेच भाजपचे नवे अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनी त्यांच्या संघटनात्मक फेररचनेत त्यांना संघटनेत पद देऊ केले आहे.

काँग्रेसने सातत्याने महिलांना न्याय देण्याची भूमिका घेतलेली आहे. तेहतीस टक्के आरक्षणाला बांधील



असलेला हा पक्ष आहे. परंतु प्रत्यक्षात या पक्षातून महिला नेत्या बाहेर का पडत आहेत? काँग्रेसनेतृत्वानेही याबद्दल आत्मचिंतन करण्याची गरज आहे!

# लालूप्रसाद 'रिमोट'च्या भूमिकेत??

लालूप्रसाद बिहारच्या विधानसभा निवडणुकीत सहभागी नाहीत. चाराघोटाळ्यात शिक्षा झाल्यानंतर ते जेलबंद आहेत आणि त्यांना जामीनही मिळालेला नाही.

झारखंडमध्ये रांचीच्या तुरुंगात ते आहेत परंतु प्रकृतीच्या उपचारासाठी त्यांना तेथील सरकारी रुग्णालयात हलविण्यात आले आहे आणि तेथील संचालकांच्या बंगल्यात त्यांची राहण्याची सोय करण्यात आली आहे.

तेथूनच ते निवडणुकीवर आणि प्रचारावर बारीक नजर ठेवून आहेत आणि सध्या प्रचार आणि पक्षाची सूत्रे सांभाळणारे त्यांचे धाकटे चिरंजीव तेजस्वी प्रसाद यांना वेळोवेळी सूचनाही करीत आहेत.





एका त्यांच्या सहकाऱ्याने सांगितले की सकाळीच लालूप्रसाद वृत्तपत्रे वाचतात. इतरही सहकाऱ्यांकडून माहिती घेत असतात आणि मग त्यानंतर तेजस्वी प्रसाद यांना फोन करुन दिवसभराच्या सूचना देतात. हे त्यांचे संभाषण भोजपुरीमध्येच अधिकांश चालते. लालू प्रसाद यांना भोजपुरी भाषेत संवाद साधण्याची विशेष आवड आहे.

अलीकडेच एका सभेनंतर हेलिकॉप्टरकडे जाताना एकाने तेजस्वी बरोबर सेल्फी घेण्याचा प्रयत्न केला परंतु तेजस्वीने त्याला चक्क दंडाला धरुन हवेत उचलले आणि बाजूला केले. काही लोकांनी तेजस्वी रागावर नियंत्रण ठेवू शकले नसल्याचा अर्थ लावला तर काहींनी, 'नेता असावा तर असा, त्याच्या दंडात ताकद आहे' अशी स्तुतीही केली.

तेजस्वी यांनी मात्र हा माणूस हेलिकॉप्टरच्या एवढ्या जवळ आला होता की चालू झालेल्या हेलिकॉप्टरमुळे दुर्घटना होऊ शकली असती असा खुलासा करुन लोकांना शांत केले. पण पिताश्री लालूप्रसाद यांनी मात्र तेजस्वी यांना अस्सल भोजपुरीत, 'चुनाव प्रचार में दिमाग गरम कईला से ना चली'

म्हणजे प्रचारात डोकं गरम करुन चालत नाही, असा सबुरीचा सल्ला दिला. त्याचबरोबर प्रचाराच्या वेळी जास्तीतजास्त विनम्र रहा, एखाद्या चुकीच्या गोष्टीकडे दुर्लक्षही करायला शिका, असेही सांगितले. नीतीशकुमार यांचे फोटो जास्त छापले जाऊ द्यात त्यामुळे लोकांच्या नाराजीत आणखी भर पडेल अशी युक्तीची गोष्टही त्यांनी सांगितली. प्रचाराच्या वेळी लोकांना पसंत पडेल आणि लोकं नाराज होणार नाहीत असेच आचरण ठेवण्यावरही लालूप्रसाद यांनी या संभाषणात भर दिला. म्हणूनच एखाद्या वेळी लोकांकडून काही आगळीक झाली



तरी त्याकडे थोडे दुर्लक्ष करणे चांगले असा व्यावहारिक सल्ला त्यांनी तरुण पुत्र तेजस्वी यांना दिला.

तेजस्वी यांना मिळणारा प्रतिसाद पाहता बिहारमध्ये नवीन नेतृत्व उदयाला येऊ लागले असे म्हणायला हरकत नाही असे लोक म्हणून लागली आहेत. याचे उत्तर येणारा काळच देईल!

## ‘ते’ नसल्याचा फायदा!

बिहारच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजपचे चाणक्य मानले जाणारे गृहमंत्री अमितभाई शहा सहभागी झाले नाहीत. त्याची कारणे जी काही असतील ती असतील! पण ते बिहार निवडणुकीत सक्रिय नव्हते हे वास्तव आहे. पण त्यांच्या अनुपस्थितीचा लाभ इतरांना मिळाला त्यात आश्चर्य नव्हते.

बिहारच्या प्रचारात संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांना प्रथमच मोठी भूमिका मिळाली. तसेही ते शेजारच्या उत्तर प्रदेशातील आहेत त्यामुळे बिहारमध्ये प्रचाराची त्यांना संधी मिळताच त्यांनी जीव तोडून ती जबाबदारी पार पाडली. ते संरक्षणमंत्री असल्याने त्यांच्या दिमतीला हवाईदलाचे विमान असतेच. त्यामुळे त्यांनी बिहारमध्ये ‘चप्पाचप्पा’ पिंजून काढून सभा घेतल्या.

शिवाय ते ठाकूर-राजपूत आहेत आणि बिहारमधील हा समाज भाजपबरोबर असल्याने त्यांना त्याचाही फायदा झालाच! जाताजाता एका गमतीचा उल्लेख करणे चुकीचे ठरणार नाही. राजनाथसिंग यांना गोड पदार्थ आवडतात. परंतु गोड पदार्थातही ‘जिलबी’ हा त्यांचा अगदी ‘वीक पॉइंट’ आहे. त्यांच्या जेवणाचा शेवट जिलबीने झाल्याखेरीज त्यांना चैन पडत नाही असे त्यांचे निकटवर्ति सांगतात. त्यामुळे ते प्रचार दैऱ्यावर निघतात तेव्हा त्यांच्या सामानात जिलबीचा ‘स्टॉक’ अत्यावश्यकपणे समाविष्ट असतो.



रात्री झोपण्यापूर्वी ते जिलेबी खातात असेही त्यांचे निकटवर्ति सांगतात. थोडक्यात राजनाथसिंग यांना प्रथमच निवडणूक प्रचारात वाव देण्यात आला आहे.

दुसरीकडे पक्षाचे नवे अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनाही सध्या बिहारमध्ये प्रचार दौऱ्यात मोठी भूमिका मिळाली आहे.

नड्डा यांचे बिहारशी जुने नाते आहे. ते हिमाचल प्रदेशचे असले तरी बिहारमध्ये जन्म व शिक्षण झालेले आहे. त्यामुळे बिहारशी ते आपल्या जुन्या नात्याचा हवाला देऊन संवाद साधत आहे. अन्यथा नड्डा अध्यक्ष



झाल्यानंतरही त्यांना अमितभाईंचे स्थान किंवा महात्म्य प्राप्त होऊ शकले नाही. परंतु अमितभाईंच्या अनुपस्थितीमुळे त्यांना प्रसिध्दी मिळाली, अनेक राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात मुलाखती छापून आल्या.

नड्डा यांनी पश्चिम बंगालमध्येही दौरे सुरु केले आहेत. या राज्यात पुढील वर्षी विधानसभा निवडणूक होणार आहे.

नड्डा यांनी दोन दौरे केले आणि आता नोव्हेंबर महिन्यात त्यांचा दौरा निश्चित झालेला असतानाच त्यांना तो रद्द करावा लागला.

अमितभाई शहा आता सक्रिय होऊ लागले असल्याने त्यांनी स्वतःच पश्चिम बंगालचा दौरा आखला.

बिचारे नड्डा मुकाट्याने त्यांना दौरा रद्द करुन गप्प बसावे लागले. मागे लडाखच्या दौऱ्याच्या वेळी राजनाथसिंग यांच्यावर ही पाळी आली होती.

असो, राजकारणात हे चालत राहते! म्हणतात ना, पौर्णिमेच्या चंद्राचा प्रकाश एवढा असतो की त्यामुळे बाकीचे ग्रहतारे निस्तेज दिसू लागतात. अमावस्येच्या वेळी ते झळाळत असतात. राजकारणातही हा आवस-पुनवेचा खेळ चालूच राहतो!

## करोनाचे भय बिहारमध्ये कुणालाच नाही!

बिहार हे भारतीय राजकारणातले एक विलक्षण व वेगळे प्रकरण आहे. तेथील माणसांच्या नसानसात राजकारण भिनलेले आहे. त्यामुळेच निवडणूक हा बिहारमध्ये एक उत्सवी जल्लोषाचा प्रकार असतो.

आपल्या सर्व व्यथा-वेदना विसरुन बिहारी मतदार निवडणुकीत या-ना त्या स्वरुपात सहभागी होत राहतो. त्यामुळेच आजही बिहारमध्ये जाहीर सभा हा प्रचाराचा जुना प्रकार अस्तित्वात आहे. लोकं उत्साहाने नेत्यांच्या सभांना गर्दी करताना आढळतात. अन्यथा, आता पुढारलेल्या राज्यांमध्ये जाहीर सभा नावाला उरल्या आहेत आणि लोकंही फारशा उत्साहाने त्यात सहभागी होताना आढळत नाहीत. उलट, 'तो नेता काय बोलणार हे आम्हाला माहिती आहे' अशी उदासीनताच अधिक दिसून येते.

करोनाचा प्रसार बिहारमध्येही आहे. पण तेथील मतदार मात्र करोनापुढे डगमगलेला नाही.

बिहारमधील सभांची दृष्ये पाहता हे स्पष्ट लक्षात येते की तेथील लोकांनी मास्क लावण्याचेही सोडून दिले असावे. कुणीही कसलेही आरोग्याचे नियम पालन करताना आढळत नाहीत. मास्क न लावणारे लोक शारीरिक दूरीकरणाच्या नियमाचे पालन करतील अशी अपेक्षाही त्यामुळे व्यर्थ व फोल ठरते.

सामान्य मतदारांचे जाऊ द्यात, तेथील राजकीय नेतेही त्यांच्या फार मागे नाहीत. त्यांनीही करोना प्रतिबंधक उपाय धाब्यावर बसविलेले आहेत.

बिहारचे उपमुख्यमंत्री व भाजपचे मुख्य नेते सुशील मोदी यांना प्रचाराच्या सुरुवातीलाच २२ ऑक्टोबरला करोनाची बाधा झाल्याचे उघडकीस आले. तत्काळ त्यांनी विलगीकरण कक्षात स्वतःला दाखल करुन घेतले.

लागण सौम्य असल्याने पाचच



दिवसात त्यांना घरी जाण्याची परवानगी देण्यात आली. परंतु बाहेर फिरण्यास त्यांना मनाई करण्यात आली होती. किमान सात दिवस त्यांना विश्रांतीचा सल्ला देण्यात आला होता. पण एक-दोन दिवस त्यांनी कसेबसे घरी काढले आणि मग मात्र त्यांची सहनशक्ति संपली. निवडणूक चालू असताना ते घरात कसे बसणार?

मग त्यांनी कार्यकर्त्यांना भेटायला सुरुवात केली. आणि मग त्यांचे धैर्य व हिंमत आणखी वाढली.





त्यांनी चक्क प्रचारासाठी 'रोड शो' करण्यास सुरुवात केली.

आजारातून उठल्यानंतरही सुशील मोदी हे केवळ मास्क आणि हातमोजे घालून हे रोड शो करताना आढळले. बाकी कोणतीही प्रतिबंधात्मक उपाययोजना ते करीत नसल्याचे आढळून आले. त्यांच्या आजुबाजुला तर गर्दीत तुरळक माणसेच किंवा सुरक्षा कर्मचारीच फक्त मास्क लावलेले आढळले. सुशील मोदी यांचे हे साहस नव्हते तर शुध्द निष्काळजीपणा होता. एकप्रकारे ते स्वतःची काळजी घेत नव्हतेच पण त्यांच्यामुळे इतरांना करोना होऊ शकतो याचे भानही त्यांनी ठेवले नाही.

काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाने ही संधी सोडली नाही.

सुशील मोदी ही निष्काळजीपणा करुन आणि पुरेशी खबरदारी न घेता लोकांमध्ये मिसळत आहेत आणि एक प्रकारे करोनाचा प्रसार करण्याचे काम करीत आहेत असे सांगून या पक्षांनी त्यांच्याविरुध्द कारवाई करावी अशी मागणी केली. राष्ट्रीय जनता दलाने तर एक पाऊल पुढे जाऊन त्यांना अटक करण्याचीही मागणी केली. विनोदाचा भाग सोडला तरी जबाबदार नेतेमंडळी देखील अशा नाजुक परिस्थितीतही किती निष्काळजीपणाने वागू शकतात याचा हा एक नमूनाच मानावा लागेल!

बिहारमधील जनतेला मात्र सलाम! करोनाला ते घाबरत नसल्याचे त्यांनी दाखवून दिले!



# या नेत्यांच्या जिभेला कुणी लगाम घाला!

काँग्रेसचे नेते आणि मध्य प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ हे बिनधास्त बोलण्याबद्दल प्रसिध्दच आहेत. मध्य प्रदेशातील २८ विधानसभा मदारसंघात पोटनिवडणुका होत आहेत. एकप्रकारे ही 'मिनि विधानसभा निवडणूक'च मानली जाते. कारण या २८ पैकी भाजपला किमान आठ जागा जिंकणे अत्यावश्यक आहे कारण त्यानंतरच त्यांचे विधानसभेत बहुमत होऊ शकते. अन्यथा शिवराजसिंग चौहान यांचे भाजपचे सरकार धोक्यात येऊ शकते.

लढाई एवढी अटीतटीची असल्यावर प्रचारही 'जिंकू किंवा मरू' स्वरुपाचा असणार हे उघड आहे. मग आक्रमक प्रचार करताना जीभ सैल सुटणे आणि विरोधकांवर तुटून पडणेही ओघाने आलेच!

त्या भरातच काँग्रेसचे स्टार प्रचारक असलेल्या कमलनाथ यांनी भाजपच्या महिला उमेदवार इमरतीदेवी यांचा उल्लेख 'क्या आयटम है' असा केला आणि एकच गदारोळ झाला.

कमलनाथ यांच्या त्या शेऱ्याचा सार्वत्रिक निषेध झाला आणि काँग्रेसनेते राहूल गांधी यांनी देखील त्याबद्दल नापसंती व्यक्त केली.


कमलनाथ यांनी त्याबद्दल खेद प्रकट केला आणि त्यांचा उद्देश अवमान किंवा मनखंडनेचा नव्हता असे सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने जे नुकसान व्हायचे ते झालेच. हे घडते नाही घडते तोच केरळमध्ये असाच एक प्रकार घडला. यामध्ये तेथील प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष मुल्लापल्ली रामचंद्रन गुंतलेले आढळले.

बलात्कार झालेली महिला



स्वाभिमानी असेल तर जिवंत राहण्यापेक्षा आत्महत्या करणे पसंत करील अथवा तिच्यावर पुन्हा तशी वेळ येणार नाही अशी खात्री





करील अशा आशयाचे उद्‌गार त्यांनी काढले. त्यावरुन त्यांचा निषेध होताच त्यांनी तत्काळ माफी मागितली. परंतु रामचंद्रन यांची ही पहिलीच चूक नव्हती. यापूर्वीही त्यांनी केरळच्या आरोग्यमंत्री के.के. शैलजा यांच्याबद्दल अशाच तिरकस टिप्पण्या केल्या होत्या.

करोना किंवा त्यापूर्वी निपा साथीच्या यशस्वी मुकाबल्याबद्दल शैलजा यांची केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रशंसा करण्यात आली होती. त्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आहेत. बहुधा आपल्या विरोधकांची प्रशंसा सहन न झाल्याने रामचंद्रन यांनी त्यांची 'करोना राणी', 'निपा राजकुमारी' अशी चेष्टा करुन त्यांच्या प्रशंसेची टर उडविण्याचा प्रयत्न केला होता आणि तेव्हा देखील ते टीकेचे लक्ष्य ठरले होते.

प्रश्न हा आहे की एवढे मुरब्बी कसलेले राजकीय नेते असताना त्यांची जीभ घसरते कशी? परंतु या प्रश्नाला उत्तर नाही. मनोवृत्ती आणि स्वभाव याला औषध व उत्तर नसते!

## गडकरी शैलीत हजेरी!

परिवहन, रस्तेबांधणी मंत्री नितिन गडकरी हे त्यांच्या फटकळपणाबद्दल प्रसिध्द आहेत. विशेषतः जे अधिकारी किंवा कर्मचारी कामे करत नाहीत त्यांना फटकारण्यास ते मागे पुढे पहात नाहीत.

पूर्वी देखील त्यांनी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना दंडित करण्याचे काही उपाय सांगून गोंधळ उडवला होता. नुकतेच राजधानीत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) नव्या सात मजली कार्यालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यालयीन इमारतीचे काम बराच काळ रेंगाळले होते. २००९मध्ये ते सुरु झाले होते परंतु त्यासाठी ११ वर्षे लागण्याचे निश्चितच काही कारण नव्हते. पण अखेर २०२०च्या अखेरीला ते पूर्ण झाले व त्याच्या उद्घाटनाला नितिन गडकरी गेले.

गडकरी आता प्रशंसा करतील अशा सुखद अपेक्षेत असलेल्या अधिकारी व कर्मचारीवर्गाला मात्र गडकरींनी असे काही टोले लावले की कुठून त्यांना उद्घाटनाला बोलावले असे त्यांना वाटायला लागले असावे. इतकी दिरंगाई आणि कामचुकारपणा करणाऱ्यांचे अभिनंदन करायला देखील मला शरम वाटते अशी सुरुवात करुन त्यांनी जो बाँबगोळा टाकला की त्यातच उपस्थित अधिकारीवर्ग गार झाला. एक इमारत बांधण्यास ११ वर्षे लागणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे आणि तेही बांधकामाशी संबंधित मंत्रालयाकडून व्हावे हे तर आणखीनच लज्जास्पद आहे असा घाव त्यांनी घातला. या दिरंगाईमुळे सरकारला वाढीव १३५ कोटि रुपयांचा चुना लागला अशा भाषेत गडकरींनी त्यांना फटकारले.

पण एवढ्यावर थांबतात ते गडकरी कसले? चौफेर टोलेबाजीसाठी तयारी करुन आलेल्या गडकरींनी या इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण न करण्यास जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्या तसबिरी जागोजागी लावाव्यात असाही एक शालजोडीतला मारला. अशा नकारात्मक आणि निष्काळजी अधिकारी व कर्मचारी वर्गाची सरकारला गरज नाही आणि आता असल्या लोकांपासून मुक्ति मिळवावी लागेल व त्यासाठी 'शुध्दीकरण मोहिम' राबवावी लागेल आणि ती राबवण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला.



गडकरी एवढ्यावर कसले थांबतात? त्यांच्या या भाषणाची आणि अधिकार व कर्मचाऱ्यांना जाहीरपणे फटकाविण्याच्या भाषणाचे साद्यंत वृत्तांत देणारे प्रसिध्दी पत्रकही त्यांच्या विभागातर्फे जारी करण्यात आले. या भाषणातच त्यांनी 'एनपीए' किंवा 'एनपीओ'चा उल्लेख केला. बँकिंग क्षेत्रात 'नॉन परफॉर्मिंग ॲसेट' म्हणजेच वसूल न झालेली कर्जे हा मोठ्या प्रमाणात प्रचलित शब्द आहे. गडकरींनी देखील 'नॉन परफॉर्मिंग अधिकारी किंवा ऑफिसर्स' असा नवा शब्द तयार करुन त्यांची दखलही सरकारी पातळीवर घेऊन त्यांना घरचा रस्ता दाखवला जाईल हे सूचित केले. त्यांच्या या इशाऱ्याची सर्वत्र चर्चा आहेच पण काहीशी धास्तीही निर्माण झाली आहे. कारण गडकरी हे अशा रीतीने कारवाई करण्याबद्दल प्रसिध्द आहेत. त्यामुळेच बाबूंच्या वर्तुळात सध्या 'एनपीए' हा शब्द वेगळ्या अर्थाने परवलीचा झाला आहे! त्याचा अर्थ नोकरीवर संक्रांत किंवा गंडांतर!

■■■









करोनाची साथ अद्याप आटोक्यात येताना आढळत नाही. त्या साथीतच बिहारमध्ये निवडणूक झाली आहे. आता पुढील वर्षी पाच राज्यांमध्ये निवडणुका होताना परिस्थिती काय आणि कशी राहील याबाबत अजुनतरी अंदाजच करावा लागणार आहे. परंतु २०२२ मध्ये होणाऱ्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या दृष्टीने या राज्यांमधील निकाल हे महत्वाचे ठरतील.


# बिहारनंतर आता बंगालवर लक्ष

कबीर दास

महत्वाकांक्षा आणि पिपासा किंवा अतिरेकी लालसा यात अंतर आहे. सत्ता मिळविण्याची महत्वाकांक्षा ही एक सर्वमान्य आणि सर्वसामान्य बाब आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला ती ठेवण्याचा लोकशाही अधिकार आहे. परंतु पिपासा किंवा लालसा यामध्ये अतिरेकाची दुर्गंधी येते. जेव्हा लोकशाही देशात एखादा पक्ष आणि त्याचे नेते 'प्रतिस्पर्धी मुक्त' राजकारणाची भाषा करतात तेव्हा ही दुर्गंधी येऊ लागते. विरोधी पक्षांना लोकशाही, खुल्या व निकोप मार्गाने आणि खिलाडू वृत्तीने पराभूत करणे ही खरी लोकशाही असते. लालसा आणि पिपासा किंवा आसुरी महत्वाकांक्षेत विरोधकांना किंवा प्रतिस्पर्ध्यांना नेस्तनाबूत करण्याची भाषा वापरली जात असते. असे जेव्हा होऊ लागते तेव्हा लोकशाहीला धोका निर्माण होतो आणि त्यामुळेच अशा शक्तींना वेळीच रोखण्याची आवश्यकता निर्माण होते.

२०२० वर्ष आता संपत आले आहे. या वर्षात केवळ एकाच राज्यात म्हणजे बिहारमध्ये विधानसभा निवडणूक झाली. परंतु येणाऱ्या २०२१ या वर्षात पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. राज्यांमध्ये तसेच केंद्रात सत्तारूढ पक्षाच्या दृष्टीने या निवडणुका महत्वाच्या असतील. यापैकी पश्चिम बंगालची निवडणूक ही विशेष महत्वाची ठरणार आहे कारण हे राज्य ताब्यात घेण्यासाठी भाजपने आणि आपले सरकार टिकविण्यासाठी तृणमूल काँग्रेस म्हणजेच ममता बॅनर्जी यांनी प्राणपणाने बाजी लावली आहे. ज्या पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत त्यामध्ये पश्चिम बंगालखेरीज त्यांना लागून असलेलेच राज्य आसाम, दक्षिणेतील केरळ, तमीळनाडू आणि पुद्दुचेरी यांचा समावेश आहे. आसाममध्ये सध्या भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीचे सरकार आहे. तमीळनाडूमध्ये भाजपला अनुकूल आणि सर्वसाधारणपणे मित्रत्वाचे संबंध असलेल्या अण्णा द्रमुक पक्षाचे सरकार आहे. पुद्दुचेरी मध्ये काँग्रेसचे सरकार आहे तर केरळ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या लोकशाही आघाडीचे सरकार आहे. यापैकी दक्षिणेतील तिन्ही राज्यांमध्ये भाजपला सत्तेत येण्याची कोणतीच शक्यता नाही कारण तेथील राजकारण प्रबळ अशा स्थानिक व प्रादेशिक पक्षांभोवती फिरणारे आहे. भाजपला अजुनही या तीन राज्यात फारसा शिरकाव करता आलेला नाही किंवा प्रभावही टाकता आलेला नाही. त्यामुळे भाजप नेतृत्वाचे सारे लक्ष आसाम पाठोपाठ पश्चिम बंगालमधील सत्ता हस्तगत करण्यावर आहे. त्यासाठी त्यांनी आपली सर्व राजकीय आयुधे-शस्त्रास्त्रे, युक्त्या-चलाख्या वापरण्यास आतापासूनच सुरुवात केली आहे आणि तेथील सत्तेसाठी त्यांनी सर्व शक्ति पणाला लावलेली आहे. कोणत्याही थराला जाण्याची तयारीही ठेवण्यात आली आहे.

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे सरकार आहे. ममता बॅनर्जी या विलक्षण आक्रमक अशा नेत्या







असून त्या मुख्यमंत्री आहेत. २०११ पासून त्या मुख्यमंत्री आहेत. म्हणजेच आता होणाऱ्या आगामी निवडणुकीत त्या तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होण्यासाठी जनतेचा कौल मागतील. २०१६ मध्येही भाजपने त्यांच्या विरोधात लढत दिली होती परंतु ममता बॅनर्जी यांच्या झंझावातापुढे कुणीच टिकू शकले नाही. त्यांच्या तृणमूल कॉंग्रेसने २९४ पैकी २२१ जागा जिंकून विरोधी पक्षांना पार चारी मुंड्या चीत करुन टाकले. गेल्या पाच वर्षात ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारच्या विरोधात सातत्याने भूमिका घेतली. एकवेळेस त्या संयुक्त विरोधी पक्षांच्या नेत्या म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या आणि त्यांच्याकडे भावी पंतप्रधान म्हणूनही पाहिले जाऊ लागले होते. परंतु हा संभाव्य धोका ओळखून केंद्र सरकारने त्यांच्या नाड्या आवळण्यास सुरुवात केली. या ना त्या कारणास्तव पश्चिम बंगालला जाणीवपूर्वक 'टार्गेट' करण्यात आले. यामुळे ममता बॅनर्जी यांच्या केंद्रविरोधी नाराजीने संघर्षाचे रूप घेतले. त्यांनी उघडपणे केंद्राच्या विरोधात संघर्षाचा पवित्रा घेतला. केंद्र सरकारतर्फेही त्यांना कचाट्यात पकडण्याचे नाना प्रयत्न सुरु झाले. जीएसटीचा मुद्दा असो की राज्याला केंद्राच्या मदतीचा मुद्दा असो, पश्चिम बंगालचे नाक दाबायचे असे अत्यंत हीन आणि कोत्या मनाचे प्रकार सुरु करण्यात आले. यातून कटुता वाढतच गेली आणि आता तर या राज्यामध्ये 'जिंकू किंवा मरू' अशीच वातावरणनिर्मिती करण्याचे प्रयत्न भाजपतर्फे सुरु करण्यात आले आहेत.

कोणत्याही अन्य मार्गाने राजकीय प्रतिस्पर्धी नामोहरम होत नसेल तर मग त्याला विरुध्द धार्मिक ध्रुवीकरणाच्या जाळयात पकडण्याचा खेळ आता सर्वत्र माहिती झालेला आहे. ममता बॅनर्जी यांच्या विरोधाचे सर्व उपाय थकल्यानंतर धार्मिक ध्रुवीकरणाचा हुकमी एक्का आता काढला जात आहे. बिहारमध्ये देखील योगी आदित्यनाथ यांना प्रचाराला पाठवून हाच खेळ करण्यात आला. खुद्द पंतप्रधानांनीच राम मंदिराचा उल्लेख प्रचारात करुन त्या आधारे मते मागितली. म्हणजेच सत्तापक्षाकडे विकास व प्रगतीच्या मुद्यांपेक्षा धार्मिक भावनांना हात घालणाऱ्या मुद्यांना प्राधान्य दिले जाते हे स्पष्ट झालेले आहे. पश्चिम



बंगालमध्ये हा खेळ सुरु झाला आहे. देशाच्या सत्तर वर्षांच्या इतिहासात एकाही पंतप्रधानाने कलकत्त्याच्या दुर्गापुजा मंडपांचे उद्घाटन केल्याचे माहितीत नाही. किमान गेल्या चाळीस वर्षात तरी असे निश्चितपणे घडलेले नाही. परंतु यावेळी दिल्लीत बसून दूरस्थ नियंत्रकाच्या द्वारे देशाच्या पंतप्रधानांनी कलकत्त्यामधील दुर्गापूजा मंडपांची एका मागून एक उद्घाटने केली आणि त्यांच्या आवडीनुसार भलीमोठी भाषणेही केली. भाजपच्या प्रचाराचा सारांश एवढाच असतो की केंद्रात ते सत्तेत असल्याने राज्यातही त्यांना सत्ता दिल्यास राज्याचे भले होईल, राज्याचा विकास व प्रगती होईल. म्हणजेच यामध्ये प्रचारापेक्षा धमकीचा भाग अधिक असतो कारण लोकांनी भाजपला सत्ता न दिल्यास केंद्रातील भाजपचे सरकार या राज्याच्या प्रगतीपेक्षा अधोगतीवर अधिक लक्ष केंद्रित करील असा त्याचा दुसरा अर्थ निघतो.

पश्चिम बंगालची सत्ता हस्तगत करायला निघालेल्या भाजपने त्यांच्या मोहिमेची सुरुवात धडाक्यात करण्याच्या दृष्टीने देशाचे द्वितीय पोलादी पुरुष आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्याची आखणी केली. मुळात भाजपचे राष्ट्रीय त्यांनी हा दोन दिवसांचा दौरा केला. पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे सरकार उलथवून टाकण्याचे मतदारांना आवाहन करताना त्यांनी आगामी निवडणुकीत भाजप दोन-तृतीयांशापेक्षा अधिक जागा मिळवून राज्यात सरकार स्थापन करील अशी घोषणा केली. त्यांची घोषणा गांभीर्याने घ्यावी लागेल कारण सध्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात आपण राहतो आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर निवडणुकांचे निकाल बदलले जाऊ शकतात याचा अनुभव जगालाही आहे. गेल्या काही वर्षात भारतात विशिष्ट राजकीय पक्षाचे नेते जागांची भविष्यवाणी करतात आणि ती तंतोतंत खरी ठरताना आढळते. त्यामुळे हे चमत्कार लक्षात घेता अमित शहांच्या घोषणेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. याचा अर्थ ममता बॅनर्जी यांना अतिशय सतर्क राहून निवडणूक लढवावी लागणार आहे. पुढील काळात त्यांना पराकोटीच्या आर्थिक कोंडीला, त्यांच्या पक्षातल्या प्रमुख नेत्यांविरुध्द छापे, धाडी, अटक असे अनेक प्रकार होऊ शकतात आणि त्यासाठी त्यांना मनाची तयारी ठेवावी लागेल. कारण गेल्या काही वर्षात



अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा हे या मोहिमेची सुरुवात करणार होते आणि त्यांच्या पश्चिम बंगाल दौऱ्याची कार्यक्रमही जाहीर झाला होता. परंतु आयत्या वेळी त्यांना तो रद्द करायला सांगण्यात आला आणि त्यांच्याऐवजी अमित शहा पश्चिम बंगालचा दौरा करतील असे जाहीर करण्यात आले. अमित शहा नुकतेच दुखण्यातून बरे झालेले आहेत. हा त्यांचा पहिलाच दौरा होता. आपण किती तंदुस्त आहोत हे दाखवत

भारतात निवडणुकांच्या तोंडावर फक्त विरोधी पक्षांमधील प्रमुख नेत्यांच्या विरोधात सरकारी यंत्रणा सक्रिय होऊन कारवाई करु लागल्याचे प्रकार नित्याचे झाले आहेत. ताजे बिहार निवडणुकीचे उदाहरण पुरेसे आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालूप्रसाद यांनी जामीनासाठी अर्ज केला होता. त्यांना ९ नोव्हेंबरला जामीन मिळणार असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु त्याविरुध्द उच्च न्यायालयात केलेल्या अर्जावर निकाल



देताना कोर्टने २७ नोव्हेंबरपर्यंत तो पुढे ढकलला. याला योगायोग म्हणावे की आणखी काही ? परंतु गेल्या सहा-सात वर्षांपासून असे भरपूर योगायोग देशात घडताना आढळतात.





त्यामुळे पश्चिम बंगालमधील सत्तारूढ तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना सतर्क रहावे लागणार आहे हे स्पष्ट आहे. ममता बॅनर्जी यांच्या दृष्टीने भाजपचे आव्हान मुख्य असले तरी भाजपविरोधातील मतांमध्ये विभागणीचा तेवढाच धोका असल्याने त्यावर मात कशी करायची हा प्रश्नही त्यांना चलाखीने हाताळावा लागणार आहे. ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्र पक्ष स्थापन केल्याचा आणि त्याच्या जोरावर पश्चिम बंगालमध्ये सलग दोनवेळा सत्तेत येण्याचा तसेच बलाढ्य मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला पराभूत नव्हे तर नेस्तनाबूत करण्याचे श्रेयही त्यांनी घेतली. या प्रक्रियेत त्यांनी भाजपशी साटेलोटे केले आणि पश्चिम बंगालमध्ये त्यांना शिरकाव दिला आणि आता त्याचीच फळे त्या भोगत आहेत. परंतु पश्चातापाखेरीज त्या दुसरे काही करु शकत नाहीत. त्यामुळे ममता बॅनर्जी यांच्याकडून दुखावले गेलेले हे दोन जीव म्हणजेच काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष एकत्र येणे ही नैसर्गिक परिणिती आहे. त्यामुळे या आगामी निवडणुकीसाठी या दोन्ही पक्षांनी आपली आघाडी आताच जाहीर करुन टाकली आहे. गेल्या निवडणुकीत ही आघाडी फारसे चमकदार यश मिळवू शकली नव्हती. डावी आघाडी(मार्क्सवादी, भारतीय कम्युनिस्ट, फॉरवर्ड ब्लॉक आणि क्रांतिकारी समाजवादी पक्ष) आणि काँग्रेसला मिळून ६४ जागा मिळाल्या होत्या आणि भाजपला केवळ १६ जागांवर समाधान मानावे लागले होते. यात फायदा काँग्रेसचा झाला कारण काँग्रेसला २७ जागा मिळून त्यांना जवळपास प्रमुख विरोधी पक्षाचा दर्जा प्राप्त झाला. परंतु एकेकाळी सतत ३३-३४ वर्षे सत्ता गाजवलेल्या मार्क्सवाद्यांना फक्त १९ जागांवर समाधान मानावे लागले होते. आता भाजपने ज्या आक्रमकपणे लोकसभेतही प्रचार करुन जागा मिळवल्या तोच प्रकार ते विधानसभा निवडणुकीतही करणार हे उघड आहे. ही निवडणूकही अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली लढली जाणार हेही उघड आहे.

पश्चिम बंगालच्या शेजारीच आसाम आहे आणि आसाममध्ये 'एनआरसी' म्हणजेच 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स' हा मुद्दा अजुनही गरम आहे. आसाममधून परकी नागरिकांना म्हणजेच मुख्यतः मुस्लिमांना व तेही बांगला देशी

मुस्लिमांना बाहेर काढण्यासाठी हा आटापिटा करण्यात आला.

परंतु प्रत्यक्षात भाजपचे यात तोंड पोळले. परकी नागरिकांच्या छाननीत प्रामुख्याने हिंदू मंडळीच सापडल्याने भाजपच्या अंगाशी हा मुद्दा आला. त्यावर ही छाननी चुकीची आहे असा कांगावा करण्याचा प्रयत्न केला गेला परंतु त्यात यश येऊ शकले नाही. मुळात आसाममधील आसमिया असल्याने आगामी निवडणुकीत धार्मिक ध्रुवीकरणाची पार्श्वभूमि तयार करुन ठेवण्यात आलेलीच आहे. मात्र पश्चिम बंगालमध्ये हा मुद्दा फारसा उचलला जाणार नाही याची खबरदारी भाजपला घ्यावी लागेल. आसाम आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यात अल्पसंख्यक व विशेषतः मुस्लिमांची संख्या लक्षणीय असल्याने भाजपला ध्रुवीकरणासाठी तशी सुपीकताच आहे परंतु हे शस्त्र





भाषा व संस्कृतीच्या जतनासाठी आणि त्यावरील बंगाली अतिक्रमणाच्या निषेधात आसामातील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. त्यामुळे परकी नागरिकांच्या या मुद्यावर आसाममधून बंगाली हिंदूंची हकालपट्टी झाल्यास पश्चिम बंगालमध्ये त्याची प्रतिक्रिया निर्माण होऊ लागली होती. मग भाजपने त्यावर हळूहळू आस्ते कदम जाण्यास सुरुवात केली आणि आता त्यावर मौन पाळणे पसंत केले आहे. अर्थात नागरिकत्व दुरुस्ती कायदा करुन त्यांनी मुस्लिमांना त्यातून वगळून आसाममधील बहुसंख्यक समाजाचा अनुनय करण्याचे काम केलेलेच दुधारी असते ही बाबही त्यांना लक्षात ठेवावी लागणार आहे.

तमीळनाडूत भाजपला तेथील एखाद्या प्रादेशिक राजकीय पक्षाच्या पाठकुळी बसावे लागणार आहे. परंतु अण्णा द्रमुक पक्ष हा आतापर्यंत भाजपशी सहकार्याच्या भूमिकेत असला तरी जीएसटीच्या मुद्यावर हा पक्ष भाजपवर नाराज आहे. त्याचप्रमाणे भाजपने या पक्षाला अपेक्षित मदत न केल्याची नाराजी त्यांच्यात आहे. सध्या दक्षिणेतील राज्यांमध्ये भाजपच्या केंद्र सरकारतर्फे जाहीर करण्यात आलेल्या नव्या शैक्षणिक धोरणावरुनही भरपूर असंतोष आहे. विशेषतः हिंदी भाषेचा वाढता वरचष्मा आणि ती भाषा इतरांवर लादण्याचा प्रयत्न या नव्या धोरणाद्वारे केला जात आहे अशी बहुतेक दाक्षिणात्य राज्यांची भावना आहे. तमीळनाडूमध्ये हिंदी विरोध किती तीव्र आहे हे शब्दात



सांगणे अवघड आहे परंतु प्रसंगी लोकं त्या प्रश्नावर हिंसक बनू शकतात हे संसदेने देखील अनेकदा अनुभवलेले आहे. तमीळनाडूतील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा ट्रेलर म्हणून स्थानिक भाजपतर्फे एका यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु राज्य सरकारने करोनाचे कारण पुढे करुन त्यांना परवानगी नाकारली आणि त्यांच्याविरुध्द कारवाईही केली. ही बाब अण्णा द्रमुक आणि भाजपमधील वाढत्या दुराव्याचे चिन्ह मानली जाते. तमीळनाडूतील ही निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण आहे कारण या निवडणुकीत वलयांकित नेत्या मानल्या जाणाऱ्या जयललिता नाहीत तसेच त्यांचे प्रतिस्पर्धी करुणनिधि हे देखील नाहीत. दोघाही नेत्यांचे निधन झाले. गेल्या विधानसभा निवडणुकीत जयललिता यांनी प्रकृती बरी नसतानाही प्रचार केला, त्या मुख्यमंत्रीही झाल्या परंतु काही महिन्यातच त्या रुग्णाईत झाल्या आणि त्यांचे निधन झाले. त्यांच्या पाठोपाठ करुणानिधीही अस्तंगत झाले. अण्णा द्रमुकमध्ये भरपूर लाथाळ्या असल्या तरी ई.के. पलानीस्वामी यांनी हे सरकार जयललितांच्या मागे पाच वर्षे कसेबेसे का होईना चालवले. जयललिता यांचे आणखी एक विश्वासून पनीरसेल्वम यांच्याशी त्यांना सामना करावा लागला पण त्यांनाही त्यांनी बरोबर घेऊन बंडखोरी शमविली. असे असले तरी पोटनिवडणुका तसेच लोकसभा निवडणुकांमध्ये प्रतिस्पर्धी द्रमुकने





बाजी मारलेली आढळते. त्यामुळेच आगामी विधानसभा निवडणुकीत करुणानिधिपुत्र एम.के.स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुकचे पारडे काहीसे जड दिसते आहे

आणि त्यामुळेच वलयांकित नेत्यांच्या गैरहजेरीत होणारी ही निवडणूक उत्कंठावर्धक राहणार आहे. कमल हसन या अभिनेते व नेते यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने काही संघटना व लहान पक्षांबरोबर आघाडी केलेली आहे पण ती नगण्य आहे आणि त्यांची धोरणे भाजपच्या विरोधातील असल्याने भाजपला त्यांचा फायदा होणार नाही. त्यामुळेच काँग्रेसमधून आयात केलेल्या अभिनेत्री व नेत्या खुशबू यांना भाजपतर्फे प्रोजेक्ट करण्याचा प्रयत्न सुरु आहे पण राजकीयदृष्ट्या त्या अत्यंत ‘लाईटवेट’ आहेत. म्हणून लोकप्रिय अभिनेते रजनीकांत यांना राजकारणात ओढण्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न सुरु आहेत. पण रजनीकांत यांनी अद्याप त्यास दाद दिलेली नाही. तमीळनाडूचे राजकारण हे द्रविडी विचारसरणीने प्रभावित असल्याने तेथे हिंदुत्वाच्या आधारे राजकारणाला अद्याप वाव मिळताना आढळत नाही व त्यामुळेच भाजपला तेथे फारसे स्थान नाही. ती स्थिति बदललेली नाही. पुद्दुचेरी हे पूर्ण राज्य नाही. त्याची अवस्था दिल्ली सरकारसारखी आहे. परंतु तेथील स्थानिक पक्षाच्या मदतीने भाजप सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करणार हे स्पष्ट आहे.



केरळ हे राज्यही वैशिष्ट्यपूर्ण आहे. तेथेही भाजपला शिरकाव करणे अवघड झालेले आहे. तेथील राजकारण प्रामुख्याने दोन राजकीय आघाड्यांमध्ये विभागलेले आहे. विशेष म्हणजे दोन्ही आघाड्या भाजपविरोधी आहेत. एक आघाडी काँग्रेस प्रणित संयुक्त लोकशाही आघाडी आहे तर दुसरी जी सध्या सत्तेत आहे ती मार्क्सवाद्यांच्या नेतृत्वाखालील डावी लोकशाही आघाडी आहे. केरळमध्ये या दोन्ही आघाड्या अजुनपर्यंत तरी राजकारणावर आपले वर्चस्व राखून आहेत आणि त्यामुळेच तमीळनाडू व केरळमध्ये भाजपला अद्याप काही वर्षे तरी थांबावे लागणार आहे.

करोनाची साथ अद्याप आटोक्यात येताना आढळत नाही. त्या साथीतच बिहारमध्ये निवडणूक झाली आहे. आता पुढील वर्षी पाच राज्यांमध्ये निवडणुका होताना परिस्थिति काय आणि कशी राहील याबाबत अजुनतरी अंदाजच करावा लागणार आहे. परंतु २०२२ मध्ये होणाऱ्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या दृष्टीने या राज्यांमधील निकाल हे महत्वाचे ठरतील.

■■■


Nanded City, Pune
The Maximum City
Sinhagad Road, Pune
A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.
आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.
आनंदी संकुल
कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण
• इको पार्क व ऑक्सिझोन
• १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
• १२० एकर्सची हिरवाई
CBSE व ICSE शाळा
विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण
• CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
• दर्जेदार शिक्षण
• वॉक-टू-स्कूल मॉडेल
जिमखाना
तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी
• सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
• २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
• क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
• विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग
नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!
A project by
MAGARPATTA CITY
The pride of Pune
Call: 020-67275300 / 1 / 2
CREDAI PUNE METRO
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.
tempestadvertising.com



# राज्याचे सगळे अधिकार काढून घेण्याचे पाप केंद्र सरकार करतेय हे त्यांच्या कृतीतून दिसतेय - खासदार सुप्रियाताई सुळे



मुंबई - राज्याचे सगळे अधिकार काढून घेण्याचे पाप केंद्र सरकार करतेय हे त्यांच्या कृतीतून दिसते असून हे दुर्दैवी आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासामध्ये केंद्रसरकार हस्तक्षेप करतेय हे निंदनीय आहे अशा शब्दात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केंद्रसरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

मेट्रो कारशेडबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांवर बोलताना खासदार सुप्रियाताई सुळे यांनी जोरदार टीका केली आहे.

खरं तर ती जमीन महाराष्ट्राची आहे. ज्या राज्याची जमीन असते त्यावर पहिला अधिकार हा त्याच राज्याचा असतो. भाजपचे नेते कोणत्या आधारावर टीका करतायत. जमीन महाराष्ट्राची आहे ती विकास कामासाठी वापरली जातेय. या देशात केंद्रसरकार हळूहळू आणीबाणी आणतंय असं चित्र आहे असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

महाराष्ट्र हे सुसंस्कृत राज्य आहे. मंदिरांचे टाळे तोडण्याची भाषा मी कधीच ऐकलेली नाही. हे दुर्दैवी आहे, सत्ता नसल्यामुळे कदाचित त्यांना काहीच सूचत नाही, त्यामुळे कदाचित ते बिचारे असे वागत असतील असा टोलाही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी लगावला. दरम्यान लग्नाचे हॉल्स खुले करण्याची विनंती मी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना केली आहे. टप्प्याटप्प्याने हॉल खुले करा. दिवाळीनंतर हॉल उघडा पण त्याचे बुकींग घ्यायला आता परवानगी द्या. त्यामुळे बॅण्डवाले, कॅटरर्स यांना दिलासा मिळेल असेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सांगितले.

# कांजूरमार्ग कारशेडचे काम थांबवण्याचे भाजपचे कटकारस्थान - नवाब मलिक



मुंबई - कांजूरमार्ग कारशेड हा मुंबईच्या दोन लाईनला जोडणारा प्रकल्प असून २० लाख लोकांना त्याचा फायदा मिळवून देणारा असल्याने हे काम कसं थांबवायचं यासाठी भाजपकडून कटकारस्थान सुरू आहे असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी केला आहे.









केंद्राच्या इंडस्ट्री मंत्रालय खात्याकडून राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र दिले आहे. या पत्रात मेट्रो कारशेडची जागा राज्यसरकारने एमएमआरडीएला वर्ग केली ती जागा मिठागरांसाठी आहे. आणि आता कारशेडला दिलेली चुकीच्या पद्धतीने देण्यात आली आहे असे पत्रात म्हटले आहे. याआधी मिठागराच्या बऱ्याचशा जागा राज्यसरकारला केंद्राने २००२ साली वर्ग केल्या आहेत अशी माहिती नवाब मलिक यांनी दिली. भाजपचे लोक सुरुवातीला ही खाजगी जागा आहे सांगत होते आणि आता केंद्र सरकारच्या मालकीची आहे असे सांगत आहेत यावरुन भाजपच्या लोकांना मेट्रोच्या कामात अडथळा आणायचा आहे असेही नवाब मलिक म्हणाले.

# इतर लोक येवून सरकारशी चर्चा करतात तर तुम्हाला चर्चा करायला अडचण का वाटते -हेमंत टकले

मुंबई – मंदिरे सुरू करायची असतील तर कशाप्रकारची रचना पाहिजे त्याच्यावर चर्चा करता येईल तुम्ही पुढे या आम्ही शासनाला सांगू... एकत्र बसून ठरवू परंतु मंदिरे उघडलीच पाहिजे अशाप्रकारचा हट्ट का? इतर लोक येवून चर्चा करतात तर तुम्हाला चर्चा करायला अडचण का वाटते असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हेमंत टकले यांनी भाजपला केला आहे. भाजपच्या तथाकथित अध्यात्मिक आघाडीने तुळजापूर आणि पंढरपूर येथे मंदिरे उघडण्याबाबत आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यावर माजी आमदार हेमंत टकले यांनी माध्यमांशी बोलताना आपले मत मांडले आहे. मंदिरे, धार्मिक स्थळे उघडली पाहिजेत. मस्जिद, चर्च, गुरुद्वारा हे धार्मिक अधिष्ठान असलेले वेगवेगळे समुह आहेत. परंतु याचा राजकारणाशी जोडण्याचा काय संबंध... जेव्हा एखाद्या राज्यातील प्रशासन संभाव्य परिणामांचा अभ्यास करून काही गोष्टींबद्दल टप्प्याटप्प्याने निर्णय घेत असते. त्यामुळे उगाचच अगावूपणे अशाप्रकारची आंदोलने करून काय मिळते असा सवालही हेमंत टकले यांनी भाजपला केला आहे.

थिएटर, मॉल सुरू केले आणि बाजारातही गर्दी दिसते आहे मग मंदिरांनीच काय केले असा सवालही करत आहेत परंतु मंदिरात येणारा भाविक असतो त्याची अडवणूक करणं कुणालाही जमणार नाही. वास्तविक कुठल्याही मंदिराचा वास्तू रचनेतून पाहिले तर आतला गाभारा हा लहान असतो. तिरुपती देवस्थानासारखं रांगेत या लांबून दर्शन घ्या ही पद्धत आपल्याकडे नाही. आपल्या धार्मिक स्थळावर त्याला एसओपी म्हणतात तसं तयार केलेले नाही असेही हेमंत टकले यांनी स्पष्ट केले. शासनाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या माझे कुटुंब माझी जबाबदारी, मास्क नाही तर प्रवेश नाही या सगळ्या एक जनजागरणाच्या मोहिम आहेत या मोहिमेत अशा मंदिरे उघडा आंदोलनाने खोडा घालण्याचे काम कशासाठी करताय असा आरोपही हेमंत टकले यांनी केला आहे. एखादा राजकीय पक्ष अशाप्रकारच्या भूमिका कशासाठी घेतो. अध्यात्मिक आघाडीचे कार्यकर्ते वाहिन्यांवर उघड मुलाखती देतात. कुठेतरी वास्तवाकडे गेलं पाहिजे. परमेश्वर जसा तुमचा आहे तसा तो सगळ्यांचा आहे. श्रध्दा सगळ्यांचीच परंतु असं ओंगळ प्रदर्शन करण्याची गरज नाही असे सांगतानाच त्यावर मार्ग शोधला पाहिजे, समजुतीने घेतले पाहिजे. सरकार यावर मार्ग काढणार आहे याबद्दल खात्री बाळगली पाहिजे असा सल्लाही हेमंत टकले यांनी दिला आहे. आज आर्थिक संकट मोठं आहे... लोकांच्या नोकर्‍या गेल्या आहेत... कारखानदारी बंद पडली आहे... ट्रान्सपोर्टच्या व्यवस्था नाहीयेत अशावेळेला अशाप्रकारचा हट्ट धरणं औचित्याला धरुन नाही संबंधित पक्षाच्या नेतृत्वाने फेरविचार करावा अशी मागणीही हेमंत टकले यांनी केली आहे. आपल्याला लोकांच्या श्रध्दा कायम रहाव्यात... लोकांना तो एक दिलासा मिळेल पण त्याच्यासाठी आवश्यक खबरदारी तितकीच महत्वाची आहे त्यामुळे योग्यवेळी मंदिरे सुरू होतील. त्यासाठीची जी तयारी आहे ती करुन घेवून सगळ्या यंत्रणांवरचा ताण कमी करुन लोकांना १०० टक्के दिलासा देणार आहोत अशी खात्री माजी आमदार हेमंत टकले यांनी दिली आहे.



# कांदा आयात-निर्यात बाबतची केंद्र सरकारची धोरणे परस्पर विसंगत व शेतकरी विरोधी -शरद पवार

नाशिक- जीवनावश्यक वस्तूंमधून कांदा वगळला असताना त्यावर निर्बंध लावणे, एकीकडे निर्यातीवर बंधने आणून आयात करणे ही परस्परविरोधी भूमिका पटत नसल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी व्यक्त केले.

नाशिक भेटीदरम्यान कांदा उत्पादक शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींनी खासदार शरद पवार यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या. कांद्यावर निर्बंध लावणे, एकीकडे निर्यातीवर बंधने आणून आयात करणे ही परस्परविरोधी भूमिका पटत नाही असे मत शरद पवार यांनी नाशिक येथे व्यक्त केले.

कांदा प्रश्न हा केंद्रसरकारशी बोलून निकालात काढावा लागेल. केंद्रामध्ये ज्यांच्या अख्यत्यारित हा प्रश्न आहे त्यांच्याशी संपर्क साधून शेतकरी व व्यापारी प्रतिनिधींनी ठरले पाहिजे. या प्रश्नाची सोडवणूक करायची असेल तर राज्य सरकारपेक्षाही केंद्र सरकारच्या धोरणांच्यामार्फतच हे बदल आपण करू शकतो असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. कांदा लिलाव बंदीप्रकरणी शेतकऱ्यांनी राज्य शासनाकडे काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. पण राज्यशासनाला यासंबंधीचे अधिकार नाहीत. कांद्याच्या आयात-निर्यातीसंदर्भातील निर्णय हे राष्ट्रीय पातळीवर होत असल्याने राज्याकडून यासंबंधी फारशा अपेक्षा ठेवणे योग्य ठरणार नाही असेही शरद पवार यांनी यावेळी सांगितले.

पण व्यापार हा व्यवस्थित सुरू राहिलाच पाहिजे. व्यापाऱ्यांनी मार्केट बंद ठेवण्याबाबत फेरविचार करावा असे मला वाटतं. मार्केटमधल्या ज्या अडचणी आहेत त्या एकत्र बसून सोडवण्याची माझी भूमिका आहे. व्यापाऱ्यांना काही त्रास होतोय हे मला मंजूर आहे. पण म्हणून इतरांना त्रास



एकत्रित येऊन त्यांची वेळ घ्यावी अशी सूचनाही शरद पवार यांनी केली.

ज्यांच्या अधिकारात निर्णय होऊ शकतो त्यांच्याशी चर्चा करून सवलती मिळवून देण्यासंबंधी आग्रह धरण्याची आवश्यकता आहे. कांद्याच्या प्रश्नाबाबत योग्य धोरण



व्हावा ही त्यांची भावना निश्चितच नसेल. त्यामुळे व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार सुरू ठेवावेत, शेतकऱ्यांचे दोन्ही बाजूंनी नुकसान होऊ देऊ नये, अशी आग्रहाची विनंती शरद पवार यांनी या बैठकीत व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींना केली.

■■■

# उजळत्या वाटा



कसे असतील सगळे साहेबांचे कार्यकर्ते. गेल्या कित्येक वर्षात आपण साहेबांना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात भेटतो. जेंव्हा ते एखाद्या ओसाड गावापाशी जातात, सभा असते आणि तिथल्या कुणालातरी ते नावाने हाक मारतात. त्या वेळी त्याला धन्य झाल्यासारखं वाटतं. एवढा मोठा माणूस, आपलं नाव लक्षात ठेऊन आपल्याशी बोलतो, याच्यापेक्षा त्याला आणखीन काय हवं असतं. तो क्षण मग तो त्याच्या हृदयात जपून ठेवतो. असे अनेक क्षण साहेबांच्या बाबतीत घडतात नेहमीच. पण या सगळ्या क्षणांना साथीदार कित्येक वेळेला असतात ती त्यांच्याबरोबर सतत असणारी माणसं; आणि त्यांच्यामध्ये एक महत्वाचं नांव आहे साहेबांचे स्वीयसहायक सतीश राऊत यांचं. हे काम ते करतातच, जाणीवपूर्वक करतात, श्रद्धेने करतात पण त्यांच्यामध्ये एक कवी आणि साहित्यीक दडलेला आहे. त्यामुळे साहेबांच्या जीवनातल्या या छोट्या छोट्या गोष्टी ते लिखित स्वरुपात तयार ठेवतात.

सतीश राउतांनी असचं मला एक त्यांनी लिहिलेलं पाठवलं. शीर्षक होतं, उजळलेल्या वाटा. १ सप्टेंबर, २०१९ रोजी साहेब सांगलीला होते. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात उभारलेल्या आर.आर. आबांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाचा कार्यक्रम दुपारी आटोपून ते बारामती येथील गोविंदबाग निवासस्थानाकडे निघाले होते. फलटण पार करेपर्यंत दिवे लागण्याची वेळ झाली होती. गोविंद बागेजवळ पोहोचेपर्यंत तर सगळं शिवार अंधारलं होतं. साहेबांची गाडी बागेचे मुख्य प्रवेशद्वार आणि नंतर घराभोवतीचे प्रवेश द्वार पार करून पोर्चमध्ये थांबली. साहेब गाडीतून उतरू लागताच घरगडी आबाने पोर्च आणि वरांड्यातले वीजदिवे लावले. मधल्या सीटवर बसलेलो मी आणि डॉ. संतोष भोसले लगबगीनं खाली उतरलो.

साहेबांनी मागे वळून पहात, तुमची गाडी कुठे आहे? अशी चौकशी केली. आम्ही सांगितलं, साहेब गाडी गेटच्या बाहेर आहे. ते सांगताच साहेबांनी गेट पर्यंत नजरेचा कटाक्ष टाकला. पोर्चमध्ये दिवे लागले होते तरी गेटपर्यंतच्या नागमोडी रस्त्यावर अंधार बुडुक होता. अंधार असलातरी सवयीचा रस्ता असल्याने आम्ही निरोप घेऊन माघारी वळलो, आणि काही पावलं टाकताच परतीच्या रस्त्यावरचे दिवे लखलखले. रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या गुडघाभर उंचीच्या शोभेच्या झुडपात लपलेले वीजदिवे आता आमचे वाटाडे झाले होते. दिव्यांच्या मंद रोषणाईत उजळलेल्या वाटेवरून जाताना मी मागे वळून पाहू लागलो. घरात प्रवेशणारी साहेबांची पाठमोरी मूर्ती मी मनात साठवून घेतली. दिवसभरात धकाधकीने शिणलेल्या साहेबांच्या देही-उरी आम्ही सुखरूप परतण्याची तेवढी चिंता साठली होती. अंधारातून चालताना वाटेत एखादं किडूक-मिडूक आडवं आलं तर आम्ही सावध राहावं, याचं भान साहेबांना होतं. दुसरी एखादी व्यक्ती थकून भागून अंगातलं त्राण कमी झाल्यावर घरी येताच थेट सोफ्यावर जाऊन लवंडली असती. पण साहेबांनी घरगड्याला सांगून आमच्या परतीच्या प्रवासातील वाटा उजळवल्या होत्या.

पाच दशकांहूनही अधिक अखंड सार्वजनिक जीवनप्रवासात साहेबांनी किती जणांच्या आयुष्यातील वाटा उजळवल्या असतील. पण, कुणी कृतज्ञतेचे दीप मनात तेवत ठेवले असतील का? माझ्या मनाला प्रश्न पडला होता. सतीश, प्रश्न तुमचा अतिशय खरा असला तरी सगळ्यांच्या वतीने मी तुम्हाला सांगतो की हया उजळणाऱ्या वाटा आमच्या मनामध्ये कायम राहतील कारण त्या आम्हाला आमच्या नेत्याने दाखवलेल्या आहेत. त्याच्यावरूनच आमचा प्रवास सुरु असतो, आणि म्हणूनच आमचे नेते, तुमच्या आमच्या सगळ्यांचे नेते 'साहेब' आमच्या हृदयात कायमचे वस्तीला असतात.

**शेवटचे पान**

